साल अखेर ,,   ७ ,, ,, १८९
किरकोळ अंकास.......................०२

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Per annum in arrears 7 ,, 1R 8as
Six monthly........... 3 ,, 8 as
single copy............................... 4 as

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3 .

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 3 MAY 1886 NO 17

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख ३ माहे मे सन १८८६ इ० अंक १७

रा. रा. रामचंद्रदाजी नगारकर
बी. ए. एल. एल. बी.
७ मुंबईहायकोर्ट वकील.
पत्ता उमरावती. नेटीव जनरल
लायब्ररी शेजारी.

## नोटीस

नादारी मुकद्दमा नंबर ७. १८८१.

नमुना. ( जी. )

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हा आकोला.

सर्व लोकांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध करण्यांत येतें कीं भगवान वल्लद शंकर सोनार वस्ती मोरगांव भाकऱ्याचे तालुके आकोले हा नादार आहे असा आज तारखेस ठराव जाहला आहे आणि तारीख १७ माहे जून सन १८८६ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराचे तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्या बद्दल ज्यास साक्षीसमन्सें करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वीं तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दूरदूरचे राहणार असतील त्यांणीं ८ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिपल अफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी. म्हणजे ते दावे रजिस्टर दाखल होतील कळावें ता० २८।४।८६इ०

Mohamad Yasinkhan.

ज्यडूज्य

## नोटीस.

मि० गोवाडु दाजी शेट रंगारी राहणार एरंडोल जिल्हा खानदेश यांस खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविलें जातें कीं तुम्ही ह्या गेल्या अश्विन माशी आमच्याशी आपल्या मुलीचा गंधर्व लावून त्याजबद्दल आम्ही तुम्हांस रुपये ३२५ रोख मुली करितां देण्याचें व दाग दागीनें रुपये ५०० शेंचें आंगावर घालण्याचें वगैरे ठरवून तुमची मुलगी नामें नेर्थी इज बरोबर गंधर्व करण्याचें ठरले व ठरल्या वेळीं मुहुर्तावर आम्ही आपल्या कडे आलों व आपल्यास सदरील ठरावा प्रमाणें रुपये ३२५ दिलें व जाण्या बद्दल वगैरे १५० खर्च झाला व आपण तर ठरल्या प्रमाणें गंधर्व न करितां मजला विनाकारण बुडविले व तुम्ही नथीचा गंधर्व चोपड्याचे रंगारी याजबरोबर आम्हांस न कळवितां केल्यात याज करितां तुम्ही आमचा मोठा दगा केला तर आपल्यास ह्या नोटिशीनें असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत सदरहू रुपये खर्चाचे व मुली करितां घेतलेलें अदमासे रुपये ४५० आम्हांस खर्च वगैरे येऊन जाहाले आहेत ते देऊन निकाल करावा असें न झाले तर सदरहू रुपयांचा निकाल होई पर्यंत जो कांहीं खर्च होईल त्या सुद्धां कायद्या प्रमाणें भरून घेतलें जाईल कळावें तारीख २७ माहे एप्रिल सन १८८६ इसवी.

( सही ) गंगाराम बाळाजी रंगारी वालेकर दस्तुर खुद. जिल्हा खानदेश.

---

मेहरबान जुडिशिअल कमिशनर साहेब यांणीं कोर्ट फी आक्ट यांतील कलम २० प्रमाणें केलेले रेसिडेंट साहेबांनीं कायम केलेलें आणि गव्हरनर जनरल यांनीं मंजूर केलेले नियम रेसिडेंन्सी आर्डर्समध्यें छापून प्रसिद्ध झाले आहेत त्यांतील सारांश येणें प्रमाणें.

प्रोसेस बजाविण्या करितां जी फी द्यावयाची तिच्या बद्दल कोर्ट फीची टिकीटें दिलीं पाहिजेत.

(१) हैद्राबाद येथील रेसिडेंट साहेब यांच्या कोर्टांत आणि त्या कोर्टाच्या ताब्यांतील सर्व अपीलेंट कोर्टांत:—

समन्साचा दर.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| कोणत्या ही दाव्यांत दाव्याची रकम कितीही असली तरी | ० ९ ० |

वारंटाचा दर.

| | |
|---|---|
| कोणत्याही दाव्यांत दाव्याची रकम कितिहि असली तरी. | १--८--० |

(२) अव्वल दाव्याच्या सर्व दिवाणी कोर्टांत:—

समन्साचा दर.

| | |
|---|---|
| सर्व दिवाणी दावे ज्यांत दाव्याची रकम किंवा किंमत ३०० रुपयाहून ज्यास्ती नसेल तेव्हां | ०--४--० |
| सदरहू ३०० हून ज्यास्ती असेल तेव्हां——— | ०-१०-० |

वारंटाचा दर.

| | |
|---|---|
| सर्व दिवाणी दावे ज्यांत दाव्याची रकम किंवा किंमत ३०० रुपयां हून ज्यास्ती नसेल तेव्हां. | ०-१२-० |
| सदरहू ३००हून ज्यास्ती असेल तेव्हां | १--८--० |

( ३ ) मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथील स्मालकाज कोर्टांच्या मार्फत बजावणी होण्या करितां हिकडून एखादी प्रोसेस पाठविली असतां तिच्यावर हिकडच्या माना प्रमाणें प्रोसेस फी जितकी दिली पाहिजे तितक्याचें स्टांप घेऊन ते त्या प्रोसेसीवर लाविले पाहिजेत. आणि त्या प्रोसेसीची फी भरली गेली आहे असा कोर्ट त्या प्रोसेसीवर शेरा मारील.

२ खालीं लिहिलेल्या प्रोसेसीवर ही समन्साच्या दराप्रमाणें घेतली जाईल.

( अ ) आपल्यावर समन्स लागू होऊं नये म्हणून पळून जाणाऱ्या साक्षीदारा विषयीं जाहिरनामा करणें सन १८८२ च्या १४ व्या आक्टांतील कलम १६८ प्रमाणें—

( ब ) हजर होण्या करितां नोटिस कलम २४८

( क ) विक्रीचा जाहिरनामा कलम २८७

( ड ) विकलेला माल ताब्यांत देणें. कलम ३०० आणि ३०१

( ई ) पंच नेमण्याचा हुकूम कलम ५०८

३ खालीं लिहिलेल्या प्रोसेसीवर फी वारंटाच्या दरा प्रमाणें घेतली जाईल.

( अ ) प्रतिवादीनें हजर राहणें किंवा जमानत देण्याबद्दल. सन १८८२ च्या १४ व्या आक्टांतील कलम ४८४

( ब ) प्रतिवादाचा माल जप्त [illegible] करितां. कलम [illegible]

( क ) मनाईच्या [illegible] कलमें ४९२,४९३ आणि [illegible]

( उ ) कमिशनस. कलमें ३८४, ३८६, ३८७,३९२ आणि ३९६.

( ई ) ज्या मालावर हुकुमनामा झाला आहे त्या मालाचा ताबा देवविणें. कलमें, २६३, २६४ आणि २६५

( फ ) मालाचीच जप्ती करणें कलमें २६८, २७० २७१ आणि २७२

४ ह्या नियमांतील नियम १ (२) यांत सांगितलेली फी हुकुम नाम्याच्या अमला वारींतील सर्व प्रकरणांत आणि सर्व किरकोळ प्रकरणांत घेतली जाईल.

टीप— कोर्टाच्या इलाख्याचे बाहेर जी प्रोसेस बजाविली जावयाची आहे अशा प्रोसेसी करितां कधीं ही [illegible] केला असतां त्या अर्जावर प्रोसेस फीचीं टिकीटें लाविलीं पाहिजेत आणि जी प्रोसेस काढावयाची तीवर योग्य प्रोसेस फी भरली आहे असा शेरा दिला पाहिजे.

५ ज्या गुन्ह्याच्या बाबतींत वारंटा शिवाय पोलिस पकडूं शकतें अशा गुन्ह्यां शिवाय इतर गुन्ह्याच्या चौकशींत माजिस्ट्रेटानें कोणतीही प्रोसेस काढली तर तिच्या बद्दल सहा आणे फी पडेल.

६ ज्या प्रकरणांत सरकारी अम्मलदार, अम्मलदार या नात्यानें फिर्यादी आहे, त्या प्रकरणांत त्याला प्रोसेसफी आगाऊ देण्याचें अगत्य नाहीं. परंतु अशा गुन्ह्यांत आरोपीवर गुन्ह्याची शाबिती झाल्यास जी प्रोसेसफी इतर प्रसंगीं ५ नियमा प्रमाणें द्यावी लागली असती ती फी गुन्हेगारापासून घेण्याचा माजिस्ट्रेटास अधिकार आहे.

७ एखाद्या गैरहजर राहिलेल्या साक्षिदारा संबंधें माजिस्ट्रेटानें जाहिरनामा केला आणि नंतर तो साक्षीदार हजर झाला आणि कोर्टाच्या नजरेस असें आलें कीं समन्साची बजावणी होऊंनये म्हणून तो साक्षीदार लपत होता तर त्याला वारंट करण्या करितां आणि त्याच्या विषयीं जाहिर नामा करण्या करितां जी फी देणें पडेल ती त्याणें द्यावी असा हुकूम करण्याचा अधिकार माजिस्ट्रेटाला आहे.

८ पांचव्या नियमा प्रमाणें जी फी देणें आहे ती देण्याला कोणी फिर्यादी असमर्थ आहे असें माजिस्ट्रेटाला वाटेल तर त्याणें केलेली फिर्याद योग्य कारणानें केली आहे असें असल्यास त्या फीची सर्व रकम किंवा कांहीं भाग माफ करण्याचा अधिकार माजिस्ट्रेटास आहे. अशा मुकदम्यांत आरोपी हा गुन्हेगार आहे असें ठरल्यास फिर्यादीनें प्रोसेसफीची जी रकम [illegible] पाहिजे ती आरोपी पासून घेण्याचा अधिकार माजिस्ट्रेटास आहे.

९ ज्या कोणाला प्रोसेस काढणें असेल त्याणें लेखी अर्ज केला पाहिजे व त्या वर प्रोसेसफीच्या रकमेचे स्टांप लाविले पाहिजेत. परंतु फिर्यादीनें फिर्याद अर्जा वरच सदरहू स्टांपलाविले असतां चालेल.

१० प्रत्येक मनुष्यावर वे। वेगळी प्रोसेस काढली पाहिजे.

११ मुंबई इलाखा आणि मध्य प्रांत यांतील कोर्टांनीं मुलुक अमानी हैदराबाद येथील कोर्टाच्या मार्फत बजावल्या जाण्याकरितां ज्या प्रोसेसी सन १८८१ च्या १४ व्या आक्टांतील ९० व्या कलमा प्रमाणें काढल्या असतील त्या येथील कोर्टांनीं फुकट बजाविल्या पाहिजेत. इकडील कोर्टांनीं मुंबई इलाख्यांत किंवा मध्य प्रांतत बजावल्या जाण्या करित ज्या प्रोसेसी काढल्या जातील त्या तिकडील कोर्टें फुकट बजावतील.

१२ मुलुक अमानी हैदराबाद येथिल सर्व प्रोसेस सर्वशास प्रसेकास दरमहा ७ रुपये प्रमाणें पगार मिळेल.

वऱ्हाडसमाचार

मित्तीचैत्र वद्य ३० शके १८०८

# उमरावती शहरची म्युनिसिपाल कमीटी.

( मागील अंकावरून पुढें चालूं )

मागील अंकीं शहरच्या म्युनिसिपल कमेटीची स्थिति जशी असावी तशी नाहीं याचीं कारणें साधारण ठोकळ ठोकळ आम्हास दिसत आहेत तीं सांगण्यास चिंता नाहीं. प्रथमतः कमेटींत जी मेंबर मंडळी यांत युरोपियन व नेटिव्ह अशी मंडळी आहे. शहरच्या एकंदर कारभारात व तेथील लोकांचें बरें वाईट होईल या विषयीं काळजी युरोपियन मेंबर लोकांस साहजिकच कमी आहे. मात्र काटन मार्केट संबंधानें जी काटन कमेटी म्हणोन व्यवस्थापक सभा आहे त्यांत खुद्द साहेब लोकांचें स्वतःचें बरें वाईट असतें; त्या संबंधानें मात्र युरोपियन लोक ज्यास्ती काळजी बाळगतात' तेथील एकंदर व्यवस्था सर्व यांचे हातींच असल्या मुळें काटन कमेटींत नेटीव मेंबरांचा म्हणण्या जोगा शिरकाव होत नाहीं, व साहेब लोकांचें लक्ष अर्थात काटन कमेटीच्या संबंधात विशेष असतें व म्युनिसिपालिटीच्या संबंधांत कमी त्यांना विशेष कळकळ नसणें हें साजिकच आहे. नेटिव्ह लोक जे कमेटींत आहेत त्यां पैकीं पुष्कळ मंडळी, ज्यांचे हातून कमेटीचें काम मनावर धरलें असतां चांगलें व्हावें अशी कामाधंद्याचीं माणसें आहेत यामुळें त्यांस जितका वेळ कमेटीच्या कामास लावण्यास फावावा इतका फावत नाहीं. आपला रोजचा कामधंदा संपवून कमेटीचें काम संभाळावयाचें; तेव्हां कमेटीच्या कामाकडे फुरसतीचा सांपडलेला वेळ वरीस येणार तव्हां अर्थात तितके कमेटीच्या कामाकडे लक्ष कमी झालेंच. उदाहरणार्थ कमेटींत कांहीं पुढारी वकील मंडळी बरीच आहे, त्यांस कमेटीचें काम करणें तें फुरसतीनें केलें पाहिजे. हिंदुस्थानांत तरी निदान आपल्या नफानुकसानीकडे लक्ष न देतां केवळ लोकहितार्थ झटणारी मंडळी फार कमी. लोकहितासाठीं आपला देह झिजवून लोकांची शाबासकी हेंच आपलें खरें बक्षीस व यांतच आपली प्रतिष्ठा असें मानणारे व असें वर्तन ठेवणारे लोक विलायतेंत किंवा त्यांहून जास्त लोकसत्तात्मक देशांत जितके सांपडतील; तितके या देशांत कोठून सांपडणार? व जोंपर्यंत लोकांची स्थिती या प्रकारची नाहीं तोंपर्यंत कामें बहुधेक अशाच अनास्थेनें चालणार. लार्ड रिपन साहेबाचे स्थानिक स्वराज्याचे कायद्यास विशेष महत्व तें हेंच कीं लोकांमध्यें वर लिहिलेल्या तऱ्हेचा म्हणजे आपले स्वतःचे नुकसानीकडे लक्ष न देतां लोकांसाठीं झटून पुष्कळ लोकांस आपल्यापासून फायदा व्हावा, अशी बुद्धि उत्पन्न करणें हें होय. वर सांगितल्याप्रमाणें कमेटीपैकीं बरीच मंडळी कामधंद्याची असल्यामुळें त्यांस कमेटीच्या कामाकडे लावण्यास पुष्कळसा वेळ सांपडत नाहीं. या गोष्टीचे प्रत्यंतरास फार लांब जावयास नको; म्यानेजिंग कमेटीचे म्हणजे म्युनासिपल कमेटींतील व्यवस्थापक मंडळीचें काम नोंदलें जातें तें पुस्तक पाहिलें असतां असें दिसून येईल कीं पुष्कळ वेळ काम सुरूं करण्यास पुरेशीं मंडळीच होत नाहीं व सात वाजतां सभा भरण्याची असोन नऊ वाजे तोंपर्यंत कमेटीच्या सेक्रेटरीनें दात किरकाळशा खाऊन चुरमुरे खात घरीं जावें लागले असे ही कांहीं प्रसंग सांपडतील. उमरावतीच्या कमेटींत व्यवस्थापक सभा व साधारण सभा असें दोन प्रकार आहेत. नेहमीच्या वहिवाटीचीं सर्व कामें व बहुधेक सर्व बजावणीचीं कामें व्यवस्थापक सभाच करते म्हणजे अगदीं मोठ्या महत्वाचे विषयाखेरीज सर्व काम कमेटीच्या नांवानें व्यवस्थापक सभाच करते. या मुळें साधारण सभेचे जे मेंबर आहेत त्याचा कमेटीशीं संबंध बराच कमी म्हटला तरी चालेल व याचमुळें एकंदर कामाची व्यवस्था कोणत्या रीतीनें चालतें या विषयीं प्रत्यक्ष रीतीनें पाहण्यास सर्व मेंबरांस सांपडत नाहीं. आतां जनरल कमेटीचे मेंबरांस कोणतीही गोष्ट अव्यवस्थित रीतीनें होत असल्यास तिच्याविषयीं विचार करण्यास व योग्य बंदोबस्त करण्याची खटपट करण्यास सवड असते परंतु ज्या गोष्टी सहजानुसार डोळ्यापुढें येत नाहींत त्या मुद्दाम वाकड्या वाटेनें जाऊन बघत कोण बसतो? यामुळें सर्व कामें खरोखर व्यवस्थापक सभाच करते त्यामुळें वीस डोक्यांचा व वीस अकलांचा लोकांस फायदा न होतां पांच किंवा सहा लोकांच्या हुषारीचा व देखरेखीचा फायदा होतो. ही उणीव नव्या म्युनसिपल कमेटीच्या कायद्यांत सुधारली आहे असा अनुभव दिसतो. याप्रमाणें व्यवस्थापक सभेकडे सर्व कामाचा निकाल असल्या मुळें व त्यांतील बरीच मंडळी कामांत निमग्न असल्यामुळें लोकांचीं कामें लवकर न होऊन त्यास योग्य दाद मिळण्यास बराच अवकाश लागतो. इतर मेंबर लोक त्यांनां तर कमेटीच्या कामांत फारच थोडी कळकळ असणार. त्यांस इंग्रजी समजत नाहीं व त्यामुळें त्यांस आपलें म्हणणें काय आहे हें चांगलेंसें वठवितां येत नाहीं. व यामुळेंच त्यास जितकी गोडी कमेटीच्या कामांत लागावी तितकी लागत नाहीं. कमेटीचें मेंबर होण्यांत भूषण असून गोऱ्या सरदारांच्या खुरचीला खुरची लाऊन बसतां येतें व लोक म्हणतात कीं ' शेट साहेब कमेटीचे मेंबर आहेत ' येवढ्या कारितां कमेटीची त्यांस गोडी. कमेटी भरली म्हणजे आंगरख्याच्या बाहीवरून कडे झळकत आहे अशा हातानें साहेब बहादुरास सलाम करून खुरचीवर बसणें व हुंकार भरणें या पलीकडे या मेंबर लोकांचा फारच थोडा उपयोग आहे या प्रमाणें एकंदर मेंबर लोकांची व्यवस्था. आतां कामें निरनिराळ्या सहा लोकांकडे शहरच्या सहा भागाचीं कामें नेमलीं आहेत. म्हणजे शहराचें एका भागाची सफाई वगैरे सर्व कामें एका मेंबराच्या गळ्यांत; व मेंबर लोक सकाळच्या प्रहरीं हिंडून हिंडून कसे बेजार होऊन जातात याविषयीं पूर्वीं सांगितलेंच आहे, दुसर भागाची व्यवस्था दुसऱ्याचे गळ्यांत. जर एखाद्यानें दुसऱ्याचे भागांत जाऊन तेथील सफाईची व्यवस्था वगैरे पाहिली तर दुसऱ्यास जबर घुस्सा येणार; येवढी बिलामत अंगावर कोण घेतो. ही व्यवस्था बदलून हल्लीं सर्व शहरचें एकेक काम एकेकाकडे अशी व्यवस्था केली आहे असें ऐकतों; यामुळें अर्थात् बरीच सुधारणा होण्याचा संभव आहे; कारण सर्व शहरची सफाई वगैरे एका मनुष्याकडे असल्यानें त्याला सर्व व्यवस्था ठेवण्यास बरें व त्याला जबाबदार धरण्यास ही बरें. मात्र ही नवीन व्यवस्था होऊन फारच थोडे दिवस झाले आहेत.

कमेटींत जी जुनी जुनी मंडळी आहे त्या खेरीज या कमेटींत कांहीं ताज्या दमाची मंडळी असणें अवश्य आहे. आतां उमरावती येथें तरुण विद्वान् मंडळी आहे असें नाहीं परंतु तीं बहुतेक अद्यांप पवेतों या भानगडींत पडण्याचे भरीस पडत नाहींत. पूर्वींच्या लोकांचे विचार केते त्यांचें शिक्षण कमी म्हणून त्यांनीं कमेटीच्या कामांत मन न घालणें हे एखादे वेळेस शोभेल परंतु विद्याविभूषितांस व पदवीवाल्यांस हें चांगलें नाहीं. कमेटींत नेमले जाण्याविषयीं खटपट केली असतां त्यांस लोक कमेटींत नेमणार नाहींत असें नाहीं; परंतु एवढी खटपट करतो कोण. उमरावतीस उमेदवार मंडळी पुष्कळ पण उमेद काय ती द्रव्यार्जनाकडे फार खर्च होते. अशांची जर ही दशा तर इतर लोकांस कां हांसावें? नवा कायदा आल्यावर तरी या मंडळींनीं थोडें मनांत घेऊन कमेटींत येण्याची व आपले लोक कल्याण होण्याची खटपट करावी. असें झाल्यापासून एक जबर फायदा असा होणार आहे कीं मंडळीची मदत एकमेकांस होऊन कमेटीचीं कामें गटानें चालतील; व जुन्या मंडळीचा अनुभव व नव्यांचा ताजे[illegible] व तरतरी यांची सांगड फार चांगली बनणार आहे.

पुढें चालूं.

The Berar Samachar

MONDAY MAY 3
1886

## LEGISLATION IN INDIA.

(*By A. P. Howell C. S.*)

(Continued from our last issue.)

If, as Sir H. S. Maine affirms, the danger of legislation is in proportion to the ease with which Acts can be passed, and if in no part of the world can Acts be paseed so easily as in India, the question arises, how is it that measures which are the product of a single mind, or at most a single department, only concerned with the production of Acts and not with their working, are yet brought into the world with the stamp, and authority of a large and carefully constructed deliberative assembly? The answer is because, under the present system, the policy of legislation is not necessarily discussed at all, but is taken for granted. It is, only after the affirmation of the policy of legislation, that out side opinion is invited on the details, and officials in India are far too heavily occupied to find time for reopening a question which has apparently been decided. Moreover, under a despotism, the straight and narrow road of opposition does not lead to advancement. There the opposition never comes in; whereas a facility for opportune concurrence confers wings to the merit which hails and follows each rising manifestation with the simple or simulated faith of the shepherds in Bethlehem.

And not only has the Legislative department since 1877 propounded on its own motion a vast variety of Acts for the whole Empire, but has monopolised, in its consuming zeal, much of the local business of the different provinces. Far from stimulating the creation of the additional Councils prescribed in 1861, it once seriously contemplated the extinction of the existing minor Councils. It has interfered in the delicate and dangerous question of land tenures in the North-West, Oudh, the Punjab, the Central Provinces, and even in Lower Bengal. As regards the Central Provinces, the Bill first propounded was so outrageous in its unsuitableness, that after exasperating the most placable and apathetic of all our Indian subjects, it was withdrawn in a chorus of reprobation. It is true that the first Bill was succeeded by another, which was carried through the council by a gentleman of unrivalled experience in both general and local revenue detail, but even he would admit that the Act as passed was not all that he would have wished, and a more perfect Act might have been hammered out in the locality concerned had there been any machinery to do so. As regards Bengal, there has been no adequate explanation of the reasons why an essentially local Act was delt with, in the first instance, in the Supreme Council, or why discussion could not have been appropriately exhausted in the Lower Council leaving the Supreme Government to adjudicate upon the threshed out point of controversy. Instead of that, the reserves were hurried into the van, and the penalty paid has been excessive delay, wide-spread irritation, and as, some

experts hold, a mutilated and incomplete measure. Surely at this date there is no need of argument to prove that local business will be better done locally than by any distant centralization, however constituted.

The contrast between the standing orders and the actual practice as to the initiation of legislation and the disposal of local business, soon became so glaring, that it was necessary to give it some formal justification. Accordingly, in 1877, Lord Litton's Government was induced to pass a short Resolution which practically opened up to the legislative department an unrestricted field of legislative initiation. Whether Lord Lytton foresaw the consequences of signally cancelling his predecessor's order is not clear but there is no question that among those consequences must be ranked the unhappy dissension of the last three years of Lord Ripon's *regime*, as well as the somewhat fantastic developments simultaneously sprung upon the country under the much abused title of Local Self-government. It is not a little remarkable, that the main agent in directing the attention of Parliament and the English public to the abuses of legislation, consequent on his own policy, was Lord Litton himself in his admirable speech in the House of Lords in the spring of 1883.

What I wish to urge is that under the orders of 1877 which are still in force, the scheme of legislation designed by the Indian Councils Act has been superseded by a far wider scheme that under the new scheme the country is being flooded with Acts which, in many districts, are either a dead letter or mischievous almost in proportion to their operation, because many of those who have to administer them and much less the people, cannot understand them as they are in some instances impossible to translate into any spoken vernacular; that local legislative business is not yet done locally, because the local Councils, which were in 1861 to be constituted "without delay," have not yet been constituted in the minor local Governments; that the Supreme Council, however selected and however competent for really Imperial business, has neither the knowledge nor the time for local business, which might be all done in local councils where the doing of it would be really a part of local self-government and of political education of the highest kind; that the rapid introduction of new laws bears very hardly upon the great mass of the people, who can no longer manage their own affairs as they have been wont to do and puts an unfair premium on the study and practice of law; that native customs cannot hold their own in the competition to which they are now subjected, but are being rapidly displaced by a legal system which is admittedly the most anomalous, complex, and "incognoscible" in the civilised world-English law pure and simple.

This is a grave indictment against our administration, which I should hesitate to prefer, unless I were assured of its truth by close observation and many years experience, and unless I were supported by the Indian Councils Act and above all, by the great authority of Sir H. S. Maine. In the reported proceedings of the Supreme Council in December 1866 an instructive speech of Sir. H. S. Maine will be found, defending the Council from the charge of excessive legislation, but admitting that "there could hardly be any censure to heavy for the Council if it really did legislate with incaution and precipitancy;" and as regards the introduction of English law- "one of the most difficult and cumbrous systems in the world"- that it would by a "most intolerable hardship" if 250 millions of people should have their civil rights defined in a system which they cannot understand and which is contained in records not accessible to them. The point for consideration is whether instances of incautious and precipitate legislation in India can be pointed to and whether the people are indeed subjected to the hardship which Sir, H. S. Maine denounced. It would be a mockery to ask those who are familiar with the real story of the Ilbert Bill, whether it was not both incautious and precipitate, for if words have meaning that must be admitted even by the most earnest supporters of its principle. I have no will to revive the smouldering embers of extinct controversy, as the only connected point of present interest is, whether that Bill was not an isolated blunder but the outcome of the present defective system of irregular initiation. To argue that the measure had an executive origin, because that Legislative member who introduced it is also a member of the executive council, is a quibble only worthy of the puralist in the story of the Mikado. I am content to leave the Ilbert Bill and to rest the argument on the more solid ground of other instances of the same system. The only difficulty in the selection of instances is the *embarres buchoix*. I will, however take the Specific Belief Act of 1877 and the Easements Act of 1882.

It would be hardly an exaggeration to say that until 1877 no one in India, barring barristers trained in England had ever heard of the legal term, specific relief. When Sir Arthur (now Lord Hobhouse) introduced the Bill, to the best informed audience in the country, so ignorant was the Council of the meaning of even the title of the Bill that he was forced to explain--and the explanation is extant that the measure had no concern with the relief of the scarcity then prevalent in Madras. Of course, therefore, there could be no discussion, for it was a case of *ubi tu pulsue ego vapulo tantum*, and, equally of course, the Bill passed and was declared applicable to all British India.

Will any one maintain that a measure so passed by a Council which knew nothing about the Bill, and by an introducer who knew nothing about the people, could be justified by any theroy oi legislation? I can say from experience in a Court of Appeal, that after eight years of its operation, many of those who have to administer it are still quite ignorant of its provisions and that to the great mass of the people it is a dead letter, or being understood only by the pleaders, opens opportunities of sometimes vexatious litigation. Would not the measure have been far more warrantable had it had any real connection with the relief which its mover disclaimed; and as it had no such connection, was there not a strange but true analogy between the Council so engaged and the Council of Laputa which busied itself in scientific frivolities, while the people around were dying for food and clothes?

Take the other more recent instance. How many civilians prior to 1882: could have explained the nature of easement or any vernacular term for it? To this day, such an inquiry, especially among the old er civilians, whom the examiner has long ceased from troubling, would elicit curiously discrepant answers. In fact neither the title of the Act nor its chief provisions can be translated into any vernacular without an adaptation of English terms analogous to the pigeon English of the Chinese sea-board. No executive officer ever dreampt of proposing such a measure. On the contrary, one Lieutenant-Governor seriously replied, when asked what number of troops were required for the protection of his dominions, that if the legislative department continued to haras the people with such Acts, he must reconsider his requirements' Objections of this type of course failed to stop the torrent of legislation at the fountain head, but the local Governments grown wary by experience still managed at the last moment to divert its course. One after another of them declared that, however excellent the Act might be in the abstract, they individually did not want it, and so the operation of the Act was accepted only by the more courtly representatives of Madras and the Central Provinces notoriously th[illegible]ost backwards parts of the Empi[illegible] and for the tiny community [illegible]oorg which by a curious anamoly is still directly subordinate to the Government at Calcutta. The restriction is a significant comment of the necessity of the Act at all. It is not required by the European community at Bombay or Calcutta, or by the highly intelligent natives, there resident the Parsis or Bengalis——but it is enforced among the rude Gonds and Bhils of Central India, and among a fraction of the wild mountaineers of the Southern peninsula. Will be maintained that the Indian Councils Act contemplated measures being passed in advance of requirements, and then being rejected like misfits at a ready made store? What would be thought of an English Act passed for Great Britain and Ireland, and then limited to the crofters of Skye? The analogy fails to show the anomaly of what has been done in India, because, in no part of Great Britain can any community be found so low in the scale of civilisation as in the Central Provinces of India. I know of whole villages where the current vernacular has no written character; where there is no currency, and all the resources of the village cannot raise change for a rupee; where men and women, on their rare appearance in court are addressed even by natives through an interpreter, and are sworn by "the black dog;" whereon the occasion of an epidemic the collective wisdom of the community will seize on an old woman supposed to be connected with the visitation, and will pound her to death in a tank. Such are some of the Gonds, who are counted by hundreds of thousands. They are mostly agriculturalists of the roughest type, and if one of them now finds closed the familiar pathway to his immeorial field, he must be told in English, which he cannot of course understand,—and yet he can be told in no other tongue,—that he must sue the dominant owner for a release of the servient heritage under chapters IV and V of the Easements Act.

## वऱ्हाड

हवामान— उन्हाळ्याचें मान दिवसें दिवस चढत्या प्रमाणांत आहे. रात्रौ अभ्रें येऊन उकाडा फार होतो. व एकदोनवेळा शे पन्नास पावसाचे थेंबही पडले. रोगराई मात्र विशेष नाहीं.

येथील डे० ए० इन्स्पेक्टर यांचे कचेरितील हेडक्लार्क रा० विष्णु तात्याजी यांस अर्धे पगारावर ३ महिन्याची हक्काची रजा मिळून त्यांचे जागीं येथील गव्हरमेंट सेंट्रल बुक डिपोंतील क्लार्क रा. गोपाळ विश्वनाथ टोकेकर यांस व त्यांचे जागीं येथील मुनसिपल स्कुलांतील फरस्ट असिस्टंट रा. गणेश गोपाळ यांस नेमल्याचें समजतें.

मे० ख्वाजा बद्रोद्दीन साहेब तहशीलदार जळगांव यांस निमेपगारावर एकवर्ष चाकरजा देण्यांत येऊन त्यांचे जाग्यावर रा. नारायण पांडुरंग जोशी तहशीलदार खामगांव यांस नेमल्याचे समजतें.

चांदूर येथील तहशीलदार रा. हरी भाऊ रोहनखेडकर बी. ए. यांस कायमची तहशीलदारी होईल असें वाटत होतें परंतु आतां त्यांस कायम न करितां परत हायस्कुलांतील जाग्यावर जाण्याचा हुकूम झाला. व त्यांस पुन्हा तहशील मिळण्याचा संभव नाहीं असें पारडें कां फिरलें तें समजत नाहीं.

रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्र बुद्धे सबइंजिनियर यांस खामगांव व रा. रा. वामन रावजी भोळे सब इंजिनियर यांस एलिचपुर येथें नेमल्याचें समजतें.

## नोटीस.

नादारी मुकदमा नंबर ८. १८८६इ.

नमुना. ( जी. )

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हा आकोला.

सर्व लोकांस कळविण्यासाठीं प्र[illegible] करण्यांत येतें कीं, गोविंदा वल्लद बनासिंगजी वस्ती धामनगांव तालुके अकोट जिल्हे आकोलें

हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे. आणि तारीख १८माहे जून सन १८८६ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याजबद्दल ज्यास साक्षीसमक्ष करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवे दाखल करावी. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसपूर्वी तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरित नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीने ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असेल बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

ने सावकार दूरदूरचे राहणार असतील त्यांणीं ८ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल अफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपत लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी. म्हणजे ते दावे रजिस्टर दाखल होतील कळावें ता० २८।४।८६

Mohamad Yasinkhan,

ज्यड्ज्य.

## वर्तमानसार.

ग्रीस देशच्या एका उपदेशकानें आपल्या सेवकांस एके ठिकाणीं असा उपदेश केला आहे :—“ कोणत्याही प्राण्यानें ज्या भूमींत जन्म घ्यावा त्या जन्मभूमीची सत्ता परकीयाच्या ताब्यांत देऊन दास्यत्वांत राहण्यापेक्षां डुकरें ज्या खंदकांत आपलीं तोंडें खुपसून बसतात त्यांत जीव देणें अधिक योग्यतेचें आहे! स्वदेशांत राहणारे लोकांवर अन्य राजांचा हुकूम चालू होतांच त्यांनीं आपल्या दाढी मिशा उतरून मग जगांत वागणूक करावी! ( ग्रीक लोकांनीं या चालीचा बरेच दिवस उपयोग केला होता. ) अन्य राजाच्या ताब्यांत राहून कलत्रांवर हात फिरविणें ह्मणजे मातृस्तन चोळल्याप्रमाणें आहे! कालगतीनें इतरांच्या ताब्यांत राहण्याचा वक्त आल्यास सर्वांनीं मृत्यूची आराधाना करून त्याच्या स्वाधीन होणें जितकें वैभवास चढवील तितकें या परराजानें मोठाल्या पदव्या देऊन विराजित केलें तरी तें तितकें वैभवास चढविणार नाहीं. जे पुरुष आपल्या देशाकरितां मरतात तेच खरे शूर; त्यांच्याच मूर्ति पूजेस योग्य असतात. जे पुरुष वर्णाश्रमधर्माप्रमाणें आपापली कामगिरी बजावित [illegible] अजागलस्तनवत् जाणावे. जे पुरुष खांद्यावर तरवारी घेऊन नाचतात त्यांची योग्यता जुन्या कलमबहाद्दरांपेक्षां जास्त समजली पाहिजे. जो पुरुष इतरांचा दास बनून मोठ्या सभाजांत निर्लज्जपणानें परराष्ट्रांचा महिमा वर्णन करतो त्याला बिगुल ( तुतारी ) वाल्यापेक्षां जास्त मान देणें योग्य नाहीं! ज्यानें आपला हात शत्रूच्या रक्तानें भरवला नाहीं त्याचा तो हात पितरांची सेवा करण्याला योग्य नाहीं. जो पुरुष शौर्य दाखविल्याशिवाय मेला त्याची काहाणी घुबडाच्या घुमण्यासारखी समजावी. ( अद्यापि ग्रीस देशांतील उपाध्ये त्रस्थ सुजाण लोकांस उपदेश करतात कीं, “ बाबानो, विजयाचा मुगुट घालणें असेल तर देशहितासाठीं मरा, कीं जसा येशुख्रिस्त आपल्या धर्मासाठीं फांशी गेला!” खरोखर हा उपदेश ग्रीक लोकांनाच समजण्यासारखा आहे; व याचे ठसे उमटण्याला योग्य अशी त्यांचीच हृदयें होत!

स्पेन व पोर्च्युगाल:—हे दोन्ही देश एकत्र जुळून त्यांचे एकच स्वतंत्र राज्य करण्याचा विचार घाटत आहे. ड्यू डी मॉंठ पेन्शियर या नांवाचा एक अति श्रीमान् गृहस्थ स्पेन देशांत आहे. तो स्पेनचें राज्य विकत आपल्या पुतणीस देणार आहे असें ह्मणतात व त्या पुतणीचें लग्न पोर्च्युगीज राज्याधिकारी राजपुत्राबरोबर लावण्याचा त्याचा विचार आहे. असें झालें ह्मणजे अर्थात् तीं दोन्ही राष्ट्रें एकत्र होतील. परंतु असें होणें त्या देशांतील लोकांस इष्ट वाटतें नाहीं. हा विचार आज १० वर्षांपासून चालू आहे; परंतु त्या देशांतील लोकांचा परस्पर फार कट्टा द्वेष असल्यामुळें ती गोष्ट कशी अमलांत येईल ह्याबद्दल मोठा संशय आहे. चा० ता०

ब्रह्मदेशचें राजघराणें ज्यांत हल्लींचे पदच्युत झालेले महाराज सुपुत्र निर्माण झाले. ते फार जुनाट आहे. या घराण्यांत आजपर्यंत ५८७००० राजे होऊन गेले. असें तथील उपलब्ध इतिहासावरून समजतें. दुसऱ्या कित्येक ग्रंथावरून हें घराणें शंभर वर्षांहून अधिक जुनें नसून या घराण्याचा मूळ पुरुष ऊंगझाया या नांवाचा कोणी पारधी असावा असें समजतें. यांतून पाहिली माहिती अधिक विश्वासनीय आहे. एवढें जुनें घराणें आमच्या भाग्यशाली चक्रवर्तिनीच्या पायांवर थीबानें घातलें, शाबास त्या थीबाचें!

चारा जास्ती दिवस टिकविण्याचा उपाय—असा चारा ठेवण्याकरितां प्रथम ओढ्या जवळ एखादी जागा पसंत करावी ही जागा भोंवतालच्या प्रदेशापेक्षां साधारण मानानें उंच असावी, ह्मणजे दुसरीकडून पाणी ह्या जागेवरील पाणी चोहींकडे जावे. अशी जागा पाहून काढल्यानंतर तेथें पुरुषभर खोल, दोन तीन हात रूंद, साहा सात हात लांब अशी खळी खणावी भाद्रपद, आश्विन महिन्याचे सुमारास आपलेकडे हिरवा चारा जिकडे तिकडे विपुल असतो, तेव्हां तो कापून आणून ह्या खळींत दाबून भरून ठेवावा. नंतर ह्या खळीचे तोंडावर विखळ्याचा एक वीतभर थर द्यावा, व त्यावर दोन हात साध्या मातीचा थर घालावा.

ह्याप्रमाणें चारा ठेविला असतां तो दोन वर्षेंपर्यंत चांगला राहतो. अशा प्रकारच्या ठेविलेल्या चाऱ्यास एके प्रकारचा वाईट वास येतो खरा; पण तो वास गुरास आवडतो. हिरव्या चाऱ्यावर ज्या प्रमाणें गुरें चांगलीं ताजी राहतात, त्याचप्रमाणें अशा चाऱ्यावरही राहतात. ह्मणजे अशा प्रकारें चारा ठेविला असतां त्याचें सत्व नाहींसें होत नाहीं. वाळलेला चारा गुरास घालण्यापेक्षां असा चारा घालणें फारच हितावह आहे.

ही रीति प्रथम जर्मनींत निघाली. जर्मन लोकांचे पाहून फ्रेंच, अमेरिकन व इंग्लिश लोकांनींही आपापले देशांत ही वहिवाट सुरू केली. हल्लीं युरोपांत व अमेरिकेंत अशीं चाऱ्यांचीं पेवें शेंकडों आहेत

शेतकीखात्याचे डायरेक्टर ओझनी साहेब यांनीं ह्याचा येथें अनुभव घेतला आहे तसेंच, मि. उडरो येथील सायन्स कालेजांतील शेतकीचे शिक्षक व वनस्पतिशास्त्राचे प्रोफेसर यांनीं ही हा या गोष्टीचा अनुभव घेतला आहे.

तरी ही वहिवाट आपल्याकडे पुष्कळ फायदेशीर होईल असें वाटतें. कोंकण; मावळ इत्यादि डोंगराळ प्रदेशांत गवत पुष्कळ असतें. करितां ते जर हिरवे असतां वर लिहिलेप्रमाणें ठेविलें तर उन्हाळ्यांत फार उपयोगीं पडेल. तरी ह्याचा मावळांतील व देशावरील लोकांनीं अनुभव घेऊन पाहवा, अशी आमची विनंति आहे.

जे० ओ०

## नोटीस.

नादारी मुकदमा नंबर ९. १८८६इ.

नमुना. ( जी. )

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हा आकोला.

सर्व लोकांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध करण्यांत येतें कीं, राजमहमद वल्लद शेख याकुद मुसलमान वस्ती ताजनापेठ आकोलें हा नादार आहे असा आज तारखेस ठरला आहे. आणि तारीख १९माहे जून सन १८८६ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बदल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याजबदल ज्यास साक्षीसमक्ष करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावे दाखल करावी. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवसपूर्वी तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीन ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असेल बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दूरदूरचे राहणार असतील त्यांनीं ८ आण्याच्या स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल अफिसापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपत लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी. म्हणजे ते दावे रजिस्टर दाखल होतील कळावें ता० २८।४।८६

Mohamad Yasinkhan.


जडज्य.


J, VIOURSA AND CO: ESTABLISHED 1882.

We Warn the General Public of unscruplous advertisers putting up for sale worthless medicines after other names and at a less price claiming cure for Leprosy. PURCHASE GOODS ONLY FROM LONG STANDING FIRMS WHO ARE RELIABLE AND TRUSTWORTHY. Eye Disease. and &c.

**SKILLFUL PERFORMANCE**

*Prof: Bartholomy's "Strabo-Calix" for*

**SQUIN**  **CURE**

This manufactur and contrivance has been a great boon to many; rendering the EYE BALL Eye sigth fo its natural position and conciding to the axe of eye.

The " Strabo-calix, " is nearly the weight of a spectacle perhaps lighter and the performance is most simple and harmless, even a child can use it. To be used for two hours, morning and evening. It has quick result on a person who uses it regularly. Please state the size of your eye.

PER PAIR. Large / Medium / Small

**TTENTION! ATTENTION!!!**

To Maharajas, Nabobs, Zemindars, Talookdars, Gardeners and Lovers of Flowers.

"Florescence" or the Life of Flowers.

Secures development of blossom, perfection of foliage, forces most luscious and luxuriant fruits, vegetables and salads, greatly stimulats and quickens all vegetable growth. It' contains nothing that is poisonous. his famous powder is gifted wiht a fertilising strength equal to Guano and possesses the virtue of destroy ng insects from plants and trees.

To ladies who take an interest in their flowers both in-doors and out. "Florescence" particularly recommends itself as it is chemically prepared and has not the appearnce or character of what is known under the head of "Flower Manures For a small garden one large Tin will be sufficient for some months To be used once a week-

Large Tin...Rs. 5 }
Small ,, ... ,, 3 }

A Favor of Trial Solicited.

**NO MORE SPECTACLES & PAINFUL OPERATIONS.**

For the cure of all eye Diseases The famous Dr. Chase's Jordon Drops and his Cathartic Alterative has cured thousands, in India since the year 1882, even such cases that have been pronounced incurable by Eminent Oculists or Eye-Doctors.

Per Bottle Large... Rs. 4.
" " small... " 2-8
Cathartic Alterative " 4.

( True Copy )

BORN SHORTSIGHTED.

*Simla* 10th *August* 1883

I am suffering with short-sightedness since my infancy and if the drops really prove useful I shall get you a good sale by freely recommending it to the Native Community.

(*Writes again After using the medicine for 3 days.*) 16th, *Augst* 1883

Your favor of the 13th inst. together with the parcel to hand, please send one sonall bottle of Jordon to the address of Baboo Baisakhi Ram Hardyal, Cloth Merchant, Amritsar and one Large of the same to Sodhi Hukumsingh, Esq. Extra Asst. Commr. and Mir Munshi to Punjab Govt. Simla.

(Sd.) BHAGAT RAM.
Translator Punjab Govt. SECT.

BLIND.

*Nellore, Kavali* 9th *June* 18 4.

This is to testify that a sonall bottle of Jordan Drops used last year in a case ( blind on account of opacity of the cornea ) which was cured and the patient was all right.

J. BENJAMIN Hospital Asst.

EYE-DISEASES.

*27th October* 1884.

The Jordan Drops seems to be very effectual to those whom I have applied up to this time.

( sd ) HARI MHUN KABIRAJ

*Thousand marvellous cures* ! !

Dr. Chases siloum wash or the Original Lepra-cura.

This prepration is made of pure vegetable and other valuable ingredients. It has been experienced from a long time and now guranteed to be the only medicine ever discovered for the benefit of sufferers. It cures all skin and veneral diseases, Leprooy. Impotency, and removes Mercury from system of the blood. To be taken internally thrice a day.

Per Bottle Large--Rs. 20.
" " small--Rs. 15.

Ointment Rs. 4.

The magical power of siloam wash is that it forces out the unnatural heat from the Body by means of sores and Golden marks, and renders the part benumbed to its original power of feeling sensation. The sores and marks are emoved off by the mere external application of Sarza Ointment. One supply is suffieien for such plague of obstinate diseases.

J. Saviour and Co,
31, 32, Atnherst, Calcutta.


☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी “वऱ्हाडसमाचार” याचे छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, ,, १८८
किरकोळ अंकास......................८१

Six monthly............ 3 ,, 8 as
single copy.............................. 4 as

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आत रु१
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरे खेपेस ........८१

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XX AKOLA MONDAY 10 MAY 1886 NO 18

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख १० माहे मे सन १८८६ इ० अंक १८

रा. रा. रामचंद्र ... नगरकर
बी. ए. एल्. एल्. बी.
७ मुंबई हायकोर्ट वकील.
पत्ता — उमरावती. सेंट्रल जनरल
लायब्ररी बाजारी

नोटीस.

चिरंजीव सांगिदास मनसाराम राठी मारवाडी राहाणार नादोरा खुर्द यांस मोतीराम अशाराम मारवाडी राठी राहणार खंडाळा तालुके बाळापुर जिल्हा अकोला यानकडून कळविण्यांत येते कीं तुम्हीं तारीख १७ माहे एप्रिल सन १८८६ रोजीं वैदर्भ पत्रांतून नोटीस दिली ती पावली त्यांतील हकीगत समजली. त्याजबद्दल उत्तर कीं तुमचा आमचा कोणत्याही प्रकारचा संबंध राहिला नाहीं कळावें तारीख ३ माहे ... सन १८८६ इसवी.

( सही ) मोतीराम अशाराम राठी मारवाडी राहणार खंडाळे
दस्तुर खु.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळून असतील असें समजूं नये.

कामरगांव ता० ३।५।८६

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—
आकोला.

वि० वि० आपल्या पत्रांत खालीं लिहिलेल्या मजकुरास उदार आश्रय द्याल अशी आशा बाळगून चार ओळीं सादर करितों.

मि० बनाबा रामचंद्र ए० इ० वऱ्हाड. याजबद्दल आपल्या पत्रामध्यें त्यांच्या समोर व त्यांचे पाठीमागें बरीच चर्चा झालेली आम्ही पाहिली त्याजवर आमचे अल्प विचार सादर करितों. आम्ही त्यांस मुंबईस एल्फिन्स्टन साहेबांचे हायस्कुलांत अ० मा० होते त्या वेळेपासून जाणित आहों. त्यांच्या गुणा मध्यें एक वर्णनीय गुण हा होता कीं कोणत्या ही धर्माचा आणि कोणत्याही स्वभावाचा मनुष्य असला तरी त्यांस ते आवडत असत. याच गुणावरून त्यांस ए० इ० ची जागा मिळाली होती असें किसेकांचें म्हणणें आहे. हें म्हणणें कितपत खरें असेल ते असो. हल्लीं त्यांजकडेस असलेल्या हुद्याांत यथायोग्य गुण त्यांजमध्यें होते हें लिहिणें नको. कारण त्यांनीं याच प्रांतांत डे० ए० इ० चें काम सुमारें १६ वर्षांवर केलें होतें त्या वेळेस युरोपियन आणि नेटिव डायरेक्टर होऊन गेले परंतु त्यांजकडून अमूक काम वाईट झालें म्हणून त्यांस वरिष्ठांकडून चेक अगर नालायकी बद्दल नाखुषी कोणी ही दर्शविली नाहीं याजबद्दल मे० डायरेक्टर साहेबांचें रेकार्ड साक्ष देत आहे.

हल्लीं नूतन विद्वान लोकांचा असा समज झाला आहे कीं जेवढ्या लोकांनीं पदव्या मिळविल्या आहेत तेवढेच विद्वान, बाकीचे नाहींत. अशी म्हणण्याची पद्धतच पडून गेली आहे कीं नवीन तें चांगलें आणि जूनें तें वाईट. परंतु याचा परिणाम अगदीं उलट घडत असतो. यांस उदाहरण. या प्रांताचे माजी डायरेक्टर साहेब यार्णी या प्रांतांतील दोन्ही हायस्कुलांतील शिक्षकाबद्दल वार्षिक रिपोर्टांत लिहिलें होतें कीं आकोलें हायस्कुलांतील शिक्षक मंडळी बहुतेक पदव्या मिळविलेले असून उमरावती हायस्कुलांतील शिक्षक जुने आहेत, तथापि आकोलें हायस्कुलापेक्षां उमरावती हायस्कुल नेहमीं बरचाच नंबर मिळविते याजवरून हें सिद्ध करितां येतें कीं नव्या विद्वान लोकांपेक्षां जुने लोक बिलकुल कमी योग्यतेचे नसून, ते मेहनती व हुशार असतात.:—

२ डेपुटी ए० इ० आणि ए० इ० यांच्या कामामध्यें या प्रांतांत थोडाच फरक आहे तो असा कीं डे० ए० इ० हे १–५ इयत्तेंतील मुलांची परिक्षा घेतात आणि ए० इ० ६–८ पर्यंत घेतात. व या वरील इयत्ता अनम्याट्रिक्युलेट आणि म्याट्रिक्युलेटेड लोक शिकवितात तेवढेंच काम यांच्यानें होणार नाहीं असें कोणतिरी म्हणेल काय? हायस्कुलाची परीक्षा बहुत करून परभारे होत असती ती अशी कीं, सर्व विषयांचे प्रश्न डे. ए. इ. अगर प्रांतांतील दुसरे विद्वान लोक काढीत असून त्यांची तपासणी ही तेच करितात. फक्त तोंडी परीक्षा मात्र ए. इ. साहेब यांस घ्यावी लागते. एखाद्या कामास सदरहु इसम यथायोग्य लायक होते हें लिहिणें नको. मध्य प्रांतांतील वर्तमानपत्रास यांना जी जागा मिळाली होती ती पसंत पडली नव्हती. हा मोठा चमत्कार आहे. ज्या इसमाच्या गुणाची परीक्षा जितकी त्यांस पाहिल्यानें होणार आहे तितकी वर्तमानपत्रांतील उतारे घेऊन होणार नाहीं. शाळाखात्यांत हक्कानें बढती मिळविणें हें कृत्य महत्प्रयासाचें, मेहनतीचें, आणि नशीबाचें आहे. मि. एटकिन साहेब यांना डायरेक्टरची जागा मिळण्याबद्दल किती प्रयत्न केले होते हें सर्व वाचकांस माहितच आहे. परंतु इतकी खटपट व्यर्थ झाली. कैलासवासी गेलेले प्रधान हे पूर्ण दैवशाली मनुष्य होते असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं.

वऱ्हाडांतील देशमूखः—दक्षिण प्रांतापेक्षां या प्रांतांत हा भरणा फारच आहे. त्याजबद्दल थोडें येथें लिहितों. ब्राम्हण, वाणी, मुसलमान आणि कुणबी अशा चार जातींचे लोक देशमुखाचा हक्क सुमारें २०० वर्षांपासून घेत आहेत त्यांमध्यें कुणबी देशमुख म्हणविणारे मनुष्यास विचारिलें कीं तुमची जात कोणती, तर ते म्हणतात कीं "आमची जात देशमुख," पुन्हां उलट प्रश्न करावा लागतो, आहो देशमूख ही जात नाहीं तर हा हुद्दा आहे बरें तर किसेक म्हणतात कीं आम्ही क्षत्रिय आहो, रजपूत आहो, मराठे आहो आणि कुणबी आहो. कुणबी म्हणवून घेणें हें नीच आहे असें समजून, किसेकांनीं मागें झालेल्या खानेसुमारींत, रजपूत, मराठा आणि कुणबी असें लिहून दिलें आहे. आतां कोटांत जे फैसले होतात ते कुणबी असें साफ लिहितात, दुसरे यांच्या सोयरिका वगैरे कुणबी [ पाटील ] यांच्याशीं होतात, असें असतां ज्या जातींत ईश्वरानें आपणास निर्माण केलें आहे तीच जात खरी. व या लोकांपासून दुसऱ्या लोकांस फारच त्रास भोगावा लागतो तो येणें प्रमाणें:—बाजारामध्यें कपडा खेरीजकरून सर्व प्रकारची मालाची उकळीत करणें, खासगी कामाकरितां लोकांस बिगारीस नेणें, बैल आणणें, फळफळावळ जबरदस्तीनें नेणें घोड्याकरितां बरसातीं मध्यें दुसऱ्याच्या कुरणांतील गवत कापून आणणें, आपल्या शेतांत रस्ता असतां तो बंद करून दुसऱ्या शेतांत पाडणें हीं कर्मे त्यांची आहेत कळावें ही विनंती.

क्ष.

अकोलें प्रांत वऱ्हाड ता. ९।५।८६

"ए० इ० कोण होणार?"

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

नमस्कार वि० वि० आपल्या पत्रीं छापण्याकरितां चार ओळी पाठविल्या आहेत त्या छापण्याची मेहेरबानी व्हावी.

काळाची झडप मोठी कठीणच!! आज आमच्या वऱ्हाडांत विद्याखात्या मध्यें बरेच दिवस काम केलेले व १५ रुपयाचे नौकरी पासून १०० रुपयाचे नौकरीचे दर्ज्यापर्यंत आपल्याच खटपटीनें व उद्योगानें चढलेले आमचे लोकप्रिय रा. रा. बनाबा रामचंद्र प्रधान यांजवर काळाची झडप येऊन आकाशांतील कुऱ्हाड त्यांचे कुटुंबांतील माणसांवर येऊन पडेल असें स्वप्नींही कोणाच्या आले नसेल, परंतु उपाय काय? वेळ आली कीं हा मायेचा व संसाराचा पसारा सोडून देऊन काळाच्या जबड्यांत साहजिकच जावें लागतें !! इतकी गोष्ट जरी खरी आहे तरी प्रपंच संबंधीं व्यापार एक तरी राहतो काय? नाहीं. प्रधान यांचें दुःखकारक वर्तमान समजून १ दिवस सुद्धां झाला नाहीं, तोंच गावांत चर्चा सुरूं झाली ती:—

चवाठ्यावरील मंडळी.

( १ ) काय हो, बनाबांची अशी स्थिति होईल असें वाटलें होतें का?

( २ ) नाहीं हो. ते चैनीनें दोन महिने उन्हाळ्याचे दिवस मुंबईस काढण्याकरितां गेले. त्यांची प्रकृती साधारण बरी होती.

( ३ ) अहो, बरी कशाची, मागें त्यांच्यावरचें जीवावरचें दुखणें गेल्यापासून ते अशक्तच झाले होते.

( ४ ) बरे असो, त्यांचे वाईट झालें खरें, त्यास उपाय नाहीं. आतां त्यांच्या जाग्यावर कोणाची नेमणूक होणार? काहो तुमचा कसा काय होरा आहे?

( ५ ) मी खरेंच सांगूं. मागें नारायण भाईच्या वेळेस वर्तमान पत्र कर्त्यांनीं जी ओरड केली होती ती योग्य होती. तुम्हीच पहा, आज बरेच दिवस इन्स्पेक्टरचें काम केलेलें अनुभवशीर, हुषार पण ग्राजुएट नाहींत असें आमचे रा० बापट डे० ए० इ० उमरावती. यांची नेमणूक पूर्वीं न होतां त्यांचा हक्क मारून ए० इ० चे जागीं प्रधान यांची नेमणूक झाली. हें एक गैर झालें. म्हणून आतां तरी ए० कमिशन रिपोर्टांत सूचना केल्याप्रमाणें बापट यांस जागा मिळणें न्यायाचें होणार आहे.

आतां दुसरे काम करण्या लायख, विद्याविभूषित, लोक प्रिय, व ग्राजुएट रा. रा. विष्णुपंत महाजनी एम, ए. हेड मास्तर अकोला हायस्कूल यांची ए० इ० चे जाग्यावर नेमणूक होणें पुढील येणाऱ्या अडचणीकडे लक्ष दिलें असतां योग्य आहे. कांहीं दिवसांनीं ए० इ० यांस डायरेक्टरची जागा प्राप्त व्हावयाची याची कोणास ही शंका नाहीं. ए० इ० चे जागीं ग्राजुएट मनुष्य सरकार जितका आतां पसंत करतील तितका ग्राजुएट नाहीं अशा मनुष्यास पसंत करणार नाहींत हें निर्विवाद आहे. बापट यांची नेमणूक हक्काप्रमाणें झाल्यास डायरेक्टरची जागा त्यांस मिळणें कठीण, मग दुसऱ्या खात्यांतील कोणी नेटिव्ह मनुष्य अगर दुसरे इलाख्यांतील मनुष्य सरकारास आणावेंणें भाग पडणार आहे, तेव्हां बापट यांची नेमणूक ए० इ० चे जागीं झाल्यास ही पुढील अडचण; व तसें न होतां महाजनी यांचे विद्वत्तेकडे लक्ष देऊन त्यांस जागा मिळाल्यास बापट यांचा फार दिवसाचा हक्क दुसऱ्या वेळींहि

मारल्यातारखा होणार, तेव्हां हें काडं सोडविण्याचें काम आमच्या लोकप्रिय रावसाहेब अपरेकर यांचे वर येऊन पडल्यामुळें तेंही मोठ्या काळजीतच असतील. हें कोठें कसें काय सोडविलें जातें ह्याकडे लोकांचें सारखें लक्ष लागून राहिलें आहे. तरी एडिटर साहेब या कोड्याचा विचार होऊन तुम्ही कांहीं तरी समजूत पाडाल अशा करितां लोकांचा आशय आपल्यास कळविला आहे. लोभ असावा हे विनंती.

( एक वऱ्हाडी. )

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती वैशाख शुद्ध ७ शके १८०८

---

## हल्लींच्या तरुण विद्वानांची शारीरिक व मानसिक स्थिति.

सांप्रतकालीं या देशांतील तरुण विद्वान लोकांची स्थिति फार शोचनीय आहे असा चोहोंकडे गवगवा आहे. अमुक परीक्षा झाल्या म्हणजे त्या मनुष्याची दृष्टि मंद व्हावी, अन्नपचन होऊं नये; असें होतां होतां बहुतेकांस क्षयाची भावना होते व कित्येकांस हृद्रोग होतो व असें झाल्यानें ते अकालिक मृत्यूचे दाढेंत पडून आपले इष्टमित्रांचे दुःखास कारणीभूत होतात. अशी एक का दोन शेंकडों उदाहरणें नेहमीं आपल्या नजरेस पडतात. अशा उमेदवार होतकरू मंडळी नाहींशी झाल्यानें देशाचें फारच अकल्याण होतें हें स्पष्ट आहे कारण आज सारी मदार आमच्या विद्वान तरुण मंडळीवर आहे. या अकालीं नाशाचीं कारणें काय आहेत या विषयीं विचार करणें हें फारच महत्वाचें आहे. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं तरुण विद्वान मंडळींचीं लग्नें फारच लहानपणीं होतात व त्यामुळें त्यांचे शरीराची नासाडी होते. कांहीं लोक म्हणतात कीं इंग्रजी विद्येचे परिश्रम फार, यांत फाजील कष्ट मेहनत करावी लागते, वेबस्टर सारख्या लठ्ठ डिक्शनऱ्या उरावर घेऊन बसावें लागतें; यामुळें तारुण्यांत शक्तीचा न्हास होऊन रोग विकारांचें आरोपण होतें हीं कारणें कितपत खरीं आहेत याविषयीं प्रथमतः विचार करूं.

पहिलें कारण—लवकर लग्नें करणें हें कारण बहुतेक अंशीं ज्यांस हिंदुधर्माच्या रीतीभाति माहीत नाहींत त्यांनीं च काढलें आहे व त्यांची कोल्हेकुई ऐकून नवीन मंडळीपैकीं पुष्कळ लोक वेडावून जाऊन लहानपणीं लग्न करण्यापासून भयंकर परिणाम होतात असें मानतात व त्याप्रमाणें ओरडही करतात. बहुतेक हिंदु कुटुंबांतील मुलांचीं व मुलींचीं लग्नें जरी लहानपणीं होतात तरी साधारणपणें मुलगा अठरा वर्षांचा व मुलगी तेरा वर्षांची झाल्याशिवाय यांचा शरीरसंबंध होत नाहीं. ( हिंदुस्थान देशांतील स्त्री पुरुषांविषयीं ) ( हिंदुस्थाना सारख्या उष्ण देशांतील )स्त्री पुरुष लवकर पक्व दशेस साहजिकच येतात व म्हणूनच वर निर्दिष्ट केलेला काल प्रथम संगमास सर्वथैव अयोग्य आहे असें म्हणणें रास्त नाहीं. कदाचित पुरुष वीस वर्षांचा व स्त्री पंधरा वर्षांची होईपर्यंत त्यांचा संगम न होणें इष्ट असेल परंतु न झाल्यास सर्वथैव शक्तीचा न्हास होतो असें नाहीं. यास प्रत्यंतर एक असें आहे कीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वी आपले वाडवडील अशींच लहानपणीं लग्नें करीत असत परंतु त्या मुळें त्यांची शक्ति म्हणजे कमी होती असें नाहीं. ते लग्नें लहानपणीं करीत होते म्हणून आपणही तशींच करावीं असा अर्थ नव्हे परंतु कांहीं कालामागें जर आजच्याप्रमाणेंच व्यवहार चालू होता व जर त्यापासून दुष्ट परिणाम दृष्टोत्पत्तीस आले नाहींत तर आजच लहानपणीं लग्नें केल्यामुळें वाईट परिणाम कां व्हावेत? यावरून शक्तीचा न्हास होण्यास सर्वत्र हें कारण लागू आहे असें मानता येत नाहीं; व्यक्तिविशेषांस कदाचित अशीं लग्नें झाल्यापासून गैर फायदा झाला असेल परंतु हा नियम सर्व साधारण नव्हे हें स्पष्ट होय. दुसरें गुर्जर प्रदेशांतील मंडळी आपल्या देशांत प्रांतो प्रांतीं आहेच; त्यांचीं शरीरें केवळ पिंडखजूरा प्रमाणें असतात; तसेंच वाणी इ० ब्राह्मणेतर जातींत किंवा फार कशाला खेडेगांवांत जी ब्राह्मण मंडळी राहतात त्यांत काय व्यवस्था आहे. लहानपणीं लग्नें जशीं आपणांत आहेत तशीं त्यांच्यातही आहेत पण त्यांचीं शक्ति पूर्वीपेक्षां कितो कमी झाली आहे; यांच्या पैकीं लोक लहानपणीं लग्नें झाल्यानें किती मरतात? याविषयीं जरी आपणाजवळ सोनशाद नाहीं तरी केवळ लहानपणीं लग्नें झाल्यानें शक्तीचा न्हास झालेली मंडळी त्या लोकांत आपणास आढळत नाहीं. यावरून लहानपणीं लग्नें होण्यापासून मोठी हानि आहे असा जो पुकार आहे त्यास विषयीं बारकाईनें विचार केला असतां इतकें कळून येतें कीं या कारणाला जेवढा मोठा बाऊ करून दाखवितात तितका भयंकर परिणाम या कारणापासून होत नाहीं.

आतां इंग्रजी विद्या शिकल्यामुळें शक्तीत व आयुष्य हानि होतात असें जे म्हणणें आहे त्याविषयीं विचार करूं. प्रथम दर्शनीय वेदविद्या व वेदाभ्यास यांहून इंग्रजी विद्या फार भिन्न दिसते. वेदाभ्यास करतांना मनाच्या सर्व अंगांना मेहनत होत नाहीं म्हणजे वेदांच्या ऋचा म्हणणारांचें मेंदूस घोकलेल्या ऋचा स्मरण ठेवण्याचाच काय तो परिश्रम होतो; स्मरणशक्ति खेरीज जी मनाची इतर अंगें आहेत त्यांस तादृन्मात्र श्रम नसतो.

पुढें चालेल.

## राज्य व्यवस्थ प्रकरणी हक्क मिळविण्य विषयीं एतद्देशीय लोकांचे प्रयत्न आणि त्यासंबंधीं अपमतलबी आणि परोत्कर्षासहिष्णु परदेशस्थ लोकांची ओरड

X वरील शिरोलेख वाचून बहुतेक आमचे वाचक आश्चर्य करितील व आम्ही आपले नेहमीचे विषय सोडून हा राज्यप्रकरणी गहन विषय हातीं घेण्यास कसें धजलों हे त्यांस मोठें नवल वाटेल. परंतु यांत नवल कांहीं नाहीं. अलिकडे प्रसंग असे कांहीं विलक्षण येत चालले आहेत कीं स्वदेशाचा खरा कळकळा बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें सावध राहून परदेशस्थ लोकांच्या हाकाटीपासून आपल्या जनसमाजाच्या व प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचा बचाव करण्यासाठीं होईल तितका प्रयत्न केला पाहिजे. मेकाले किंवा त्यांचेच चेले क्रिस्तभक्त पाद्री या सारख्या गृहस्थांनीं आपली रीतीभाति, आपला धर्म, आपली विद्या आणि आपले अनेक विषयपर ग्रंथ यांवर हवी तशी बडबड करून मन मानेल तसा शेरा ठोकून दिला असतां तो "बाबावाक्य प्रमाणम्" या न्यायानें मुकाट्यानें ऐकून घेण्याचे व "हा खाविंद," "हां सरकार" इत्यादि उद्गार मुखांतून काढून एखाद्या पाळलेल्या कुत्र्याप्रमाणें खाविंद चरणारविंदीं मिलिंदायमान होऊन प्रसंगीं एखादा दुसरा चाबूक किंवा बूट पाठीवर मिळाला असताही महाप्रसाद म्हणून त्याचा स्वीकार करण्याचे दिवस आतां गेले. हल्लीं चोहोंकडे एकोणिसाव्या शतकांतील विद्येचा प्रकाश पडून त्याचे कांहीं किरण, वांकडेच कां म्हणाना, पण आमच्या ह्या आर्य भूमींतही आलेले आहेत व तेणेंकरून मिशनरी लोक आणि माशांचा अभिलाष करणाऱ्या पंचतंत्रांतील बनावट साधू बगळ्या प्रमाणें परोपकाराचा आव घालणारे इतर परदेशस्थ लोक यांनीं बोध करून सांगण्यापेक्षां आमचें हित आतां आम्हाला जास्त समजूं लागलें आहे. सुमारें ३० वर्षांपूर्वीं आमची स्थिति वास्तविकच दुसऱ्याच्या हातानें पाणी पिण्या जोगी होती परंतु हल्लीं जें कालांतर झालें आहे तें पाहून दुसऱ्याचें तेवढें वाईट असें मानणारे परदेशस्थ लोक देखील तोंडांत बोट घालतील. आपले लोक पूर्वीं नाम्रच सौम्य व नम्र असल्यामुळें व त्यांच्या अंगीं सुधारणा व विद्वत्ता यांच्या संबंधानें असावी तेवढी योग्यता अनेक कारणामुळें नसल्याकारणानें आमचे सरकार व त्याचीं इंद्रियें बनून गेलेले इंग्रज लोक जे जें म्हणतील किंवा करितील त्याला त्याला ते "हो हो!" म्हणत गेले. परंतु आतां आपची वास्तविक स्थिति पूर्वींप्रमाणें नाहीं हें कोणताही प्रांजल मनाचा पुरुष कबूल करील. गेल्या तीस वर्षांत विद्या, कला व शास्त्र या संबंधानें आमच्या देशांत ज्या मोठमोठ्या घडामोडी झाल्या आहेत त्या खरोखरच नवल वाटण्या जोग्या आहेत. सरकारानें आम्हाला विद्यामृत पाजण्यास आरंभ केल्यापासून विद्वत्तेची कसोटी पाहणाऱ्या युनिव्हर्सिट्या त्यांतून हजारों "लिबरल एज्युकेशन" घेऊन आहेत व प्रतिवर्षीं निघत हीं आहेत. व्यावहारिक ज्ञानाच्या मानानें पाहिलें तरी आमचें पाऊल मागें आहे असें नाहीं. व्यापारांचीं प्रसिद्धस्थलें, कौन्सिलहालस्, न्यायाचीं कोर्टें, पाठशाला, कलाकौशल्याचीं ठिकाणें या सर्वांमध्यें आमचे लोक आपल्या अलौकिक बुद्धिचातुर्यानें गाजत आहेत. राजप्रकरणीं प्रत्येक कामांत अनुभवशीर व वहिवाटलेल्या कोणत्याही पाश्चिमात्य राज्यकारस्थानी पुरुषाशीं प्रसंग विशेषीं ते सामना करण्यासारखे आहेत. असे असतां "जो मृदु जगे तों तों दडपी शिशु ऊन ऊन भात ते" या न्यायानें आमचे सरकार जर दिवसेंदिवस आम्हाला दडपून टाकण्यास पाहूं लागलें तर आम्ही स्वस्थ कां बसावें! आमचें सरकार न्यायी दयाळू निःपक्षपाती असें चोहोंकडे गाजत असतां आम्हाला जर त्याचा अनुभव येत नाहींतर आम्ही काय करावें? अहुावण सालीं प्रसिद्ध जाहीरनाम्यांत सव्वाहात लांब गप्पा झोकून आतां आपमतलबी व कोत्या मनाच्या कांहीं स्वदेशस्थ लोकांच्या ओरडीकडे लक्ष देऊन आमचें सरकार जर मनमानेल तसे कर आम्हावर लादूं लागले तर तो न्यायीपणा व तो निःपक्षपातीपणा गेला कोठें! Xतिगस्त सालचा इल्बर्ट बिलाच्या वेळचा प्रसंग आमच्या वाचकांस आठवत असेलच.

पुढें चालेल.

---

# The Berar Samachar

MONDAY MAY 10

1886

---

## LEGISLATION IN INDIA.

*(By A. P. Howell C. S.)*

(Continued from our last issue.)

The simple savage will reply that he is a poor man, and knows nothing of easements, and cannot afford a pleader. He must then be informed that such is the law, and that it is one of the merits of our system that the law is the same for rich and poor alike. Can it be maintained that the Easements Act, any more than the Specific Relief Act finds any warrant in the constitutional scheme of Indian legislation, or that the passing of them is not clearly amenable to Sir H. S. Maine's censure?

Nor is this all. The large importation of technical law necessarily displaces a more than proportionate amount of native custom. If the excellence of a legal system can be gagued by the absence of lawyers, as the healthiness of a locality by the absence of doctors, native customs in respect of leases, mortgages and common agreements had at least the merit of serving its own purpose. Until recently the agricultural communities of India, that is, the great bulk of the population have been in the habit of managing their own affairs in their own way. The barrister and the pleader are of our recent creation, while except in the

presidency town, there are even yet no solicitors or conveyancers, barristers and pleaders dealing with litigants direct. In England no sane man thinks of touching mortgage or even a common agreement without a lawyer at his elbow, and the unwisdom of being one's own lawyer has passed into proverb. In India the moneylenders, that is, most well-to-do agriculturists, have been in the habit of drawing up all their own legal documents, rudely no doubt, but still so as to be a fair guide to the mutual intentions of the parties. If disputes arose, native custom all over India would settle them cheaply and expeditiously by a system of arbitration (punchayet) so excellent as to be recognised in those Acts whose tendency it is to abolish arbitration. But now as our laws are rapidly becoming unintelligible to all professional lawyers, and as the profession -al but lawyer, class is largely on the increase in wealth and numbers, a standard of legal skill and knowledge is being introduced, which bears very hardly upon those who do not come up to it themselves, and cannot afford to hire it. The ordinary natives can no l ng remanage his own affairs. It must be borne in mind, too that the very large majority of Indian judges are not trained lawyers, are not lawyers in any sense, and that many of them are besides overburdened with executive duty. The result is that the executive work, in which, the great body of the people is most interested, is hurried over in order that the amateur judge may find time to elaborate something in faint resemblence to a professional judgement, as this part of his work may come before his appeal and stand on record against him. The professional bar which makes a business of the study of the law, is stronger than the amateur bench, and this is the secret of the enormous fees which litigants in a very poor country still find it worth their while to pay for legal assistance. Over and over agair I have herd natives say that a man has been convicted or lost his case, not because he was guilty or had the worse case, but because he had no barrister to appear for him. I am far from undervaluing the immense advantage which a judge derives from a well informed bar, but I still hold that the causes which have suddenly placed so high a premium on the legal profession in India are a great hardship to the masses, and especially to the poor, and that the multiplication of the pleader class, and the ousting of the old landholder class, are great political evils. The growth of the bar, and the increase of litigation, are constantly held up in annual reports as gratifying evidence of an advance in legal efficiency and increased confidence in our Courts. As well I venture to think, might we look upon the multiplication of doctors and undertakers, and the increase of pawnbroker's tickets as satisfactory proofs of increased professional or commercial activity.

The multiplication of English barristers and English-speaking pleaders, and still more, the predominance of the barrister element in the highest courts of appeal, naturally tends to leaven the whole Bench with English law. Our Judges even in the lower grades are beginning to plume themselves on citing English case law and text books——often to the neglect of that accuracy in the statement of facts on which most decisions really turn. Where a Judge would have been content a few years ago to satisfy his own sense of the merits of a case, he must now satisfy his ambition to show that he also can cite English ruling and precedent. In a recent case of some importance I was encountered by a ruling taken from a decision of Sir. G. Jessel, uttered without any reference to India, and yet made the basis of a decision in an Indian appeal. As our Courts of first instance have no access to such decisions, it seems to me to be productive of hardship and uncertainty, that a suitor at the last stage of his case may find him self worsted by a ruling taken from a source which he could not foresee.

If the English system were the best of all possible systems, it would still be a matter of regret that it should displace native customs, which serve their purpose, and are familiar to the people. It was, perhaps, inevitable that English manufactures should displace native manufactures, and thereby throw whole classes out of their traditional employ. All the world over, free trade must have its victims, who find what consolation they can in the alleged good of the greater number and the superior excellence of the imported article. But no such compensation is forth coming here. The best authorities agree in inability to find terms to express "the amazing inefficiency confusion, doubtfulness, and delay which, proverbial from earliar times continue still in English law". Though the Judges are supposed to be acquainted with it, Judges themselves have admitted that, as no human mind can master English law, ignorance has ceased to be a disgrace. The only parallel to the voluminous intricacy of the criminal law, is the similarly "multitudinous, involved, unclassified" civil law, aggravated by daily increasing records of the case law. "Session after session this confusion is being made worse counfounded by the passing of separate Acts and successive amendments of Acts which are left unconnected with the multitudinous kindred Acts and amendments that lie scattered through the heaped records of centuries." This is the system which our ablest Judges, especially in the higher Courts, aided by the English and English-speaking Bar, are doing their best to make prevalent in India, and which, unless a decided stand be made by competent authority, will soon press as heavily up on the natives as it does upon us in England, who have the misfortune to be used to it, and who, at the worst, can purchase from the ubiquitous lawyer some small measure of relief. Surely, then, we must admit that for India to import English law, is as irrational as for England to import Indian science.

It will, perhaps be objected that the Acts to which exception has been taken are a portion of the work of the Indian Law Commission which, as a body appointed in England and working in England, is not amenable to an order of the Indian Government I would ask the objector whether that Commission has any and what authority to override the Indian Councils Act, and whether the orders of 1873 did not express the spirit and letter of that Act? How and when the Indian Law Commission was appointed, with what objects, for what period, and at what cost, are some of the many things not generally known, and might in these days of extreme financial pressure, well come under re-consideration; for if there is one luxury of administration with which, more than another, the whole Indian public would most dispense, it is the costly superfluity of technical law. Ruffles for the shirtless are in no sense more anomalous, than easements for Bhils and Gonds and savages of the same calibre. A more valid objection might be raised on the ground, that the legislative needs of a great Empire are not to be measured by the capacity of its administrators of the day; that the object of the Government has been to bring the law up to the level of the English standard of completeness; that a system of scientific law is one of the best and most rapid educators, of the people; and that if portions of the Empire are backward, that is no reason why all including the more advanced, should not share in the great boon of a scientific legal system, adapted from the best sources to the circumstances of India. This objection, besides assuming a great deal raises the question of the theory of legislation as to which I can only hope here to invite discussion. Is it the case, I would ask, that the theory propounded by Bentham is obsolete—that all legislation is an evil, only warrantable when the legislator is assured of the existence of an evil capable of correction and that his legislation will correct it? Tried by this standard, full warrant may be found for our Penal and Procedure Codes, the Evideuce and Stamp Acts, and for other general Acts of the same class, as also for special enactments designed for local or temporary objects. But surely measures of this character differ from those which define or create altogether new lights and new penalties. In the large majority of Acts of the latter class, there is no mention of the existence of an evil to be remedied, and no pretence that the measure in hand will remedy it. The usual statement of objects and reasons which accompanies an Act, is restricted to the enumeration of the sources from which the Act is taken, and of the legislator's personal acquaintance with those sources. Legislation. so originating, ails altogether to be the prescription and the remedy which Bentham contemplated. The legislator of the present Indian type inficts his prescriptionupon millions of the human race, not because they want it, or will be the better for it, but because he has, or thinks he has, a vast knowledge of prescriptions. Would any one who could help it, con-sent te be sodoctored in the gross, without regard to his symptoms, and can any theroy of legislation justify the impotition of Procrustean Acts not originating in the circumstances of the people but requiring those circumstances to conform as best they can to some arbitrary standard? I offer no opinion on the abstract merits of any of the Acts cited or referred to. They are the work of extremely able men in their own speciality, and their drafting is no doubt faultless from their own point of view. But legislation in the abstract does not seem within scope of practical polities. It is certain that there are millions who do not want such Acts at all, and whose lives would be easier without them. It is too often forgotten that the Indian Empire is a bundle of nationalities, differing as the Esquimaux from the Neapolitan. Hence, in reply to the common enquiry what "the natives" think of this or that measure, or of this or that man the only safe answer is that millions never heard of the one or the other, and that of the rest some think one thing and some another. If English statesmen find it no easy task to contrive an Act for Ireland, or any single section of Great Britain, what would be the difficulty of a measure intended for application to all Europe? And yet Indian legislation jauntily applies Act after Act "to all British India." As the limit of necessary general Acts has long since been reached in India, it would seem that henceforth the legislature should be content with the humbler task of watching the laws actually in force, simplifying their operation, remedying real evils discovered in practise, eleminating some uniformity from the decisions of the Privy Council and the concurrent High Courts; and still more, with the best of all legislation the repeal of previous legislation. It must be remembered that the oriental mind is strictly conservative, and does not share in that admiration for reform which characterizes the West. A recent Governor on the occasion of the opening of an Industrial Exhibition, then a novelty, asked a native of the old schoo whether he was not pleased at the probable development of local resources "My Lord," said the old man, with uplifted hands, "first the cyclone came and then the Exhibition, we poor people are being runied." In the early days of the Empire, the people suffered from the rapacity of new arrivals each requiring to be satisfied. The rapacity has long since ceased, but the suffering remains and will remain, if each new arrival to power is permitted to let loose his own packet of specialities, scientific or benevolent. Sir A. Hobhouse threw in Specific Relief Mr. Stokes Easements, and here are ominous rumours that Mr. Ilbert will consider his term of office unworthy of his distinguished predecessors if he does not bequeath us an imperil system of "torts:" I have no hesitation in saying that the people at large do not require any information about torts:- *Calcuta Statesman.*

## वऱ्हाड

मे. डे. क. साहेब बहादूर यांची स्वारी उन्हाळ्या निमित्त गेल्या आठवड्यांत नरनाल्यास गेले आहेत.

" वऱ्हाड आईलमिल ( तेलाची गिरणी ) कंपनी लिमिटेड "

जाहिरात.

वरील कंपनीच्या डिरेक्टरांची तारीख १० रोजीं जी सभा भरली तींत असा ठराव झाला कीं प्रत्येक भागावर पहिली मागणी २५ रुपयांची करावी व हे रुपये तारीख १२ मे १८८६ चे आंत मुंबई बांकच्या खामगांव व उमरावती येथें ज्या शाखा आहेत आंत किंवा मुंबईस हांगकांगशांघाय बांकेंत भरावे.

या मुदती बाहेर ज्या कडेस रकम राहील त्यावर दरसाल दरशेकडा ९ रुपये प्रमाणें व्याज आकारले जाईल.

बोर्डाचे हुकुमावरून बनाजी कतूक आणि कंपनी म्यानेजर व एजंट.

१९ चर्चगेट स्ट्रीट मुंबई ता. १।४।८६।

## वर्तमानसार.

मध्यहिंदुस्थानांतील रतलाम नांवाच्या सुंदर शहरास आग लागून तें तीन दिवसपर्यंत सारखें जळत होतें. आग विझविण्याकरितां नाना प्रकारचे इलाज केले, परंतु चौथे दिवशीं मात्र विझली. या शहरांत व्यापार चांगला चालत असल्यामुळें या आगीनें कित्येक लक्षांचें नुकसान झालें असें सांगतात.

रेवासंस्थानचे पोलिटिकल एजंट व सुपरींटेंडेंट यांच्या अनुभवास असें आलें आहे कीं. वकील व बारिस्टर हे इन्साफाचें काम चांगल्या रीतीनें शेवटास जाण्याकरितां मदत करण्याच्या ऐवजीं खरा न्याय न होण्याच्या कामांत उपयोगीं पडतात. यासाठीं यापुढें होता होईपर्यंत दिवाणी व फौजदारी खटल्यांत वकील बारीस्टर न येतील असें त्यांणीं योजिलें आहे.

दुष्काळ निवारणार्थ कांहीं वनस्पती हिंदुस्थान देशांत लावाव्यात म्हणून आमचे सरकारचें लक्ष लागलें आहे. खजुरीचीं झाडें विन पाण्या शिवाय किंवा थोड्याशा पाण्यानें येतात म्हणून तीं लावण्याची सुरवात झाली आहे. त्याच प्रमाणें दक्षिण अमेरिकेंत "आराकाचा" नांवाचा कंद विन पाण्या शिवाय चांगला येतो, तोही लावण्याचा क्रम सुरूं आहे परंतु अद्याप ह्या कंदाची लोकांस माहिती नाहीं. हा कंद रताळी व गाजरे ह्या सारखा लावण्याचा प्रचार जर शेतकरी लोक सुरूं करतील तर सहजीं होणार आहे ह्या बद्दल मुंबई समाचारानें आपले जे विचार प्रदर्शीत केले आहेत ते फार योग्य आहेत व त्या प्रमाणें व्यवस्था करण्यास सरकारानें झटावें. दी० बं०

तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर बाजाराची खेडी वसवून व्यापाराची वृद्धि करावी असें इंग्रज सरकारनें इजिप्तच्या सरकारास सुचविलें. या विषयीं युरोपांतील दुसऱ्या प्रमुख राष्ट्रांचें मत घेतां त्यांनीं यांत कांहीं इंग्रज सरकारचा राजप्रकरणीं कावा असेल अशा संशया वरून तसें करण्यास प्रतिबंध केला.

पारीनाफ या नांवाचें तेल एक रशियन रसायनशास्त्र वेत्त्यानें तयार करण्याची युक्ति काढली ते केरोसिन तेला प्रमाणें स्वस्त पडत असून अकस्मित पेट घेत नाहीं व त्या पासून धूर होत नाहीं असें रशन रजिस्ट्रार वरून समजतें.

एक वर्षा पूर्वीं निजाम सरकारानें त्या संस्थानाकडे ज्या कोणाचे घेणें असेल त्याची चौकशी करण्या करितां कमिशन नेमिलें. तेव्हां सुमारे पांच कोटि रुपयांचे दावे लोकांनीं कमिशन पुढें आणिलें त्या पैकीं निमे निजाम सरकाराकडे घेण्याचे केलेले दावे गैरवाजवी केले आहेत असें ठरलें.

पासिफिक महासागराच्या किनाऱ्यावरून जे.सी.फोर्ड नांवाचें जहाज जात असतां त्यावर नक्षत्रें पडल्यामुळें त्यांत केरोसिनचें तेल वगैरे जळाऊ प्रदार्थ होते त्यास आग लागून जळून गेले. सु० प०

काबूल व काबूलच्या आसपास महागाई फार सुरूं झाली आहे.

पश्चीमाच्या हद्दींत मशीदच्या शेजारी कोळशाच्या खाणी सांपडल्या आहेत आणि त्याचप्रमाणें अफगाणच्या हद्दींतही पुष्कळ कोळशाच्या खाणीं सांपडल्या आहेत. आणि त्यांचें कामही सुरूं आहे.

√ तंजावर प्रांतातला थकलेला जमीन धारा वसूल करण्याच्या बाबतींत मद्रास सरकारचा जो सक्त हुकूम झाला आहे त्याच्या योगानें तिकडील प्रजेंत फार नाखुषी उत्पन्न झाली आहे आणि त्या संबंधानें त्या लोकांत मोठाल्या सभा होत आहेत आणि त्यावरूनें मद्रास सरकारनें वसूल बाकीचें काम तूर्त तहकूब ठेवले आहे.

दक्षिण आस्ट्रेलियामध्यें १९,५०००० एकर जमिनींत गहू पिकविला जातो. पैकीं या वर्षी ३,१०००एकर जमीन मुळींच लागवड केली नाहीं. या वरून यंदा १६,३०००० एकरच जमीन लागवड केली, यावरून ५१.६१,६६६ बुशील गहू उत्पन्न झाला. या गव्हांतील खाण्याकडे व इतर कामाकरितां उपयोग केल्यानंतर फक्त ३,६००टन गहू बाहेर जातो.

बडोद्याचे चीफ जस्टीस मि. खरशेटजी रस्तमजी हे इतक्यांत पेन्शन घेत नाहींत

थीबाव यांस किती नेमणूक ठरवावी यानकरितां मि. क्राफर्ड सिमल्यास जात आहेत.

इंग्रजास आपल्या राज्यांत शिकारीस येण्याचे काश्मीरच्या राजानें हल्लीं बंद केले आहे.

ब्रम्हदेशांत हल्लीं २० हजार फौज व कांहीं तोफखाना असूनही दंगेधोपे सुरूंच आहेत.

मुंबईच्या मंगळदास नथुभाईच्या मुलानें हिस्सा घेण्याचे बाबतींत केलेल्या फिर्यादीचा निकाल झाला व त्यांत मंगळदासच्या बापानें मृत्युपत्र करून जी मंगळदासास मिळकत दिली आहे तिचा गहाण, फरोक्त न देतां उपभोग घेण्याचा मंगळदासास पूर्ण अधिकार आहे असें ठरलें व मंगळदासास स्वसंपादित मिळकतीचाही तसाच अधिकार आहे. वांटणीच्या मुद्याबद्दलचा खर्च मुलावर पडला. आणि बाकीचा खर्च वडिलार्जित मिळकती वर पडला.

नार्थवेस्ट प्रांतांसाठीं वेगळे कायदे कौन्सल असावे असें हिंदुस्थानसरकारचें म्हणणें असून त्यांची ती सूचना मंजूरीकरतां लवकरच स्टेट सेक्रेटरीकडे जाणार आहे.

जटघ येथील एक तोफखाना तावडतोबीनें ब्रम्हदेशांत रवाना झाला आहे.

शिंदे महाराज हे या उन्हाळ्याकरतां सिमला येथें थंड हवेवर जाणार आहेत व त्या वेळीं आपल्या राज्यव्यवस्थेची कहाणी ते गव्हरनर जनरलापुढें मांडणार आहेत असें सांगतात.

काटकसर करणारी कमेटी कस्टम खात्यांत बरीच काटाकाटी करील असें दिसतें; कारण आतां जकातीचा माल कांहींच राहिला नसून त्या खात्याच्या मुख्यास २,००० रुपये पगार असून शिवाय १,००० रुपये दरमहाचा त्यास एक असिस्टणही आहे.

कुसवली, डघशाई व सिमला यांच्या दरम्यान चांदीच्या दोन खाणी असून शिसें व कथील यांच्याही आहेत आणि बोलन खिंडींत एक कोळशांची खाण सांपडलीच आहे. कोजक खिंडींतही कोळशाच्या खाणी आहेत असें आढळून आलें आहे. हिंदुस्थानांत वेगळाल्या खनिजपदार्थांच्या हव्या तितक्या खाणी सांपडतील, पण त्यांचा फायदा मात्र हिंदुस्थानच्या लोकांस न मिळतां युरोपियन लोकांस मिळेल.

अ० द०

वायव्य प्रांताकरितां एक स्वतंत्र कायदे कौन्सिल करण्याचा सरकारचा विचार आहे.

सर लेपेल ग्रिफन यांस सर आर थामसन यांच्या जागीं बंगालचे ले० गव्हर्नर नेमिलें जाईल असें म्हणतात. ज्ञा०सु०

---

नोटीस.

लळिता जवजे मनाजी देशमुख वस्ती तेल्हारे इजला कळावें कीं तेल्हारे येथील शेत स० नंबर ८६ निशाणी मळ्याचे. त्या पैकीं निमे भाग कोर्ट मार्फत आमचे ताब्यांत येण्यास दिवस १५ झाले असोन ते दिवसापासून आजपावेतों तुमचेही निम्मे हिस्याचे बागाईतास पाणी वगैरे आम्हीच देतो. करितां तुम्हांस कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून दोन दिवसांत सदहुं बाहितापैकीं निम्मे भागास पाणी वगैरे देण्यास तुमचे मनुष्य पाठवावें व निम्मे फळबार वगैरे घेऊन जावे या प्रमाणें न केल्यास आम्ही सर्व शेतात पाणी वगैरे देऊन निम्मे माल त्या खर्चाकरितां विकत जाऊं कमी राहिल्यास तुमचे पासून घेऊं मग तुमच्या हिस्याचे फळबारा बद्दल आम्ही कांहींच जबाबदार राहणार नाहीं कळावें तारीख१ माहे एप्रिल सन१८८६इ.

(सही) शिवलाल गुलाबचंद वाहिवाटदार लक्ष्मण रामचंद्र आपदे दस्तुर खुद.

---


J, VIOURSA AND CO: ESTABLISHED 1882.

We Warn the General Public of unscruplous advertisers putting up for sale worthless medicines after other names and at a less price claiming cure for Leprosy. PURCHASE GOODS ONLY FROM LONG STANDING FIRMS WHO ARE RELIABLE AND TRUSTWORTHY. Eye Disease. and &c.

**SKILLFUL PERFORMANCE**

*Prof: Bartholomy's "Strabo-Calix" for*

**SQUIN**  **CURE**

This manufactur and contrivance has been a great boon to many; rendering the EYE BALL Eye sigth fo its natural position and conciding to the axe of eye.

The "Strabo-calix," is nearly the weight of a spectacle perhaps lighter and the performance is most simple and harmless, even a child can use it. To be used for two hours, morning and evening. It has quick result on a person who uses it regularly. Please state the size of your eye.

PER PAIR. | Large Medium Small

**TTENTION! ATTENTION!!!**

To Maharajas, Nabobs, Zemindars, Talookdars, Gardeners and Lovers of Flowers.

"Florescence" or the Life of Flowers.

Secures development of blossom, perfaction of foliage, forces most luscious and luxuriant fruits, vegetables and salads, greatly stimulats and quickens all vegetable growth. It' contains nothing that is poisonou s his famous powder is gifted wih a fertilising strength equal to Guano and possesses the virtue of destroying insects from plants and trees.

To ladies who take an interest in their flowers both in-doors and out. "Florescence" particularly recommends itself as it is chemically prepared and has not the apparnce or character of what is known under the head of "Flower Manures.

For a small garden one large Tin will be sufficient for some months To be used once a week.

Large Tin...Rs. 5 }
Small „ ... „ 3 }

A Favor of Trial Solicited.

**NO MORE SPECTACLES & PAINFUL OPERATIONS.**

For the cure of all eye Diseases The famous Dr. Chase's Jordon Drops and his Cathartic Alterative has cured thousands, in India since the year 1882, even such cases that have been pronounced incurable by Eminent Oculists or Eye-Doctors.

Per Bottle Large... Rs. 4.
" " small... " 2-8
Cathartic Alterative " 4.

( True Copy )

BORN SHORTSIGHTED.

*Simla 10th August 1883*

I am suffering with short-sightedness since my infancy and if the drops really prove usefu I shall get you a good sale by freely recommending it to the Native Community.

(*Writes again After using the medicine for 3 days.*) 16th, Augst 1883

Your favor of the 13th inst. together with the parcel to hand, please send one sonal bottle of Jordon to the address of Baboo Baisakhi Ram Hardyal, Cloth Merchant, Amritsar and one Large of the same to Sodhi Hukumsingh, Esq. Extra Asst. Commr. and Mir Munshi to Punjab Govt. Simla.

(Sd.) BHAGAT RAM.
Translator Punjab Govt. SECT.

*BLIND.*

*Nellore, Kavali* 9th June 18 4.

This is to testify that a sonall bottle of Jordan Drops used last year in a case ( blind on account of opacity of the cornea ) which was cured and the patient was all right.

J. BENJAMIN Hospital Asst.
EYE-DISEASES.

*27th October* 1884.

The Jordan Drops seems to be very effectual to those whom I have applied up to this time.

(sd) HARI MHUN KABIRAJ

*Thousand marvellous cures* ! !

Dr. Chases siloum wash or the Original Lepra-cura.

This prepration is made of pure vegetable and other valuable ingredients. It has been experienced from a long time and now guranteed to be the only medicine ever discovered for the benefit of sufferers. It cures all skin and veneral diseases, Leprooy. Impotency, and removes Mercury from system of the blood. To be taken internally thrice a day.

Per Bottle Large--Rs. 20.
" " small--Rs. 15.

Ointment Rs. 4.

The magical power of siloam wash is that it forces out the unnatural heat from the Body by means of sores and Golden marks, and renders the part benumbed to its origina power of feeling sensation. The sores and marks are emoved off by the mere external applie cation of Sarza Ointment. One supply is suffieien for such plague of obstinate diseases.

J. Saviour and Co.
31, 32, Atnherst, Calcutta.


---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी यांचे "वऱ्हाडसमाचार", छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, ,, १।८
किरकोळ अंकास........................।४

नोटिशी बदल
१० ओळीचे आत रु १
पुढें दर ओळीस ।१।६
दुसरे खेपेस ........।१

Six monthly........... 3 ,, 8 as
single copy........................... 4 as

Advertisements
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition perline

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XX AKOLA MONDAY 17 MAY 1886 NO 19
पुस्तक २० अकोला सोमवार तारीख १७ माहे मे सन १८८६ इ० अंक १९

रा. रा. रामचंद्र दाजी नगारकर
बी.ए. एल्. एल्. बी.
मुंबईहायकोर्ट वकील.
पत्ता उमरावती. नटोब जनरल
आयब्ररी शेजारी

## विक्रीस तयार.

## कामकंदला नाटक.

आवृत्ति २ री.

ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति सन १८८१ साली प्रसिद्ध झाली. परंतु ती संपल्यामुळें सोतच प्रत्येक ठिकाणीं फेरबदल व सुधारणा करून रा० रा० एकनाथ गणेश भांडारे, मॉर्स सिम्लर, जी० आय० पी० स्टेशन जबलपूर, ह्यांनीं ही दुसरी आवृत्ति केली आहे. ती आम्ही त्यांजपासून हक्कासुद्धां विकत घेऊन छापून तयार केली आहे. अक्षतिसंगापासून, स्त्रीनें परपुरुषावर, व यानें परस्त्रीवर पापवासना धरल्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांचें, स्त्रीसाहसाचें, स्त्रीचातुर्याचें, सुशिक्षित स्त्रीच्या सद्वर्तनाचें, व वेश्यासक्त पुरुषांस साह्य केल्यापासून मोठ्या राजांच्या सुद्धां होणाऱ्या हानीचें उत्तम रीतीनें दिग्दर्शन करण्याचा रा० भांडारे यांनीं बराच यत्न केला आहे. प्रत्येक पत्राच्या तोंडीं, त्याच्या योग्यतेप्रमाणें शुद्ध भाषणें व सुलभ व सुंदर कविता घातल्या आहेत ह्यात मुख्य रस शृंगार करुण असल्यामुळें हें नाटक करुणरसपर्यवसायी झालें आहे. ह्याच दोन रसांच्या अंतर्गतवीर व उदात्त हे दोन रस शिवाय आहेत. कागद मोहरेदार व टाईप उत्तम घालून ह्या पुस्तकाची बांधणी मोठी सुरेख केली आहे. पृष्ठें डेमी अष्टपत्री सांचाचीं १६०वर झालीं आहेत. सारांश करवली तितकी सुधारणा करून ही आवृत्ति तयार केली आहे. हें पुस्तक घेण्यास सर्वांस सुलभ पडावें म्हणून आम्ही ह्याची किंमत एक रुपया ठेविली आहे शिवाय ट० ख० दोन आणे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं ट० ख० सुद्धां रोख किंमत पुणें पेंठ बुधवार येथें आम्हांकडे पाठविल्यास पुस्तक तावडतोब रवाना केलें जाईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक.

सर्व लोकांस जाहिरात.

भगवंत वामन देशपांडे आकोट यांजपासून वडिलोर्जीत जिंदगीचा हिस्सा आम्हास घेणें आहे यास्तव सर्वांस विनंती करण्यांत येते कीं वडिलोर्जीत जिंदगी म्हणजे शेती वगैरे भगवंतरावपासून कोणी विकत घेऊं नये किंवा गाहाण ठेवूं नये घेतल्यास ते विनाकारण नुकसानींत पडतील आमचें वाटणीचें मागणें वामन जीवंत असतां तेव्हां पासोन आहे हे सर्वांस जाहिर आहे कळावें. ता. १४।५।८६ इ०

( सही ) गुणवंतराव सदाशिव
देशपांडे आकोट तालुके
मजकूर जिल्हा अकोला.

नोटीस

भगवंत वामन देशपांडे आकोट तालुके मजकूर जिल्हे अकोला यास खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं वडीलोर्जीत जिंदगी स्थावर जंगम याचा हिस्सा तुम्हीं आम्हांस विनाकारण देत नाहीं सबब या नोटिशीनें तुम्हांस कळविलें जाते कीं आजपासोन १५ दिवसाचे आंत आपसांत तुम्ही निकाल न केलातर तुमचेवर रीती प्रमाणें फिर्याद केली जाईल.

आमचा हिस्सा न देण्याचें योग्य कारण तुमचे पाशीं असल्यास सदर्हु मुदतींत लेखी उत्तर कळवावें नसल्यास विनाकारण लेकूरपणा करूं नये

आणखी तुम्हास अशी सूचना केली जाती कीं सदर्हु वाडिलोर्जीत मिळकत म्हणजे शेती वगैरे तुम्ही कोणास विकूं नये किंवा गाहण ठेवूं नये. सदर्हु जिनगींची वाटणी होई पावेतों आम्ही तुम्हास या नोटिशीनें मनाई केली आहे कळावें. ता. १४।५ १८८६इ०

( सही ) गुणवंत राव सदाशिव देश पांडे आकोट
ता. मजकूर जिल्हे
आकोला.

## वसूल.

सन १८८५ जानेवारी पासून:—

रा. रा. रामजी शालिग्रामजी पोलीस इन्स्पेक्टर. ५ ।१३
रा. रा. गणेश बापुजी तहशीलदार साहेब. ५
रा. रा. शीतलसींग नायब तहशीलदार पुसद. ११
रा. रा. नारायण बापुजी गोडबोले ३५.
रा. रा. नेटीव जनरल लायब्ररी शेंदले ड. ३ ।५
रा. रा. गोविंद रामकृष्ण खंडाळ नेटीव जनरल लायब्ररीचे शेक्रेटरी. ५ ।१३
मे. कमिशनर साहेब उमरावती. ५ ।१३
रा. रा. देवबा वल्लद वनाजी माळी छापवाइंडर मुकाम लोणार. ५ ।१३
रा. रा. वळवंत शामराव १२ ।१३
रा. रा. त्रींबक अमृत फॉरेस्ट कारकून ४ ।१०
रा. रा. त्रिंबक गुजाबाराव देशपांडे. ५०
रा. रा. पुंजाराम बाबा पाटील खैरी. २
रा. रा. अमृतरावशास्त्री. ४३ ।१०
रा. रा. रामराव परशराम देशमुख पंचगव्हान. ११ ।१०
रा. रा. आत्माराम गुणाजी पाटील. ५ ।१३
रा. रा. अमृतराव बापुजी पाटील. ५
रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुद्धे. १५
रा.रा पुरुषोतम गणेश केळकर. १२
मे. सलामुल्लाखान साहेब ज्याहागीरदार देउळगांव. ११ ।१०
रा. रा. पुरुषोत्तम माधव हेडमास्तर १०
रा. रा. रतनजी जामासजी साहेब सदर ताकलुदार. २९ ।१२
मे. ख्वाज्या बव्होदीन साहेब तहसीलदारपुसद. ५ ।१३
रा.रा. गणपतराव देवराव अंदुरेकर. ६

## तयारआहे
## हिंदुधर्म शास्त्र-भाग १ व २

( दुसरी आवृत्ति )

नामदार रा. सा. वि. ना. मंडलीक सी.एस. आय्. यांचे.

किंमत ८ रुपये व हाशील आठ आणे पत्रें ( किंमतीसुद्धां ) ग्रंथकार यांस मुंबईस पाठवावीं.

सदरिल पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्री साठीं ठेविलीं आहेत. व०स०कर्ते.

## स्त्री पुरुष तुलना.

साहसी कोण? पुरुष किंवा स्त्रिया

हा सुरस निबंध सौ० ताराबाई शिंदे यांनीं रचिला आहे. पुस्तकें पुणें येथें श्री शिवाजी छापखान्यांत व वऱ्हाडांत बुलढाणें येथील रा० रा० बापुजी हरी शिंदे हेड क्लार्क नि० डे० कमिशनर यांजकडेस आकोलें येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकत मिळतील. किंमत नऊ आणे पुस्तक घेणारांस टपाल हशील पडणार नाहीं पैसे पाठविणारांनी वर्तोळ्या सुद्धां पाठवावे.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध १४ शके १८०८

## राज्य व्यवस्थे प्रकरणी हक्क मिळविण्याविषयीं एतद्देशीय लोकांचे प्रयत्न आणि त्यासंबंधीं अपमतलबी आणि परोत्कर्षासहिष्णु परदेशस्थ लोकांची ओरड.

( मागील अंकावरून पुढें चालू )

त्यावेळीं यःकश्चित कारणा वरून बंगाल्यांतील गोरकाय बागवानांनीं व काहीं इतर लोकांनीं जी आरडा ओरड करून सोडली तीं ही आपण अद्याप विसरलों नाहीं. याप्रमाणें अनेक उदाहारणें दाखवितां येतील. अशीं उदाहरणें आजपर्यंत अनेक झालीं आहेत व आपण असेच स्वस्थ बसलों असतां पुढें आणखी किती होतील हें सांगतां येत नाहीं तेव्हां. अशावेळीं जर आम्हीं आपले हक्क मनांत आणूं नये तर केव्हां आणावे !

आतां कित्येक लोक असा आक्षेप घेतात कीं राज्यव्यवस्थे प्रकरणीं आपले हक्क आपल्यास देण्यापूर्वीं सुधारणेच्या संबंधानें आपली जी अवस्था पाहिजे ती अद्याप आपणांस प्राप्त झाली नाहीं. आपल्या लोक समाजांत रीतीभाती संबंधाच्या पुष्कळ वाईट व लज्जास्पद गोष्टी अद्याप सुधारावयाच्या राहिल्या आहेत त्यासर्व नाहींशा होऊन आमचा जनसमाज घरगुती व लौकिक रीतिभातींत आमच्या प्रभूप्रमाणें जेव्हां वर्तन करावयास लागेल तेव्हांच आमच्या या हक्का विषयीं विचार व्हावयाचा. हा विषय थोड्या दिवसा मागें मुंबईतील प्रसिद्ध आ. मि. तेलंग यांनीं पुढें आणिला होता व त्या संबंधानें एतद्देशीय व इंग्रजी वर्तमान पत्रांत बरी चर्चा झाली. आम्हीआपले या विषया संबंधीं विचार त्यावेळींच प्रकट केले आहेत तेव्हां याविषयीं आतां जास्ती लिहिण्याची गरज नाहीं. आ. मि. तेलंग व दुसरे पुष्कळ अनुभवशीर विद्वान गृहस्थ यांचीं मतें अशीं पडलीं आहेत कीं सामाजीक आणि राजविषय प्रकरणीं सुधारणा कोणत्याही राष्ट्रांत बरोबरच झाल्या पाहिजेत. यांपैकी कोणतीही येकील अगोदर आरंभ करून दुसरी मग करावं म्हटलें म्हणजे दोहीलाही धक्का बसावयाचा हाचे निर्णय सर्वांना पसंत पडला आहे. तेव्हां आमची सामाजीक स्थिति सुधारल्या वांचून राज्य व्यवस्थेंत हात घालण्यास आम्ही अयोग्य व अशक्त आहों हें म्हणणें भ्रांति मूलक आहे.

आम्हीं आपले राज्यव्यवस्थे प्रकरणीं हक्क आज सरकार जवळ मागूं लागलों असतां आम्हाला कितपत पक्ष पेईल हें

आम्ही पूर्ण पणें जाणून आहों. तें सुखाचा दिवस प्राप्त होईपर्यंत आम्हाला कित्येक दिवसे करावीं लागतील. राजविषयक प्रकरणीं आम्ही आपली स्थिति सुधारण्यास जरी प्रयत्न केला पैकीं लागलीच इंग्रजी वर्तमानपत्र कारांची ओरड सुरू झालीच मग खरें खोटें जसें मनास वाटेल त्या प्रमाणें लिहून आमच्या सरकारचें मन आमच्या विषयीं दुषित करण्याचा त्याचा प्रयत्न सुरू होतो. आमच्या सरकारला तर आमची खरी स्थिती कळवून घेण्याला इंग्रजी वर्तमानपत्राखेरीज दुसरें साधन च नाहीं! इंग्रजी वर्तमानपत्रकार जे कांहीं म्हणतील तें खरें. मग तें खरें असो खोटें असो व याच स्तुतीपर असो कीं अतिशयोक्तिपर असो. त्यांचे प्रमाण मानावयाचें. तद्देशीय वर्तमानपत्रें कांहीं का ओरडतना. तीं म्हणून येथून तेथून सारीं गढाळ. आमच्या सरकारचा तर असा ग्रह झालेला दिसतो कीं, आमचीं वर्तमानपत्रें म्हटलें म्हणजे सारा केरकचरा असावयाचा. आंत सरकारला व्यर्थ दिलेले दोष व शिव्या या शिवाय दुसरें कांहीं नसावयाचें. मग त्याकडे लक्ष देतो कोण? वास्तविक म्हटलें म्हणजे सरकारला दोष देण्याचा आमचा मुळींच उद्देश नाहीं. उलटें आम्ही आपल्या सरकारचे आभार मानावयाचे; कारण देव सत्तेनें आपला हा आर्यदेश आजपर्यंत अनेक प्रभूंच्या सत्तेखालीं गेला परंतु त्या सर्वांचे लक्ष देशांतील संपत्ती स्वदेशी नेऊन आपला देश गब्बर करण्याकडे असे. जिंकलेल्या देशांतील लोकांची कोणत्याही प्रकारें स्थिति सुधारण्यास त्यांनीं मुळींच प्रयत्न केले नाहींत. जिंकलेल्या लोकांकडून विद्यामृतपान करवून त्यांना ज्ञानाची प्राप्ती करून देण्याचें सत्र प्रथम याच प्रभूनें घेतलें तेव्हां आम्ही ज्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत या प्रमाणें आम्ही आभार मानतोही तेव्हां आम्ही आपल्या सरकारला दोष काय द्यावा. हे दोष इंग्रजी वर्तमानपत्रकार व दुसरे अभिमामानीं आणि कोत्या मनाचे इंग्रज लोक यांचा आहे; कारण हेच लोक आमच्या सरकारच्या मनांत आम्हांविषयीं भलभलतें भरवीत आहेत. आमच्या सरकारावर कांहीं दोष आहेच असें जर मानेल तर तो दोष येवढाच होईल कीं तें एतद्देशीय वर्तमानपत्राकडे ज्यावें तसें लक्ष देत नाहीं. व त्यामुळें इंग्रजी वर्तमानपत्रें जें कांहीं लिहितील त्यावरच विश्वास ठेवून बहुधा एक तर्फी निवाडा करितें. असो. या प्रमाणें आमची व आमचे प्रतिपक्षी इंग्रजी वर्तमानपत्र कर्ते यांची सांप्रत ची स्थिति आहे.

हा विषय हातीं घेण्यास कारण बंगाल्यांतील पायोनीयर नामक एका इंग्रजी पत्रकारानें एतद्देशीय लोकांच्या राजविषयक खटपटी बद्दल लिहिलेला एक लेख होय. हा लेख इतका उद्धट व नीच आहे कीं तो येथें देऊन आम्ही आपल्या पत्राची जागा विटाळीत नाहीं. हा लेख बाहेर आल्या बरोबर एतद्देशीय व इंग्रजी सर्व पत्रांत बरीच चळवळ सुरू झाली व त्या लेखाचें खंडन करण्याकरितां आपल्या विद्वान लोकांतील कांहीं जणांनीं निरनिराळीं पुस्तकें ही लिहीत आहेत.

✓अलीकडे आपल्या लोकांनीं राज्यव्यवस्थेचें खरें मर्म कळूं लागल्या कारणानें आपल्या देशांत हल्लीं जी राज्य व्यवस्था चालली आहे ती केवळ अन्यायाची व पक्षपाताची आहे हें त्यांच्या नजरेस येऊन चुकलें आहे. या राज्यव्यवस्थेंत सुधारणा करावी व तींतील शोचनीय गोष्टींकडे सरकाराचें लक्ष लावावें येवढ्या साठीं हिंदुस्थानांत जिकडे तिकडे, व विशेषतः मुंबई, मद्रास आणि कलकत्ता या शहरांत विद्वान, अब्रुदार व अनुभवलेले असे एतद्देशीय गृहस्थ निरनिराळ्या सभा व मंडळ्या स्थापन करीत आहेत. या मंडळ्यांचा उद्देश ज्या प्रमाणें इंग्रजी वर्तमानपत्रकार येवढ्या शा क्षुल्लक कारणावरून जिकडे तिकडे हाकाटी करून देतात तसें करण्याचा मुळींच नाहीं. वास्तवीक ज्या गोष्टी सुधारण्या सारख्या आहेत व ज्या सुधारल्या असतां सरकारचें कोणत्याही प्रकारें नुकसान नव्हतां प्रजेचें कल्याण होऊन तिच्या मनांत सरकाराविषयीं प्रेम व पूज्य भाव उत्पन्न होईल अशा गोष्टी सरकारच्या ध्यानांत आणून त्या सुधारण्याविषयीं राजनिष्ठ प्रजेप्रमाणें सरकारास विनंती करावी येवढाच या मंडळींचा उद्देश असतो. परंतु असें करणें कित्येक अपक्व मनाच्या इंग्रजास सहन न होऊन ते नेहमीं कांहीं तरी अशा प्रकारचे लेख लिहून व भाषणें करून करून चळवळ करीत असतात. त्यांच्या मनांत असें असतें की हिंदुस्थानांतील लोकांनीं आम्ही वागवूं त्या प्रमाणें वागून सांगूं त्या प्रमाणें एकलें पाहिजे. अशा रीतीनें वागलेंतरच आम्ही राजनिष्ठ नाहींतर वागलेच राजद्रोही ठरतों. वर सांगीतलेला "पायोनीयर" पत्राचा लेख अशाच प्रकारचा आहे. आपले लोक दिवसे दिवस जास्ती हुशार होऊन आपल्या देशाच्या कल्याणाकरीतां निरनिराळे प्रयत्न करीत आहेत हें त्या स्वारीला सहन न होऊन या स्वारीनें त्यांच्या विरुद्ध चरचरीत असा एक लेख लिहिला. या लेखाला आपले कडील पुष्कळ वर्तमानपत्र कारांनीं उत्तरें दिलीं आहेत व बंगाल्यांत "मिस" नांवाचें एक इंग्रजी पत्र एतद्देशीय लोकांनीं काढलेलें आहे त्यानें तर त्या लेखांतील प्रत्येक वाक्य घेऊन त्याचें खंडण केलें आहे. या प्रमाणेंच बंगाल्यांत कांहीं उद्योगी लोकांनीं "श्री राइसिंग टाइड" म्हणजे वाढणार भरती या नांवाचें एक ल्हानसें पुस्तक काढलें आहे. हें पुस्तक फारच चांगल्या रीतीनें लिहिलें असुन प्रत्येकानें वाचण्याजोगें आहे त्यांतील मुख्य भाग "व पायनीयरचे" वेडगळ आणि नीचपणाचे उद्गार आमच्या वांचकांस कळावे म्हणून त्या पुस्तक कर्त्यांच्या परवानगीनें आम्ही आपल्या पत्रांत त्या पुस्तकांतील कांहीं भाग मराटींत देण्याचा निश्चय केला आहे. ज्या ज्या प्रमाणें सवड सांपडेल त्याप्रमाणें ते भाग आम्ही आपल्या पत्रांत छापीत जाऊं——

---

## इकडींच्या तरुण विद्वानांची शारीरिक व मानसिक स्थिति.

(मागील अंकावरून पुढें चालू)

हा मानसिक श्रमाचा भाग झाला; इकडे वेदघोष करतांना प्रत्यक्ष शारीरिक श्रम इतके नामी होतात कीं वेदघोष ही नमस्काराचे खालोखाल एक प्रकारचा व्यायाम आहे असें म्हटल्याच चिंता नाहीं. श्राद्धभटांनीं यथास्थित पक्वान्न झोडल्यानंतर एकदां ऋचा म्हणण्याचा तडाखा लावला म्हणजे घोष होतां होतां कंठांतून घर्मबिंदूंचा प्रादुर्भाव होऊन शेवटीं घळघळींत घाम आला म्हणजे संध्याकाळचे फराळास साफ मोकळीक झाली. या प्रमाणें वेदघोषाचा शारीरिक परिणाम होतो. इंग्रजी विद्येचा परिणाम याहून उलट आहे. मनाचे बहुतेक सर्व भागांचा उपयोग इंग्रजी विद्या शिकण्यांत होतो. सदसद्विचारशक्ति तीव्र करणें हाएक मुख्य परिणाम होतो व हा परिणाम होत असतांना मनाची सर्व अंगें खरची पडत असतात; दिवसानुदिवस स्मरणशक्ति वाढविण्याकडे कल नसून उलटें जेणेंकरून स्मरणशक्तीचें काम कमी होईल तितकें करावें असा इंग्रजी विद्येचा शोक आहे. याला थोड्याशा उदाहरणावरून दृढता येईल; वेदाविद्येंत तर सर्वच पाठ करावयाचें; त्याचा अर्थ तर विचारण्यासारख्या जाड्या पंडितास उकलण्याची मारामार भगश्राद्धाचे पुढले होणारांस कोठून समजणार? शास्त्रें शिकतांना तरी तोच व्यवस्था अमरकोशासारखे कोशाचे कोश पाठ केले पाहिजेत; व्याकरणकौमुदी समग्र पाठ; रुपावळी समास चक्र एकंदर पाठ; पूर्वपक्ष उत्तरपक्ष करण्याच्या वादविवादाच्या पटपटी सर्व पाठ करून सभेंत पोपटासारखे खटपट पंची पांडित्य दाखविण्यांतच काय तें पुष्कळ लोकांचे शहाणपण असे. व सर्व शास्त्रीय ग्रंथ तरी पद्यांत रचलेले व होतील तितके त्रोटक असे करण्याची योजना, स्मरण ठेवण्यास सुगम व्हावेत याचकरितां केलेली असे. या प्रमाणें संस्कृत विद्येंत स्मरणशक्तीस खटपट फार व इंग्रजी विद्येंत याचे उलट. इंग्रजी विद्या शिकतांना मेंदूस बरेच कष्ट पडून वेदघोषासारखी शारीरिक मेहनत तर मुळींच नाहीं. एक ठिकाणीं बसून सारखें वाचल्यानेंच अभ्यास केल्यानें शारीरिक व्यायाम तर मुळींच घडत नाहीं; मानसिक कष्ट फार व शरीरास व्यायाम बिलकुल नाहीं. आतां साधारणपणें ही व्यवस्था खरी आहे परंतु एवढ्यानेंच शक्तीचा ऱ्हास कां होतो याचा बराबर उलगडा होत नाहीं. इंग्रजी विद्येच्या अंगीच असा कांहीं गुण आहे कीं काय कीं जेणेंकरून मनुष्याची शक्ति कमी होऊन त्यास अकालिक मृत्यु यावा! जसे मंत्रांचें अंगी अद्भुत गुण आहेत असें आपण ऐकितों तसे इंग्रजी विद्येंत माणसें मारण्याचे कांहींगुण आहेत कीं काय? या विषयीं बारकाईनें विचार करूं लागलें असतां असें कळून येईल कीं-जवान मंडळी अभ्यासानें अगदीं खंगून जाऊन [illegible]ग्रस्त होतात व मरतात याचें कारण [illegible] जास्त विद्या संपादन करणें हें होय. हल्लीं विद्या शिकणारे तरुण गृहस्थ बहुतेक नोकरीच्या उद्देशानें विद्या शिकतात असें म्हणण्यास हरकत नाहीं; द्रव्योपार्जनाचा उपाय काय तो नौकरी, व जगांत मानसन्मान मिळविण्याचा तरी तोच उपाय असें समजणारे लोकांस त्या उपायांनीं नौकरी मिळेल ते उपाय योजणें हें साहीजकच आहे. हल्लींच्या काळांत नौकरी मिळविण्यास चांगली विद्या पाहिजे; जितकी विद्या जास्त असेल त्या प्रमाणानें अधिक हुद्याची जागा मिळते; म्हणून विद्या जास्त शिकवेल तितकी थोडीच व जितकी उत्तम येईल तितकी मोठी नौकरी आपणास मिळेल एवढें कां एकदां मनांत भिनलें म्हणजे अर्थात् डोळ्यापुढें एक गोष्ट—विद्या. मानसन्मान व द्रव्य हीं नौकरीनें प्राप्त होतात व नौकरी विद्येनें प्राप्त होते तेव्हां कोणत्या तरी उपायानीं विद्या करावयाची. प्रवेश परीक्षा झाल्यानंतर पाठशाळांतून अमुक अभ्यासास अमुक काळ लागावा असें नियम केले आहेत. त्या प्रमाणें वर्षांचे प्रारंभापासून जर नियमित अभ्यास रोजचा अमुक करावयाचा असा निश्चय करून त्या प्रमाणें चालले तर वर्षांचे शेवटीं अभ्यास सहज पुरे होतील. पण असा नियमित अभ्यास करतो कोण? परीक्षेस तीन चार महिने राहिले म्हणजे मग चालली गर्दी; पहिले पांचसात खेळण्यांत जातात; मग शेवटीं परीक्षेचे अभ्यास तर झाले पाहिजेत आणि वेळ तर थोडा; मग काय बसले रात्रीं बारा एक दोन वाजे पर्यंत अभ्यास चालच आहे. पुनः पहाटेस डोळे चोळीत उठले कीं पुनः अभ्यास सुरूंचा. कपाळ दुखूं लागलें तर पाणी ओतावें म्हणजे थंड होतें; अगर पाण्याच्या तोंडीं शाळीं कशाळ धरावें; गार झालें कीं झाली अभ्यासाला सुरवात या प्रमाणें मानसिक व्यायाम सपाट्यानें चालावयाचा व शारीरिक व्यायाम शून्य! कांहीं वेळीं तर महिना महिना घराचे बाहेर मंडळी पडत नाहीं. पहिल्या सहा महिन्यांत पाठशाळेतली मंडळी थोडी बहुत तरी व्यायाम करतात पण शेवटीं अगदीं व्यायामाचें नांव नाहीं. मग अन्नपचन होत नाहीं. कीं-- एनोज फ्रूट साल्ट, हायपोफास्फेट, फास्फरसच्या गोळ्या अशीं औषधें घेऊन सरासरी अन्नपचनाची व्यवस्था करावयाची, कांहीं कांहीं वेळ औषधांवर दिवसाचे दिवस काढावे लागतात. अंगात तारुण्याची रग असते, आणि डोळ्यापुढें एक गोष्ट परीक्षेची तयारी तेव्हां इकडे किती ही अन्न पचन न झालें व कितीही शरीराची धूळण झाली तरी तिकडे बिलकूल लक्ष नसतें. याच वेळीं शरिरांत रोगांचें बीजारोपण होतें व रोगांचे निरंतर वास्तव्याचा पाया बनतो. या प्रमाणें निदान तीन वर्षें पर्यंत म्हणजे बी. ए. ची परीक्षा होई पर्यंत एकेक असामी भट्टींतून निघतो; पुढें दुर्दैवानें एल. एल.बी. ची परीक्षा देणें असल्यास तर दोन वर्षांत काय स्थिति होते व लोक केवळ पशुवत् अंग बनून आपल्या हातानें आपले शरीराची माती कशी करून घेतात हें पहाण्यास जावयाचें परीक्षेचे वेळीं जो मंडळींचा गट

सहामाही " ३ " " ८८

साल अखेर " ७ " " १८८

किरकोळ अंकास.................... ८४

Per annum in arrears 7 " 1R. 8 as

Six monthly........... 3 " 8 as

single copy............................ 4 as

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु १

पुढें दर ओळीस ८।१८६

दुसरे खेपेस ........८१

Advertisements.

Below 10 lines...2as

Per line over 10...4as

Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERARSAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 24 MAY 1886 NO 20

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख २४ माहे मे सन १८८६ इ० अंक २०



रा. रा. रामचंद्र दाजी नगरकर

बी. ए. एल. एल. बी.

ऍडव्होकेट, वकील.

पत्ता — उमरावती. मोदीच बाजार

अवधूती अंजारी


नोटीस.

राजश्री पुंजाजी बल्द जानजी जिरायत राहणार बाळापूर शहर यास:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्हास आमचे शेत सर्वे नंबर १० मुनापूर येथील दरसाल ७० रुपये प्रमाणें दिले असून सालगुदस्त सन १८८५।८६ साला बद्दल वीस रुपये २० वसूल जाता बाकी ५० रुपये येणे आहेत. हे रुपये तुम्हास मागत असतां देत नाहीं. त्यास नोटीसीनें कळविण्यांत येतें कीं, सदरहु पन्नास ५० रुपये व पुढील साला करितां जामीन आठ दिवसांत द्यावा नाहीं पेक्षां सदरहू शेत साल मजकूर पासून आम्ही कबज्यांत घेऊन राहिलेले पन्नास रुपयांबद्दल व व्याजासुद्धां व नोटीशीचे खर्चा सुद्धां तुम्हापासून भरून घेतले जाईल. आतां शेतावर तुमचा कोणतेही प्रकारें संबंध राहिला नाहीं. कळावे तारीख १७ माहे मे सन १८८६ इ.

( सही ) कृष्णंभट बिन जैराम-
भट रहाणार बाळापूर
दस्तुर खुद.

नोटीस.

रा०. रा०. निवाजी आनंत बागाईतकर रहाणार शहर जुंनर जिल्हा पुणें तालुके सिवनेर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, आमचा बखळ जागा पेठ सराईंतील आपणास भाड्यानें दिली त्याज बद्दल भाडे चिठ्ठी सन १८७३ सालचे जुलई महिन्याचे तारीख ३० रोजीं झाली आहे त्या प्रमाणें आजवर तुम्ही भाडें देत आला आहा हल्लीं सदरहु जागा खालीं करून देणें विषयीं आपणास बरेंच वेळ कळविलें असून तसें करण्यास आपण नाकारलें म्हणून समजलें. ज्या पक्षीं मी स्वतः भाड्यानें जागा देऊन भाडें चिठ्ठी घेतली आहे, त्या पक्षीं आम्ही मागितल्या बरोबर जागा खाली करून तुम्ही द्यावी हें रास्त आहे. असें असतां तुम्हास ही नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांत वर लिहिलें प्रमाणें जागा खालीं करून आमची चुलती लक्ष्मीबाई हिचे हवाली करावी तिनें न घेतल्यास जनार्दन अंबाजी आवटेकर यांचे स्वाधीन करावी जर याप्रमाणें सदरहु मुदतींत न केल्यास दरमहा दोन रुपये प्रमाणें भाडें घेण्यांत येईल. शिवाय जागा खाली करून घेण्या बद्दल जी तजवीज करावी लागेल तिजबद्दल खर्चा विषयीं जोखीम आपणास सर्व प्रकारें सोसावी लागेल व नोटीशीचा खर्च द्यावा लागेल कळावें. मुक्काम बाळापूर प्रांत वऱ्हाड ता० १७।५।८६ इ०.

( सही ) बळवंत सदाशीव व रा-
मचंद्र त्रिंबक व काशीनाथ
वामन फडके.
तर्फे
काशीनाथ वामन फडके
दस्तुर खुद.


J, VIOURSA AND CO: ESTABLISHED 1882.

We Warn the General Public of unscruplous advertisers putting up for sale worthless medicines after other names and at a less price claiming cure for Leprosy. PURCHASE GOODS ONLY FROM LONG STANDING FIRMS WHO ARE RELIABLE AND TRUSTWORTHY. Eye Disease. and &c.

**SKILLFUL PERFORMANCE**

*Prof: Bartholomy's "Strabo-Calix" for*

**SQUIN**  **CURE**

This manufactur and contrivance has been a great boon to many; rendering the EYE BALL Eye sight of its natural position and conciding to the axe of eye.

The "Strabo-calix," is nearly the weight of a spectacle perhaps lighter and the performance is most simple and harmless, even a child can use it. To be used for two hours, morning and evening. It has quick result on a person who uses it regularly. Please state the size of your eye.

PER PAIR | Large Medium Small

**TTENTION! ATTENTION!!!**

To Maharajas, Nabobs, Zemindars, Talookdars, Gardeners and Lovers of Flowers.

"Florescence" or the Life of Flowers.

Secures development of blossom, perfection of foliage, forces most luscious and luxuriant fruits, vegetables and salads, greatly stimulats and quickens all vegetable growth. It contains nothing that is poisonous his famous powder is gifted with afertilising strength equal to Guano and possesses the virtue of destroying insects from plants and trees.

To ladies who take an interest n their flowers both in-doors and out. "Florescence" particularly recommends itself as it is chemically prepared and has not the apparnce or character of what is known under the head of "Flower Manures For a small garden one large Tin will be sufficient for some months To be used once a week-

Large Tin...Rs. 5 }
Small ,, ... ,, 3 }

A Favor of Trial Solicited.

**NO MORE SPECTACLES & PAINFUL OPERATIONS.**

For the cure of all eye Diseases The famous Dr. Chase's Jordon Drops and his Catharctic Alterative has cured thousands, in India since the year 1882, even such cases that have been pronounced incurable by Eminent Oculists or Eye-Doctors.

Per Bottle Large... Rs. 4.
" " small... " 2-8
Cathartic Alterative " 4.

( True Copy )

BORN SHORTSIGHTED.

*Simla 10th August 1883*

I am suffering with short-sightedness since my infancy and if the drops really prove useful I shall get you a good sale by freely recommending it to the Native Community.

*(Writes again After using the medicine for 3 days.)* 16th, Augst 1883

Your favor of the 13th inst. together with the parcel to hand, please send one sonal bottle of Jorden to the address of Baboo Baisakhi Ram Hardyal, Cloth Merchant, Amritsar and one Large of the same to Sodhi Hukumsingh, Esq. Extra Asst. Commr. and Mir Munshi to Punjab Govt. Simla.

( Sd. ) BHAGAT RAM.
Translator Punjab Govt. SECT.

*BLIND.*

*Nellore, Kavali 9th June 18 4.*

This is to testify that a sonall bottle of Jordan Drops used last year in a case ( blind on account of opacity of the cornea ) which was cured and the patient was all right.

J. BENJAMIN Hospital Asst.

EYE-DISEASES.

*27th October 1884.*

The Jordan Drops seems to be very effectual to those whom I have applied up to this time.

( sd ) HARI MHUN KABIRAJ

*Thousand marvellous cures ! !*

Dr. Chases siloum wash or the Origenal Lepra-cura.

This prepration is made of pure vegetable and other valuable ingredients. It has been experienced from a long time and now guranteed to be the only medicine ever discovered for the benefit of sufferers. It cures all skin and veneral diseases, Leprooy. Impotency, and removes Mercury from system of the blood. To be taken internaly thrice a day.

Per Bottle Large--Rs. 20.
small--Rs. 15.

Ointment Rs. 4.

The magical power of siloam wash is that it forces out the unnatural heat from the Body by means of sores and Golden marks, and renders the pard benumbed to its original power of feeling sensation. The sores and marks are removed off by the mere external applitcation of Sarza Ointment. On- supply is sufficient for such plague of obstinate diseases.

J. Saviour and Co,
31, 32, Atnherst, Calcutta.


## पत्रव्यवहार

द्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

## "विलक्षण स्वप्न."

रा. रा. पत्रकर्ते यांस सा० न. आपली व माझी पहिलीच भेट आहे करित मी ज्या चार ओळी पाठवीत आहे त्या येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

मी आपल्या नेहमींच्या रिवाजा प्रमाणें दहासाडेदाहाच्या सुमारास गच्चीवर निजलों; इतक्यांत दैवयोगानें वारा मंद पण सीतळ असा वाहायाला लागल्यामुळें, चटदिशी झोप लागली. इतक्यांत एक चमत्कारीक स्वप्न पडलें तें असें :—

मी एका चिमुकल्या बागेंत सुमारे संध्याकाळचे ९–९॥ च्या सुमारास गेलों. त्या बागेला गुरें वगैरें चतुष्पाद जनावरांचा त्रास होऊंनये म्हणून देवदार लांकडाचें कुंपण ( एकक्लोजर ) होतें. तींत केळींच्या झाडांची तर चंगळच होती; त्याच प्रमाणें शेवती, गुलाब, बटमोगरा, कण्हेर वगैरें झाडांचे ताटवे, व लिंबे संत्रें यांचे नुकतेच म्हणजे दोनतीन वर्षां पूर्वीं लावलेली झाडेंहीं होतीं. अहाहा !!! काय येथेचें वर्णन करूं; अगोदरच वसंत ऋतूचे दिवस, त्यांत मोगरा व गुलाब यावरून वाहत आलेली वाऱ्याचीझुळूक, चंद्राचें शीतळ किरण, हें पाहून दुःखी मनुष्याला देखील आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं, मग मला आनंद झाला असेल यांत नवल तें काय ? मी तसाच तेथें बसण्याकरितां दोन तीन बेंच होते त्यांपैकीं एकावर जरा अंग टाकलें, इतक्यांत ठों ठों ठों असे दहा ठोके मोठ्यानें ऐकूं आले. त्यावेळेस मी किंचित् जागा व किंचित् झोपेंत होतों; हे ठोके वाजतात कोठें? म्हणून न्याहाळून पाहूं लागलों तों मनोऱ्या सारखें कांहींसें दिसलें, त्यावरून मला वाटलें कीं मी मुंबईतल्या राजा बाईटावर मध्येंच आहे कीं काय ? पण पुन्हा संशय आला कीं तें तर फारच उंच व मनोहर आहे व हें तर फारच लहान दिसतें; असा विचार करतो आहे तों एक गडी आला आणि म्हणाला " ह्यांसे निकलो निकलो, महाराज आनेवालेहै " हें ऐकतांच एवढ्या रात्रीं येथें येणारे महाराज कोण असावेत ही पाहण्याची उत्कंठा मनांत फार असल्यामुळें, गड्यासमोर गेल्यासें करून तेथेंच लिंबाच्या झाडाआड उभा राहिलों. नंतर सुमारे दाहाएक मिनिटांनीं तेथें तीन पुरुष आले; त्यांच्या चर्येवरून कोणी तरी मोठे कामगार असावेत असें वाटत होतें. पहिला वयानें सुमारे ३४–३५ वर्षांचा असून आंगानें जाडा होता; तोंडावर किंचित देवीचे वण होते, हातांत काठी होती, आंगांत एक पातळ कपड्याचें कुडतें असून त्यांवर फाटनी हाफजाकिट होतें; पायांत निजामती बूट होता; बोटांत

सोन्याचा छल्ला होता; हा जरी मोठ्या सभ्य रीतीनें वऱ्हेंनें चालत होता, तरी मधें मधें किंचितसें भलते भलते बोले, ह्यावरून यानें कांहीं तरी अम्मल केला असावा, असें स्पष्ट दिसत होतें.

दुसरा वयानें ४९-५० वर्षांचा असून जाडा होता; बोलतांना किंचित मान हालत होती ह्यावरून हा उतार वयाचा आहे हें स्पष्ट दिसत होतें; अंगांत एटरा असून त्यावर बऱ्याच मोलाचा रेशिमकांठी धोतरजोडा झळकत होता; पायांत पुणेरी मऊ जोडा होता, हातांत नकशीदार काठी होती; याच्या तोंडवळ्यावरून हा फार सालस व सभ्य असावासा वाटत होते.

तिसरा तर एखाद्या नाटकांतील राक्षसा सारखा दिसत होता. छेतू, राक्षसाची उपमाही देतां येत नाहीं. कारण तो फार चिडुकला दिसत होता; पण काय आश्चर्य त्या मिशा!! अबबब!!! एखादें लहानसें पोर भिऊन मरावयाचें; इतकें ही असून त्याला पहिले दोन नेहमीं म्हणत "रावसाहेब हा येथें खळगा आहे, सांभाळा नाहींतर पडाल एखादें" ह्या सर्व चिन्हांवरून याला रातअंधळी असावीसे वाटत होतें. असे हे तीन पुरुष तेथें येऊन दाखल झाले त्याचें जें भाषण झालें तें थोडक्यांत देतों.—

पहिला— कां आज कशी बाहर उडवून दिली, तुम्हाला भर पगाराची तीन महिन्याची रजा देवविली कीं नाहीं?

दुसरा—आपणा सारखे आम्हाला साह्य असल्यावर दुसऱ्याला विचारतो कोणी? दादा साहेब आपलें मत म्हणजे कांहीं लहानसें नव्हे.

तिसरा—पण कांहीं आपण गांवांत इतकी अंदाधुंदी करून चैन करितों, पण एकाची माय व्याली नाहीं कीं वर डोळा करून पाहील.

दुसरा—अहो आमचा तुमचा कट असल्यावर दुसरे काय + + + + +णार.

पहिला— हेतर खाचित, पण कारे एथली कुठें गेली अजून कां बरें आली नाहीं? इतक्यांत एक गडी सरबताच्या, व दुसऱ्या कशाच्या होत्या हें कांहीं समजलें नाहीं (पण बरीच घाण सुटली होती त्या वरून ओळखा काय असेल तें) अशा बाटल्या घेऊन आला. व त्याच्या मागोमाग एक स्त्री आली. ती वयानें १९-२० वर्षांची असून गोरी होती; तिच्या सर्व भाषणांवरून ती त्याच बागेतील काम करणारी मोलकरीण असावी असें वाटत होतें. नंतर पांच मिनिटांनीं दुसरी आली ती वयानें तीसएक वर्षांची असून काळी सावळी होती.

पहिली— तो मेला (नवरा) लवकर निजेना मी तरी.कायकरूं?

दुसरी— मी तर बाई दिशेच्याच निमित्तानें आलें.

सर्व जणांनीं त्या बाटलींतला पदार्थ येथेष्ट भक्षिल्यावर आनंदानें त्यांच्या (स्त्रियांच्या) गळ्यांत हात घालण्यास आरंभ केला. मला त्यावेळेस असें वाटलें कीं अरेरे!!! कोण हे दुष्ट लोक, दिसण्यांत तर मोठे सभ्यसे दिसतात, आणि परस्त्रियेवर आपला डोळा ठेवितात. मूर्खांनो गांवांत तुम्हांला संभावीत, शाहाणे, न्यायी, असें जे म्हणत असतील त्यांनां शत मूर्ख म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं हा!! पशूंनो चाळा तुमच्या त्या संभावितीला आणि न्यायाला!! लोकांत बढ्या बढ्या गोष्टी सांगून चोरून परस्त्री अभिलाष करितां काय? तुमच्यापेक्षां जनावरे तरी बरीं, त्यांच्यांत जी अक्कल असते ती तमच्यांत नाहीं. पैशाची आशा दाखवून स्त्रियांच्या पातिव्रत्याचा भंग करितां काय? हरहर!!! या मायदेशी तरी काय दुष्ट!! आपला पती टाकून ह्या माजलेल्या कुत्र्याच्या पाठीस का लागावें! पण पैशाची आशा फार वाईट आहे. असो. मला हें वाटे बटून त्यांचे नवरे जेथें असतील तेथें जाऊन त्यांना ही गोष्ट सांगून शिक्षा करविण्याचा विचार करून जों सपाट्यानें निघालों तों चालतां चालतां एक जबर ठेंच लागली, त्या सरशी जागा झालों, व पाहतो तों बागनाहीं लोक नाहींत स्त्रिया नाहींत, मी निजा प्रमाणें आपल्या बिछान्यावर आहे; हे पाहून मनांत नाना तरंग आले पण कांहींच उमजेना, म्हणून आपणांकडे पाठविले आहे आपणास समजल तर पाहावें.

आपला एक
ह्लोटींग.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ६ शके १८०८

## हल्लींच्या तरुण विद्वानांची शारिरीक व मानसिक स्थिति.

(मागील अंकावरून पुढें चालूं)

तें कारण ह्मणजे इच्छित कालीं स्त्रीसंग होणें हें होय. कोणत्याही विषयाचा शास्त्रोक्त तऱ्हेनें विचार करूं लागल्यास नाजूक नाजूक कारणांचाही विचार केलाच पाहिजे; लाजेमुळें एकीकडे ठेवतां कामा नये. पाठशाळांतील तरुण लोकांस शकुंतले सारखीं श्रृंगार रस प्रचुर नाटकें शिकविलीं जातात व त्यामुळें श्रृंगार विलासांविषयीं मन साहजिकच उद्युक्त होतें; नेहमीं त्या प्रकारचे विचार मनांत घोळत असल्यावर तसल्या तारुण्यावस्थेंत मनःसंयमन करणारे शुकाचार्यांसारखेच जगीं गृहस्थ पाहिजेत. साधारण मर्त्यांचे काम नव्हे. या प्रमाणें विचार मनांत घोळत असतांनां तरुण पुरुषांत स्त्रीसंग न झाला ह्मणजे फार दुर्धर परिणाम होतात. शेकडा सत्तर मंडळीस स्वप्नावस्था होतात मग शक्तिऱ्हासास काय उशीर लागणार आहे? भराभर शक्तीचा ऱ्हास होत जातो. इकडे नूतन रक्तवृद्धि बंद होते कारण व्यायाम नसतो, व इकडे या रीतीनें शक्तिपात होतो मग तेथें कसला निभाव लागतो! पाठशाळेंतून निघून जगांत जावें तों निःसत्व. अंगांत शक्ति नाहीं व मनास उत्साह नाहीं अशी स्थिति होते.

वरील लिहिण्यावरून स्पष्ट होईल कीं पुष्कळ अंशीं निरुत्साहता उत्पन्न करण्यास इंग्रजी विद्या ज्या तऱ्हेनें हल्लीं शिकतात ती तऱ्हा कारणीभूत आहे. ऐन उमेदी च्या दिवसांत आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळें पुढें प्रकृत चांगली होण्याचा मार्गच बंद होतो. व आयुष्याच्या एकंदर इमारतीचा पाया डगमगीत होऊन जातो.

दूरवर विचार केल्यास असें दिसून येईल कीं इंग्रज सरकारचें राज्य या देशांत आल्यामुळें आपली परतंत्रतेची जी अवस्था झाली आहे त्यामुळें एकंदर परिणाम एकापुढें एक असे मालिकेनें होत आहेत. प्रत्येक मनुष्यास साधारण समजूं लागलें ह्मणजे त्यास पुढें आपणास खाणें कसें मिळेल व जगांत अब्रूनें दिवस काढण्यास आपणास काय तजवीज केली पाहिजे या विषयीं काळजी लागते. पूर्वीचे पेशवाईचे वेळचें उत्पन्नाचे मार्ग सर्व खुंटले व पूर्वीपासून विद्योपार्जन करून उदरपोषण करण्याची संवय, त्यामुळें इंग्रजी विद्या शिकूनच पोट भरावें असें शिकणारांच्या मनांत येणें स्वाभाविक आहे. युरोपखंडांतील व अमेरिकेंतील सुधारलेल्या व्यापाराचे व नवीन नवीन कलाचे अनुकरण करून त्यांचा या देशांत प्रचार करण्यास झटणें ही कल्पना सुद्धां मनांत येत नाहीं. कारण तसे धंदे करण्याची किंवा कांहीं हुन्नर करून पोट भरण्याची संवय नाही परंतु हल्लीं इतर देशांतील लोकांशीं आपणास टक्कर मारणें असल्यास नवीन कला या देशांत आणूनच निर्वाह लागणार आहे. स्वतंत्र धंदे करण्याचा फायदा काय आहे हे धंदा करूं लागल्यास कळेल. आपल्या इच्छेप्रमाणें आपणास वागतां येऊन आपला चरितार्थ चालतो एवढेच नव्हे पण त्या पासून एक फारच महत्वाचा फायदा आहे. तो असा कीं स्वतंत्र पणानें विच्यार करण्याची व स्वतंत्रपणानें वागण्याची संवय मनास लागते व त्यामुळें आपली स्वतंत्रता कोणत्याही तऱ्हेनें कायम राहिली पाहिजे असा मनाचा ग्रह बनून जातो. व्यक्ति मात्रांचे विचार या प्रमाण झाल्यावर राष्ट्राची राजकीय स्थिति सुधारण्यास काय उशीर आहे. मात्र पुष्कळ लोकांचे मनांत आपण स्वतंत्र धंदे करावेत ही गोष्ट बिंबली पाहिजे.

हल्लींच्या तरुण विद्वानांची स्थिती वर सांगितलेल्या स्थितीहून फार भिन्न आहे हे विशेष रीतीनें सांगणे नको. नौकरीची इच्छा धरून सर्व अभ्यास केल्यामुळें व पुढें प्रत्यक्ष नौकरी मिळाल्यामुळें मानसिक स्थितिवर फार वाईट परिणाम होतो. मिळविलेल्या विद्येनें मनाचें स्वातंत्र्य वाढावें तें न वाढतां उलटी दास्यत्वाची हौस लागते व दिवसानुदिवस बढतीचे आशेनें दास्यत्वांत मिळून राहाण्याची संवय मनास लागते.ही दास्यत्वाची संवय मनास लागणें हें सुधारणेनें पाऊल पुढें न पडण्यास फार सबळ कारण आहे. देशांतील पुढारी ह्मणविणारांची जर ही दशा आहे तर इतर लोकांस तर त्याजपेक्षां ही ज्ञान कमी. इतर देशांतील व्यापारांची, व कलाकौशल्य नवीन लोकांची,व पद्धतींची माहिती त्यांस कोठून येणार? या प्रमाणें ज्या लोकांचे स्वतंत्र धंदे देशांत चालूं करण्याचें काम आहे त्यांनीं न केल्यामुळें तें आपलें व इतर सर्व लोकांचे नुकसान केल्याचें श्रेय घेतात. आमचे देशांत व्यापार नाहींत, सर्व व्यापार इंग्रज लोकांनीं व्यापले आहेत आमचेपाशीं व्यापारास भांडवल नाहीं ही व इतर पोकळ कारणें लाऊन किती दिवस निभाव लागणार आहे? देशांत व्यापार नाहीं तर भाटे, पारशी, मारवाडी हे व्यापार कसे करतात? भांडवल नाहीं ह्मणावें तर सरकारी व्याजित वगव्हर्नमेंट प्रामिसरी नोट यांत लाखो रुपये असण्याचें कारण काय! या सर्व तक्रारी केवळ पोकळ आहेत. ज्यांस इच्छा नाहीं त्यासच या तक्रारी योग्य दिसतात. पूर्वींचे दिवस आतां बदलले आहेत हें पक्कें समजून त्या प्रमाणें आपला वर्तनक्रम बदलण्याची प्रत्येक तरुण विद्वान् गृहस्थाचा उद्योग पाहिजे. आपली शारिरीक व मानसिक स्थिती,आपली स्वतंत्रता,या सर्व गोष्टी आपले हातीं आहेत. देशकाल मानाचा विचार करून ज्या प्रमाणें आपले विचारांत व वागणुकींत फरक केला पाहिजे तितका केला असतां शारिरीक आरोग्य,मानसिक स्वस्थता व स्वतंत्रता या तीनही गोष्टी व दुसरे शतशः फायदे आपोआप आपल्या घरीं चालत येतील यांत बिलकुल संशय नाही.

The Berar Samachar

MONDAY MAY 24
1886

## THE VERNACULARS

The exclusion of the vernaculars from the University course which event took place in 1863 has been productive of very great harm to the language in that it does not now occupy that place in the estimation and thoughts of our graduates, which it formerly occupied. No doubt graduates after completing their College education in the end see the mischief that the University is playing and would if asked give their vote in favour of the admission of the Vernaculars into the University curriculum. We do not know what progress the Editor of the Times of India has made in that language to be able to say authoritatively that it deserves no place in the University course; but we can safely assert that, had the Editor a good opportunity of knowing the worth of the vernaculars he would not rush into prin and treat the vernaculers with the stigma of being unequal with the classical languages. In one sense of course the reproach may be deserved, that is to say, the language may not be as pure as the classical, it may not possess the literature which the classical possesses; not may it compare with the latter in grammar, idiom or syntax. So far as the system, the structure, the genuineness, the compactness and the riches of a language goes sanskrit Greek or Latin may be

superior, that the only test, we ask, by ich the fitness of the vernaculars to occupy a place in the University is to be judged. The vernaculars are every day growing rich; they are the living languages and are so easy to be learnt they would keep the candidates to interpret the thoughts into English they are necessary to spread education among women and the primary schools or among those who do not care to study English; they are necessary to give the benefit of western education to the teeming millions of India; they would much simplify the labour of a student and with a proper provision of books would teach him the whole English literature to coach him up as an ordinary man; they would only leave him short of the English language which being a mere Mechanical matter he may learn side by side with a profession or by special study if he so likes. If it were possible to give a man all his education in Marathi much labour would be simplified; and those who would wish to pass lives as professional men would not care to learn more English than would keep them to read an English book with ease and comfort and would not care to write even incorrect English provided they can make themselves perfectly intelligible. As long as they can express their thoughts and make the world understand what they say they would not care whether the garb in which their ideas are conveyed is fine first class silk or a coarse and rough cotton. And we find it difficult to say that their idea would be very wrong. Instead of spending five or six or a dozen years in thoroughly mastering the English language, it is certainly better to do all the education in Marathi and learn English enough to speak or write out the thoughts intelligibly in that language. It is a disgrace to the rising generation that they should be proficient in English and Sanskrit but should not be able to write forcibly and impressively in the vernaculars the only medium or bridge between them and their brothern In India. If they want to educate India from North to South and from East to West they have no more powerful weapon than the language which the people speak and understand. Give lectures in marathi and write news papers in marathi and you reach the poorest and the most ignorant classes of people. Primary education teaches a man to read and write and you would teach him to think, feel, appreciate and act. We could call the early attention of the graduates association in Bombay to this subject. I would request them to discuss it from all its sides and make the University give it respectable place in its course. If they make a proper and thoughtful representation, we have every hope that the subject will receive due consideration and then numbers are every day swelling so high that they will within a few years be able to dictate their course to the University and hold their own against any deviations from the correct path which the body might be inclined to make. There is nothing like a strong opinion upon a subject and it would be expecting nothing more than the education they have received gives us a right to demand, to request the graduates to do all they can to secure the vernaculars in the University course. They are already making a move in the right direction in taking upon themselves the appointment of Fellows of the University and the next thing they ought to do is take up the question of vernaculars, the value of which must have been patent to them from sad personal experience.

---

## THE HIGH POSITION OF BURMESE WOMEN.

We give below an extract from Mr. Justice Jardine's lecture on Burmah. It depicts the position occupied by the women of the country which compares more with European than with oriental countries. The condition is worth studying. It would be very useful if any gentlemen could undertake to enumerate and discuss the causes which have brought out such a marked change in the position of Burmese women.

"The women are different. They occupy a position superior to their sex in any other Oriental country. The civil law gives them almost equal rights of property to those of the men. They do not now marry as children and one traces in the later versions ot the Code their growing emancipation from parental dictation in choosing their husbands. They have to be wooed in order to pe won: and their time of courtship is a very pleasent time. After marriage, if the husband misbehaves, the wife can protect herself by suit for divorce or judicial separation, retaining her share of the property. The married pair may at any time be mutual consent dissolve the marriage, under which circumstances they divide the property. Polygamy is lawful, but is condemned by public opinion. The women take a part in all the affairs of life: whether married or unmarried, they may conduct separate businesses, and it is the general opinion of the foreigners in Burmah that the fairer sex is the most intelligent and the best behaved. The best proof of the excellence of their treatment is that no proposals are ever made to alter it. They are pleasent looking without being exactly beautiful, genial and charming to a degree and, as their attention to pretty dresses shows, they are not ignorant of their attractions. They love to wear flowers in their hair, the rose, the hybiscus or the padouk: a great trade, too, is done in artificial flowers. They all smoke, they make big holes in the lobe of the ear in which they can carry a cigar.

They, of course, prefer their own countrymen as husbands: but what I have already stated shows that the Burmans--I mean the men--are somewhat wanting in the prudential virtues: they are not the sort of people who find capital for railways or cover a public loan two or three times over. Perhaps, too, the love of amusement makes them indifferent to work and duty: and the Burmese maiden ponders over this side of the national character: and often, as I have been told, yields to the less attractive but more ploding saving Chinaman or Burmah Chinaman who makes her a kinder husband and does not drink or gamble away what they earn.

A great many observes of the Burmans think that the race will not be able to holds its own when exposed as it is now to the competition of the Indians and the Chinese: but that a finer type will be developed by union of Chinese men with Burmese women.

The wondering stranger, who finds on first arrival, as I did, that the woman holds so important a place in the society, of course wants to know the reason why. In India the *aurasa* or eldest child is always masculine, but in the Burmese Law we read of the *aurasi* or eldest daughter as equal ly the heir. Whether this law of equal rights originated in India, before the Brahman text writers had whittled away woman's right, before the burning of widows had been jusfified out of the Shasters, I do not presume to say. But in the Thesawalame, a compilation of the law of the Tamils, in Cylon, which, in many respects, closely resembles the law of Burmah, the same indulgence to women is visible. Whether developed in India or result ing from Buddhist interpretation in Burmah, we may safely follow Bishop Bigaudet, the learned translator, of the Legend of Caudama, in ascribing this highest feature of the civilization to the influence of Buddhism. This religion he defines as "a moral and practical system, making man acquainted with the duties has to perform in order to shun vice and practice virtue. It will not be deemed rash to assert that most of the moral truths prescribed by the Gospel are to be met with in the Buddhist Scriptures." Again, "The comprehensiveness of Buddhism, its tendency to bring all men to the same level and allow fo no difference between man and man but that which has established by superiority in virtue, its expansive properties, all those striking characteristics have wonderfully work, ed in elevating the character of the woman and raising it to a level with that of man. Who could think of looking on a woman as a somewhat inferior being, when we see her ranking according to the degrees of her spiritual attainments, amongst the perfect and foremost followers of Buddha, thence in those countries where Buddhism has struck a deep root and exercised a great influence over the manners of actions, the condition of the woman has been much improved and placed on a footing far superior to what she occupies in those countries where that religious system is not the prevalent one or where it has not formed or consider ably influenced the customs and habits of tne people!"

---

Raja Sir. Dinker Rao is writing an article for the *Asiatic quarterly Review.* The document will contain a discussion of the India of his time and the India of today, marking and criticising the various changes that have taken place in the political, social, religious and intellectual condition of the people. Moreover it is to contain reminiscences of events in which the hoary politician was personally engaged. The "Times of India" thinks that since the death of Sir. Salar Jarg there is no Indian statesman who holds the same high position in English estimation as Sir. Dinker Rao. We sincerely hope the Raja fulfils the expectations formed of him. There is we hear a mannerism with him which some people admire and others condemn. Lately we have not heard much of the intellectual activity of this gentleman. His services in the mutiny of 1857 have founded a prestige for the old statesman and his silence has rendered that prestige excellent service since people have looked upon him with feelings of veneration and respect always paying due regard to his intellectual superiority. All this has been done for his services in the past. We should be very happy if the article now being penned by the Raja could conform and establish his reputation as a statesman and politician and still further enhance the respect paid by the countrymen to this veteran nobleman.

---

## वऱ्हाड

पाणी खराब झालें— अलीकडे १६ दिवसा पासून येथील नदीचे पाण्यास कुजलेल्या मातीचा वास येऊं लागला आहे. शिवाय कित्येक वेळा काळ्या तोंडाचे अळी सारखे पांढरे कृमि पाण्यांत नजरेस पडतात, तर याचा बंदोबस्त मुन्सिपालिटीकडून हाण्या सारखा असल्यास तिने करावा अशी सूचना आहे.

मे. हेअर साहेब असिस्टन्ट कमिशनर यांस एकमहिन्याची हक्काची रजा मिळाली. व त्याचे कांम मे. डेवीस साहेब यांजकडे ट्रानस फर झाले.

रा. रा. वामन गणेश आ. तहसिलदार बाळापूर यांस तिसरा क्लास माजिस्त्रेटचा अधिकार मिळाला.

हैद्राबादचे रेसिडेन्टचें कोर्टांत फौजदारी मोकदम्यांत सरकार तर्फे काम चालविण्या करितां मि रामचंद्र पिले रेसिडेन्ट चे कोर्टांतील वकील यांस प्रोसिक्युटर नेमले.

रा. भास्कर महेश्वर तहसिलदार यांस आफिशियेटिंग एकस्ट्रा असिस्टंन्ट कमिशनर नेमलें.

रा. गोपाळ महादेव भिडे आफिशियेटिंग तहसिलदार मेहेकर यांस त्या तालुक्यांत सेकंड क्लास माजिस्त्रेट नेमले.

मे. एडब्यू माफिट साहेब पोलीस सुपरिनटेंडन्ट यांस तूर्त काही दिवस असिस्टन्ट सुपरिन टेंडन्ट करून मे. हाबसन साहेब यांस फोर्थक्लास सब प्रोटेम पोलीस सुपरिटेन्डन्ट नेमले.

मे. हाबसन साहेब त्यांस तूर्त वऱ्हाडांत ता. १ माहे एप्रेल सन १८८६ पासून सर्व्हेव सेटल मेंट आफिसर नेमून त्यांचे जागी मे. फ्रेझर साहेब यांस फोर्थ क्लास सब प्रोटेम पोलिस सुपरिंटेन्डन्ट नेमले.

मे. कंबरलेंज साहेब पोलिस सुपरिटेन्डन्ट हे रजेवरून परत आल्यामुळें मे. फ्रेझर साहेब यांची वणी जिल्ह्यांत बदली झाली.

मे. महमद याशीनखा साहेब असिस्टंट कामिशनर यांस २१ दिवसाची हक्काची रजा मिळाली.

मे. राईट साहेब पोलीस सुपरिन्टेन्डट हे एकमहिन्याच्या रजेवर गेल्या मुळें मे. डोकाजी साहब यांस उमरावतीस आफिसिएटींग पोलीस सु० नेमिले.

रा. रा. अंबादास संतो आ० ए० अ० क० यांस ५०० रुपयापर्यंत दिवाणी दावे घेण्याचा अधिकार मिळाला.

मे. मौलवी महमद निजामुदीन हुसेन साहेब बी. ए. बी. एल् अ० क० यांस हिंदुस्थान सरकारच्या ता० ३० सपटंबर सन १८७० च्या नोटीफिकेशन अन्वयें डेप्युटी क० चे अधिकार दिले.

---

## वर्तमानसार.

er annum in ar … x monthly

हैद्राबादची इरेग्युलर फौज कमी करण्याचा तेथील दिवाण साहेबांनीं बेत केला असून तो ते लौकरच निजाम साहेबां पुढें आणणार आहेत. हें ऐकून कित्येक इंग्रजांना मोठा आनंद होईल. पण असें करणें चांगलें नाहीं. या रिडक्शनमध्यें ७।८ हजार लोक कमी होऊन संस्थानचे तीन चार लाख रुपये बचतील; पण हा संस्थानचा खरा फायदा नव्हे. फौज ही राष्ट्राची शक्ति आहे. ती राखण्यासाठीं लागणारा खर्च कमी करणें म्हणजे समजून उमजून राष्ट्राचे शक्तीचा ऱ्हास करणें आहे ही गोष्ट आज आमच्या संस्थानिकांस लागू नाहीं कारण सार्वभौम इंग्रज सरकारांनीं त्यांचा सर्वस्वी पत्कर घेतला आहे. तेव्हां त्यांना कशाची भीति आहे? पण स्वतःस भीति नाहीं म्हणून मुद्दाम कां अशक्तिपात करावयाचा? अंगीं सामर्थ्य असलें तर स्वतः विषयीं जरी कांहीं फिकीर नसली तरी प्रसंगीं दुसऱ्यास मदत करितां येईल. म्हणून आपलें सामर्थ्य वाढविण्याचा वास्तविक प्रयत्न केला पाहिजे. तो एकीकडेच राहून उलट आमचे दिवाण साहेब असलेलें सामर्थ्य कमी करण्याच्या तजविजींत आहेत हें पाहून आश्चर्य वाटतें. संस्थानिकांजवळ त्यांच्या त्यांच्या मगदुरा प्रमाणें फौजा असणें आणि त्या चांगल्या स्थितींत राखणें हें नुसमा संस्थानिकांच्याच नव्हे, पण आमच्या बहादर सरकाराच्याही हिताचें आहे. असें असता आमचें सरकार निजाम साहेबांस असें न करण्याबद्दल कांहींच कसें बुद्धिवाद सांगत नाहीं कोण जाणें. आमच्या सरकारचे आंगीं स्वतःचें रक्षण करून आश्रितांचेंही रक्षण करण्या सारखी हिंमत आहे हें खरें पण एकट्या स्वतःच्याच शक्तीवर अवलंबून राहणें नेहमीं चांगलें नाहीं. ही फौज कमी केल्यानें सध्यां एवढें मात्र होईल कीं, ७।८ हजार लोक उघडे पडून लोकांचे मनांत अनेक प्रकारचे तर्क येतील व निजाम सरकाराविषयीं त्यांची अप्रीति होईल. एवढेंच केवळ नव्हे, तर एकदम इतके लोक मोकळे राहिल्यानें संस्थानच्या स्वस्थतेसही धोका बसण्याची भीति आहे. याचा विचार करून मग आमच्या तरुण दिवाण साहेबांनीं काय करणें तें करावें अशी आमची सूचना आहे.

कोल्हापुर संस्थानची व्यवस्था फक्त पोलिटिकल एजंटाकडेच ठेवावी असें मत मि० लिवारनर यांचें नाहीं. एवढेंच नव्हे तर उलट त्यांनीं अशा व्यवस्था होणें फार वाइट आहे असें सरकारास कळविलें आहे. असें म्हणतात. क०

## दुःखाची मालिका.

आज पृथ्वीच्या पाठीवर एक असें राज्य नाहीं कीं, ज्याच्या मागें शशीमिरा लागला नाहीं. एकावर एक शिरजोर करू पहात आहेत. इंग्लंडच्या मागें आयर्लंड हात धुऊन पाठीस लागलें आहे. ऐरीश लोकांच्या मागें इंग्लंडानें चढाव केला आहे. इंग्लंडा मागें रशियन तिळांजुळी घेऊन बसलें आहेत रशियन जाडें प्रकर्ण खुलें असेल तर नाहीं, त्याचाही पाठलाग निहलीस्टनी चालविला आहे. चिनाचा चिटकी नातरा फ्रान्स चित करूं पहात आहे तुर्कस्थाना मागें सर्वच राळे पेरण्यास उभे आहेत. अशा प्रसंगीत कोणी म्हणत असतील कीं, लहान सहान संस्थानें निर्वेध लाऊन विऊन स्वस्थ असतील तर तसें ही नाहीं, त्यांच्या मागें इंग्रज सरकारचें लाटणें सुरूच आहे. इकडे शिंदे होळकर सर लिपल ग्रिफिन साहेबांच्या तडाक्यांत बेजार झालें असून नेपाळाला खालीं मान घालून बसविलें आहे. कमिशनर नऱ्या तहांत गुंगवून सोडलें आहे. काबूलनें आमिरास विरेत घेऊन रशियनास हुलकावणी चालली आहे. तिकडे ब्रह्मदेशास धाई मोकलण्यास लाविलें आहे, पोलिटिकल एजंटाचे ताब्यांतील जहागिरदार आरामांत असतील म्हणाल तर त्यांचे हाल कुत्रा खाणार नाहीं. तेलंग लोकांच्या हातीं असलेली चाती हवी तेव्हां फिरवून सुताला पीळ चढविण्याची मुखत्यारी त्यांनीं आपलेकडे ठेविली आहे त्याहींपेक्षां नीच स्थिती या जहागिरदारांची पोलिटिकल अधिकाऱ्यांनीं केली आहे. कोल्हापूर पहा कसें टांगलें आहे, पण इंग्रजांच्या सद्भाव असा कांहीं जोर आहे कीं, सर्व गांजले तरी तसा असें करूं नका असें म्हणण्यास एक हो उभा रहात नाहीं, येथें ईश्वरानेंच रक्षिलें पाहिजे.

जमिनींत अमूकच पीक करावें दुसरें करूं नये असला निर्बंध करणें केवळ जुलमाचें आहे. बऱ्याच प्रांतीं अफूचें पीक करूंनये, भांग, गांज्या पेरूंनये अशा प्रकारचा निर्बंध केल्या मुळें पुष्कळ लोक नुकसानींत आले. याजबद्दल सार्वजनिक सभेनें सुद्धां तिकडे लक्ष दिलें नाहीं. परंतु आजच्या प्रसंगीं आम्ही हा विषय सर्वांपुढें ठेऊन कळवितों कीं, असला निर्बंध, ठेविल्यानें रयतेचे बहुत नुकसान आहे. सरकारानें आपल्या साऱ्यांत कांहीं कमतरता केली म्हणावें तर तसें ही नाहीं, सरवे सेटलमेंटानें बसविलेला भरसारा सरकार तसदी लाऊन घेते, मग शेतकऱ्यानें मरजी वाटेल तें पीक करूंनये असें म्हणणें किती अजाणपणाचें आहे; कांहीं जमिनी अशा आहेत कीं, तेथें अफूचें पिकाशिवाय अगर भांग गांजिया शिवाय दुसरें उत्तम व चांगलें लाभत नाहीं, तर सरकारच्या कायद्यामुळें त्या जमिनींच्या मालकानें काय ती जमीन पड टाकून सरकारचा सारा फुकट भरावा. हल्लीं आमच्या कडे सुद्धां कांहीं अधिकारी लोक अमूक सेतांत हरभरा पेरा, अमकयांत तंबाकू लावा म्हणून तोंडी गुप्त हुकूम देऊन मामलेदार मार्फत तजवीज चालते. पण तें करणें गैर कायदा समजलें पाहिजे. आताच ऐकतों कीं, सर जे. पीस यांनीं सरकारापुढें असल्या जुलमी कायदा नसण्याबद्दल शिफारस केली आहे. परंतु स्टेट इंडियाचे सेक्रेटरी मि० स्टाफर्ड हावर्ड हें मनावर घेतील तेव्हां खरें. सर्व लोकांनीं अर्जव करून वरील जुलमाचा प्रतिबंध होण्यासाठी सरकारांत दाद मागितल्यास यश मिळणार आहे.

शनदुंबर येथील संन्याशी यांस भुमिगत द्रव्य सापडलें तें त्याणें सरकारांत दिलें नाहीं सबब तासगाव मामलेदारापुढें चौकशी होऊन त्यास १० रुपये दंड झाला. स्वामी पडले भिक्षा वृत्ति, तेव्हां गृहस्थाश्रमी लोकांतच दंड एकत्र करून भरावा लागला. म मि.

ऐर्लंडांत थोडे दिवसां करितां हत्यारांचा कायदा लागू होणार आहे.

ब्रह्मदेशच्या चीफ कमिशनरास के. सी. एस. आय्. ची पदवी मिळणार आहे.

मंडालेस आगीनें कहर उडविला आहे.

काबूलच्या अमीराची प्रकृति नादुरुस्त आहे.

भोपाळच्या बेगम साहेबांनीं आपल्या राज्यांतील आयात मालावरील सर्व जकाती माफ केल्या.

निजाम सरकारास गेल्या बुधवारीं कन्यारत्न झालें.

कलकत्ता येथील प्राणी संग्रहालयास मुर्शिदाबादच्या नबाबांनीं १०००, रुपये दिले. न्या०सु०

कप्तान डॉ० जान यांस सिलोन बेटांत अरिपो किनाऱ्यावर कित्येक ठिकाणीं नुकतींच उत्पन्न झालेलीं पुष्कळ कालवें आढळलीं. तीं पूर्ण दशेस आल्या नंतर काढलीं तर त्यांत पुष्कळ मोतीं सांपडून सुमारें ७,१०,०००,०० रुपये उत्पन्न होईल. असा त्यांनीं अजमास केला आहे.

मि. एडिसन यांनीं तारा वगैरे न लावितां नुसत्या हवेंतून बातमी पाठवितां येईल असें एका अमेरिकेंतील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें आहे.

ऐरलंडांतील अल्स्टर प्रांतांतील ऑरेंजमन यांजमध्यें गडबड चालली आहे हे ऐरलंडांतील असून सरकारच्या तर्फेचे व एकंदर ऐरिश लोकांच्या विरुद्ध आहेत. ग्लाडस्टन साहेबांनीं तयार केलेला कायदा पास होऊं नये असें त्यांचें म्हणणें आहे.

जगांत जे पाण्याचे बंध आहेत त्या सर्वांत मोठा बंध अमेरिकेंत आहे. त्या बंधाचा उपयोग जस्ताच्या खाणींतील पाणी उपसण्याकडे केला आहे. त्यानें प्रतिदिवशीं ३,००,१०,००० ग्यालन पाणी निघतें.

ए. गोपाळा चार्लु यांनीं खटपट करून निरकश मुलांस राहण्या करितां बंगलोर येथें आश्रम गृह बांधिलें. या इमारतीस २०,००० रुपये लावण्याचा विचार असून तें काम पुरें होत आलें आहे. या ठिकाणीं या मुलांची राहण्याची सोय होऊन शिवाय सन्मान्य उद्योग धंदे करून आपला उदरनिर्वाह करितां येईल असे कांहीं धंदे शिकविलें जातील. या गृहस्थांनीं काठेवाडांत जाऊन या कामास द्रव्यद्वारा मदत करण्या विषयीं कित्येक सरदारांची मनें वळविलीं. व त्याच करितां दुसऱ्या लोकांस उद्युक्त करण्याच्या प्रयत्नांत आहेत.

मृत्युची शिक्षा झालेल्यास वेदना भोगल्या शिवाय मृत्यु प्राप्त व्हावा अशा मार्थी अमेरिकेंत एक विजेचें यंत्र तयार करण्याची युक्ति निघाली आहे असें म्हणतात.

ईस्ट इंडियन रेलवेचा जो फाटा जबलपूर पासून काढाविला आहे त्यावरील उतारूंच्या गाड्यांच्या एंजिन ड्रायव्हरच्या जागा एतद्देशीय लोकांस मिळूं लागल्या.

गेल्या सालीं सर्व हिंदुस्थानांत १,९०,२६६ मनुष्यांवर फौजदारी खटले झाले होते त्यापैकीं ६६: but is … र्ले.

मि० ग्लाडस्टन wh…gle …डिनबरो फिलाजाफिकल इन्स्टिटयुशनचे अध्यक्ष नेमिले. सु० प०

ब्रह्मदेशांत देवालयें व इमारती यांवर बहुधा सोन्याचे कळस चमकत असतात रंगून येथें मोठें देवालय आहे तें वीस मैलांवरून दिसूं लागतें, या देवालयाची उंची सुमारें साडे तीनशें फूट आहे, हें देवालय खालपासून वरपर्यंत सर्व सोन्यानें मढविलेलें आहे. साल्वीन आणि सितांग या दोन नद्यांच्या खोऱ्यांच्या वरल्या बाजूस समुद्र किनाऱ्याशी समांतर अशी एक डोंगराची ओळ आहे, तिजवर फारच दाट असे मोठें जंगल आहे, डोंगराच्या ओळींतील सर्वांत मोठ्या शिखराची उंची ८००० फूट आहे, यामुळें हे स्थळ आमच्या हिंदुस्थान सरकारास विश्रांति घेण्यास सिमलागिरीहून ही चांगलें होईल. टाव्हाय शहरा जवळ दुसरें एक लहानसें शिखर आहे. त्याची उंची सुमारें ४००० फूट आहे, या अशा डोंगरावरील जंगलांत फार श्वापदें आहेत, तशींच अनेक जंगली मनुष्यांची तेथें वस्ती आहे, दक्षिण ब्रह्मदेशाचें क्षेत्रफळ ८७००० चौरस मैल आहे. सन १८८१ च्या खानेसुमारींत येथील लोकसंख्या ३७३६००० होती या पैकीं शेकडा ६२ लोक इरावतीच्या चिमड्यांत रहाणारे होते.

अफू नेमस्त खाण्यापासू अपकार न होतां इष्टच होते असें एकाचें म्हणणें आहे. विशेषतः तिचा लहान मुलांवर उपयोग फार होतो. पोरें स्वभावतः खादाड असतात व त्यांस जर अफू दिली तर ती पचन उत्तम करून त्यांची शरीर प्रकृति साफ ठेविते. पण अति तेथें माती हें निःसंशय आहे.

नवीन शोध—सुताचें असें उत्तम कामडे करितां येतें कीं, तें एल्या कमावलेल्या चामड्याच्या तोडाचा मारतें, तें तसें होण्यास बरीच खांच काते करावी लागते.

बंगाल्यांत सागर जवळ फ्रेंचाचे तारू फुटलें व अजीबात नाहींसें झालें.

पेशावरचे डे. कमिशनर मि. टकर यांस ब्रह्मदेशांत मि. बरनर्ड साहेबांचे मदतीस नेमिलें.

मद्रास इलाख्यांतील कांहीं डोंगराळ प्रदेश इनकमटाक्साच्या तावडींतून मुक्त झाले. या प्रांतांतील लोक भिकारी आहेत, त्याजपासून या करानें कांहीं प्राप्ति तर व्हावयाची नाहींच परंतु उलटा जुलूम मात्र होईल, असें समजून सरकारांनीं त्या प्रांतास हा कर माफ केला आहे. प्रारब्ध त्या लोकांचे !

विदुषी प्रियतमादत नांवाची कोणी बंगाली बाई ख्रिस्तोपासिनी आहे, तिची बी. ए. ची परीक्षा पास झाली आहे. या विदुषी बाईचा विवाह मि. लाल बेहारी बोस एम ए. लखनौ येथील कॅनिंग कालेजांतील दुय्यम शिक्षक यांच्याशीं झाला. ने० बो०

---

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

... ... ... ८८
सालअखेर " ७ " " १८
किरकोळ अंकास........................ ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।८६
दुसरे खेपेस .........०१

Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly............ 3 " 8 as
single copy................................ 4 as

Advertisements.
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERARSAMACHAR.


VOL XX | AKOLA MONDAY 31 MAY 1886 | NO. 21
पुस्तक २० | अकोला सोमवार तारीख ३१ माहे मे सन १८८६ इ० | अंक २१



रा. रा. रामकृष्ण[illegible] नगरकर
बी. ए. एल्. एल्. बी.
[illegible] वकील, वकील.
पत्ता — उमरावती. सेंट्रल बजार
आयुर्वेदी औजारी


### नोटीस.

गणू वल्लद रामजी लोहार रहाणार शेलगांव तालुके मलकापूर जिल्हा बुलढाणा यांस:—

नोटीस देणार गुनी मर्द रामजी रहाणार लासोर तालुके खामगांव जिल्हा आकोला इजकडून:—

ह्या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं, माझें लग्न तुजबरोबर होऊन आज सुमारें बारा किंवा तेरा वर्षे झालीं बारा वर्षे झाली मजला तुम्ही चार जातवाले ज्या प्रमाणें बायकोस घेऊन घर संसार करितात त्या प्रमाणें तुम्ही आठ वर्षे केलें. पुढें तुम्हास मानगीनें थोडे थोडे गाठल्यामुळें तुम्ही मजला माहेरी चुलत्याच्या घरीं पोंचविलें; व त्या दिवसापासून तुम्ही आज पांच वर्षांपासून माझ्या पोटापाण्याची वगैरे कांहीं तजवीज तुम्ही केली नाहीं, तुमची मानगी म्हणजे ( अंगावर महा रोग ) हा अलीकडे तुमचे अंगावर जागोजागीं फुटून व फार दुर्गंध मारते व तुमच्या जवळ मी येऊन रहाणें व माझ्या पोटाची तरतुद तुम्ही करावी. म्हणून रामजी वल्लद सिद्राम लोहार राहणार लासोरे हे चार पांच वेळां तुम्हाकडे आले आणि सांगितलें कीं, तुम्ही आपल्या बायकोस घेऊन जाऊन तिच्या पोट पाण्याची तजवीज करावी म्हणून वगैरे मजकूर तुम्हास आज चार वर्षें सांगितला. परंतु तुम्ही माझी कांहीं एकही दाद घेतली नाहीं. मी आज चार वर्षे तुमचे नांवावर कर्ज काढून राहिलें आहें. तें कर्ज दरसाल रुपये ६० प्रमाणें चार वर्षांचे २४० रुपये झालें आहे. आतां मजला कर्ज कोणी देत नाहीं. व तुम्ही मजला नेतही नाहीं म्हणून करितां ह्या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं, नोटीस पावल्या दिवसापासून १५ दिवसाचे आंत सदरील कर्जाऊ रुपये २४० देऊन व माझे पोटापाण्याची तजवीज करून मजला घेऊन जावें. तसें नाहीं झाल्यास तर मी रीतीप्रमाणें तुम्ही महा रोगानें गैर उपयोगी झाला व मजला सांभाळण्याचें सुद्धां तुमचेपाशीं सामर्थ्य नाहीं. या करितां मी दुसरा घरठाव करीन मग कोणत्या ही प्रकारचा हक्क तुमचा माझेवर नाहीं. म्हणून जाहीर केलें असें कळावें तारीख २४ माहे मे सन १८८६ इसवी.

( सही ) गुनी मर्द गणू
लोहार इचे हातची
बांगडी असे.

### नोटीस.

नोटीस पुरणमलजी साहु तामसीकर दुकान वाशीम जिल्हा मजकूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून:—

नोटीस देण्यांत येते कीं राजे शंकरराव रामचंद्र यांचे कडेस तुमचें कर्ज आहे व देवीदास बिरदीचंद यांचें नांवें तुमचें दुकानचें कर्ज मुळींच नाहीं. सदरहू कर्जांत हिरालाल देवीदास यांचे नांवे मौजे नांदुर परगणें अनसिंग तालुके पुसद जिल्हा वाशीम हें इजारें गांव तुम्ही देवीदास बिरदीचंद याजपासून तारेगहाण लिहून घेतां असें मी ऐकितों.

यास करितां तुम्हास असें कळविण्यांत येतें कीं सदहू इजारें गांव व इजारें गांवची मुबदला मिळालेली जमीन तालुके वाशीम व तालुके मंगरूळपीर या दोन्ही तालुक्यांची व वाशीम येथील नवीन बांधलेलें घर तुम्ही तारेगहाण लिहून घेऊं नये.

सन १८६८ साला पासून हें इजारें गांव माझें वडलाचें नांवानीं आहे व आज दिवस पावेतों त्या गांवावर माझा कबजा आहे व वहिवाट आहे. शंकररावचे कर्जांत आमचे इजारें गांव देवीदास बिरदीचंद लिहून देतात हें खरें समजूं नये व दस्ताऐवज सरकारचे मंजुरातीशिवाय इजारें गांवचें रूजु प्रमाण होत नाहीं.

जर देवीदास बिरदीचंद याज पासून दस्ताऐवज करून घ्याल तर त्या पासून जी माझी नुकसानी होईल, ती नोटीशीचे खर्चा सुद्धां तुम्हा कडून रीती प्रमाणें तजवीज करून घेतां येईल व घेतले जाईल कळावें. तारीख २६ माहे मे सन १८८६ इ०

(सही) लालचंद हिरालाल
मारवाडी रहाणार वाशीम जिल्हा मजकूर दस्तुर खुद

### नोटीस.

नोटीस ती. महाराज रा० रा० देवीदासजी बिरदीचंदजी मुंदडे रहाणार वाशीम जिल्हा मजकूर यांस:—

खालीं सही करणार यांजकडून:—

नोटीस देण्यांत येतें कीं सन १८७८ साला पासून राजे शंकरराव रामचंद्र यांचे दुकानावर नवकर आहां.मी विभक्त झाल्यास आजमास दीड वर्ष झाले. शंकररावचें दुकानावर साहू लोकांचें कर्ज आजमास दाहा किंवा आकरा हजाराचें देणें आहे म्हणून मी ऐकतों.

हल्लीं आठ चार दिवस झाले तुम्ही मजला प्रत्यक्ष कळविलें कीं शंकररावचे दुकानचें कर्जांत आपलें इजारें गांव व इजारे गांवचे मुबदल्यांत मिळाली ती जमीन व कजबे वाशीम येथील नवीन बांधलेलें घर तारेगहाण पुरणमल साहू तामसीकर दुकान वाशीम यांस देवीदास बिरदीचंदचें नांवें दस्ताऐवज लिहून देतों म्हणून तुम्ही सांगितलें.

तुम्हास कळवितों कीं हें कर्जदारी राजे शंकरराव रामचंद्र यांचे दुकानावर असून तुम्ही त्याहा कडून नवकर आहां स्तव हे कर्जदारी तुमचे अंगावर मुळींच नाहीं.

सन १८६८ इसवी साला पासून मौजे नांदुर परगणें अनसिंग तालुके पुसद जिल्हा वाशीम हा गांव हिरालाल देवीदासचें नांवानी ३० वर्षांचा इजारा आहे त्या संबंधांत माझा बाप वडील व तुम्ही धाकटे बंधु आहात मी हिरालालचा पुत्र असून त्या गांवावर आज दिवस पावेतों कबजा व वहिवाट माझी आहे तुम्ही हें कृत्य मजला बुडविण्या करितां केलें असें स्पष्ट दिसतें.

विशेष कळविण्याचें हेंच कीं इजारें गांव व त्या गांवाची मुबदले मिळालेली जमिन वाशिम व मंगरूळपीर तालुक्यांतील व वाशीम येथील नवें बांधलेलें घर सदरील कर्जांत तुमचे अंगावर कांहीं जोखीम नसतां कोणतेही साहू लोकास करून देऊं नये. जर हा दस्ताऐवज करून द्याल, तर तो खरा समजला जाणार नाहीं.

इजारें गांवचे रूजु प्रमाणें गांव गहाण ठेवण्यास मुळींच तुम्हास अधिकार नाहीं; व ठाऊं शकत नाहीं. तरी आपण तसें कांहीच करूं नये; कराल तर त्या पासून माझी नुकसानी होईल. ती नोटीसीचे खर्चा सुद्धां करून घेणारांस व करून देणारास द्यावें लागेल कळावें. तारीख २६ माहे मे सन १८८६ इ०

( सही ) लालचंद हिरालाल
मारवाडी रहाणार वाशीम जिल्हा मजकूर दस्तुर खुद.

### नोटीस.

रा. रा. जयराम बेंडाजी तेली व रामकृष्ण रामचंद्र यकनाक राहणार कारंजा तालुक मुर्तिजापूर जिल्हा उमरावती यास नोटीस देणार आपाजी विश्वनाथ किडे व गणेश नारायण घोडसर राहणार कारंजा यांजकडून असें नोटिसीनें कळविलें जातें कीं आम्हास कांहीं पैशाची जरूर लागल्यामुळें आम्हीं तुम्हा जवळ नथ सरज्याची किंमत रुपये ६० साठची ठेऊन रुपये कामाकरितां घेतले ते एकंदर १८ रुपये हे अठरा रुपये तीन वेळा मिळून घेतलें. सदरहू नथ आम्ही उभयतानीं तुमचे पाशी ठेविली या वेळी साक्षीदार होते ते बापुजी यादव मटमाळे, राहणार कारंजा व रामकृष्ण गोविंद माहाजन राहणार कारंजा हल्ली मंगरूळ व रावराम हंबरडे राहणार कारंजा ह्या तीन गृहस्थाच्या समक्ष सदरहू नथ तुम्हापाशी ठेविली व सदरील रुपये १८ तीन वेळा मिळून घेतले व ह्या रुपयास आणाचा करार दरशेकडा एक होत्रा प्रमाणे केला असे. आतां सदरहू रुपये १८ नथ ठेऊन घेतले त्याची फेड आम्ही दोन वेळा मिळून रुपये १९ एकुणीस दिले व हे रुपये दिले त्या वेळी आम्हास नथ माहागवळाची परत मागितली त्यास आपण घटकाभरानीं देतो म्हणून सांगितलें त्याबद्दल साक्षीदार आहेत ते इसम रा. संबू वल्लद जुगनी हलवे राहणार कारंजा यांच्या समक्ष सदरील सर्व गोष्टी आपण उभयतानी कबूल केल्या व त्या प्रमाणे घटके नंतर आम्ही नथ मागितली त्या वेळी तुम्ही आम्हास दगलबाजीची बोलणी सांगितली कीं नथ आम्हापाशी ठेविली नाहीं. आम्हांस कांहीं माहित नाहीं वगैरे बऱ्याच गोष्टी सांगितल्या त्यास असें कळविलें जाते कीं सदरहू नथ नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत आमची आम्हांस द्यावी न दिल्यास रीतीप्रमाणें तुम्ही दगलबाजी केल्या बद्दल व नथी बद्दल व ह्या नोटीशीचे खर्चा बद्दल व सदरहू व्यवहाराचा अखेर निकाल होईपर्यंत जे कांहीं नुकसान वगैरे होईल ते कोर्टांत काम चालून भरून घेतले जाईल. म्हणून दिली नोटीस तारीख २९ माहे मे सन १८८६ इसवी

सही
आपाजी विश्वनाथ किडे राहणार
कारंजा दस्तुर गणेश नारायण घोडसर राहणार कारंजा.
गणेश नारायण घोडसर राहणार कारंजा दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

खालील चार आळी छापविण्याची मेहेरबानी

हरवानां होऊन त्यांवर दोन ओळी आपला ही अभिप्राय मिळेल अशी आशा आहे.

## "ग्रेन मार्केट बिल्डिंग पाहिजे"

आजकाल आमच्या येथील मुनसिपालिटीनें होईल तितकी शहर सुधारणा करण्याकडे बरेंच लक्ष पुरविल्यामुळें कित्येक गोष्टी लोकांस सुखकारक होत गेल्या व पुढें ही तशाच होत जातील अशी आशा आहे. आतां वास्तविक कित्येक वेळां कमेटीस फुरसत न झाल्यामुळें ह्मणा, अगर पैशाचे टंचाई मुळें ह्मणा, अगर एखादी गोष्ट आज करूं, उद्यां करूं, अशा आजउद्याच्या जपमाळेमुळें ह्मणा, अशा कोणत्या तरी कारणानें विशेष जरूरीचीं व लौकर करण्याचींही कामें राहतात, त्यांपैकींच एक ग्रेन मार्केट हौस बांधून देण्याचें जरूरीचें काम होय.

ग्रेन मार्केटचा कारखाना सुरूं झाल्यापासून त्या कामावर नेमलेले कारकून, शिपाई वगैरे यांस काम करण्याकरितां आठवडे बाजारांतील मार्केटशेडची जागा देण्यांत आल्याप्रमाणें पास वगैरे देण्याचें काम तेथेंच चालूं आहे. ऐन हंगामाचे दिवसांत काम करण्यास वर निर्दिष्ट केलेली जागा फारच गैर सोईची आहे. मार्केटांत काम करीत असलेल्या मनुष्यांची स्थिति पाहिली ह्मणजे "परदुःखेन दुःखिता विरला" या वाक्याची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. आधीं मार्केट शेड पत्र्यांचे आच्छादन घालून केलेलें, सर्व दगडी इमारत, चोंहोंकडून सर्व उघडी, या प्रकारची असल्या मुळें व सायंकाळ पर्यंत पश्चिमेकडचें सारखें ऊन लागल्यामुळें सर्व जागा तापून जाते. अशा प्रकारच्या होमकुंडांत बसून काम करणारे मनुष्यांची काय दशा उडत असेल याचा विचार आमचे कमेटीस कांहींच होत नाहीं काय? वाळयाच्या पडद्याचें सुख त्यांस नसलें तरी कांहीं हरकत नाहीं, पण योग्य व व्यवस्थेशीर थंड जागा गरीब नोकरास अवश्य पाहिजे. दर वर्षास ३००।३५० रुपयांचे खर्चताच आज कमेटीस ४ हजार रुपये उत्पन्न होत आहे असें असून शिवाय आठवडा बाजाराचें ही हजार बाराशेंचें उत्पन्न होत असून ही कमेटीचें नोकरांनीं ग्रेन मार्केट बिल्डिंगच्या संबंधानें हाल सोशीत असावे ना!! हरहर !! वाचकहो तुह्मीच पहा ग्रेन मार्केटचे दरोग्यांचे जागीं जर एखादा गोरकाप, अगर ह्याचे पंक्तीतलाच एखादा हॉफ कॉस्ट नेमण्यांत आला असतां तर कमेटी कडून अशी बिल्डिंगाच्या संबंधांत हयगय होऊन काम चांगलें चाललें असतें काय? आपणांस चांगलें ह्मणून घेण्याची इच्छा तर फार! परंतु आंगीं चांगुलपणा मिळविण्याचीं साधनें मात्र कमी; ह्यास लोकांनीं काय करावें; आतां शेवटची सूचना कमेटीचे व्हाईस प्रेसिडेंट यांस इतकीच कीं– वरील प्रकारचा त्रास नोकरास होतो आहे किंवा नाहीं ह्याची खात्री करून घेतल्यावर "ग्रेन मार्केट कचेरी कारितां घर बांधून देण्याची लौकर तजवीज ते करतील अशी आह्मांस पूर्ण खात्री आहे. आणि असें झाल्यानें त्यांचे हाताखालील नोकरास सुख होऊन त्यांस मिळत असलेल्या प्राप्तींतच दुप्पट काम करण्यास हुरूप येईल हें सांगणें नको. कळावे लोभ करावा हें विनंती.

( एक शोधक. )

टीप—वरील पत्रांतील मजकुराचें अवलोकन करून आमचे व्हाईस प्रेसिडेंट गरीबास होत असलेला त्रास लौकर दूर करतील असें आह्मास ही वाटतें.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य १३ शके १८०८

## सरकारचा खर्च कमी करण्यासंबधानें नेमलेली कमिटी.

हिंदुस्थान सरकारास उत्पन्नापेक्षां खर्च दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळें फाजिल खर्च कोणत्या खात्यांत होत आहे व कोणत्या उपायांनीं तो कमी करितां येईल या गोष्टींविषयीं विचार करण्यासाठीं सरकारांनीं कमिशन नेमलें आहे. प्रत्येक मनुष्याच्या प्रपंचांत काय किंवा सरकारच्या राज्यव्यवस्थेंत काय एकच नियम लागूं पडतो. ह्मणजे जर खर्च सदोदित जास्ती असला व उत्पन्न कमी असलें तर थोडक्याच काळांत ऋणकरी बनण्याची पाळी येते. या नियमाप्रमाणें हिंदुस्थान सरकारचा खर्च दरवर्षी उत्पन्नापेक्षां अधिक असल्यामुळें खजिन्यांत सालोंसाल तूट येते व ही नुपूर भरून काढण्यास विलायतेंतून कोट्यावधि रुपये सरकारास कर्जी काढावे लागत आहेत. याप्रमाणें कांहीं दिवस व्यवस्था चालल्यास सरकारचें दिवाळें निघण्याची पाळी येईल. या गोष्टीचा विचार करून सरकारनें एक मंडळी नेमली असून खर्च कमी करण्यासंबंधानें सूचना करण्याचें काम ह्या मंडळीकडे सोंपविलें आहे.

प्रथमतः ही मंडळी ज्यावेळीं सरकारनें नेमली त्यावेळींच पुष्कळ लोकांनीं ओरड केली कीं नेमलेल्या लोकांपैकीं पुष्कळ लोक सरकारी नौकर आहेत यामुळें खर्च कमी करण्यांत त्यांचें हित नसून त्यांच्याच पाठीवर पाय येणार. असे लोक विचार करण्यासाठीं नेमल्यास त्यांचे हातून निरपेक्ष बुद्धीनें काम न होतां स्वार्थ बुद्धीनेंच काम होईल असें लोकांचें अनुमान होतें व तें मनुष्य स्वभावास अनुलक्षून योग्यच होतें. सिविल सार्विसपैकीं गुडनैवेद्य खाणारी मंडळी यांसच जर तुमच्या नैवेद्यांतून गूळ किती कमी करावा असें विचारलें असतां उत्तर काय मिळेल हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे. आरोपितासच जर त्याचे गुन्ह्याविषयीं न्याय करण्यास नेमलें तर त्याचें हातून न्याय तो काय होणार? या प्रमाणें कमिटीची व्यवस्था असल्यामुळें लोकांचें प्रथमतः केलेलें अनुमान खरें ठरण्याचा प्रसंग आला आहे. कमिटीनें केलेल्या एक दोन सूचना वाचकांस सादर केल्यानें आमचें ह्मणणें कितपत यथार्थ आहे याची कल्पना होईल. कमिटीची अशी एक सूचना आहे कीं हल्लीं स्टांप विकणारांस अर्धा आणा मिळत असतो तो या पुढें पाव आणा मिळावा; व असें केल्यानें साऱ्या हिंदुस्थानांत ५०० रुपये सरकारास किफायत होईल, दुसरी सूचना अशी कीं सात सात, आठ आठ अगर दहा दहा रुपये मिळणाऱ्या शिपायांचे पेनशन बंद करावें! केवढी बचत सरकारास राहील! याचें नांव राजकार्य धुरंधरता! ज्या सरकारचें खजिन्यांत कोट्यावधि रुपयांची तूट येते त्यांस पांचशें रुपड्या कमी करून होणार काय? व जन्मभर काबाड कष्ट करून थकलेल्या ह्मातान्या पट्टेवाल्यांस तीन तीन, चार चार रुपड्या पेनशन मिळतें तें बंद केल्यानें काय फायदा होणार? या गोष्टी कमेटीस समजत नाहींत असें ह्मणतां येत नाहीं. कारण राजकारणांत पडलेल्या एखाद्या नवशिक्या मनुष्यास देखील एकदम कळून येण्याजोगी ही गोष्ट आहे; मग असल्या कारस्थानी व अनुभविक धेंडांनां कां कळूं नये! कमिटींत एक दोन लोक असल्या सूचना अगदीं पोग्कट व निरुपयोगी असें बोलून दाखविणारे असतील परंतु त्यांचें बहुमतापुढें काय चालणार आहे! असल्या सूचना येण्याचें कारण वर निदर्शित केलेंच आहे.

इंग्रज सरकारच्या राज्य पद्धतीचें खरें स्वरूप कळण्यास अद्यापि बरेंच दिवस लागतील. ज्याप्रमाणें लोकांनां वरची कल्हई दिसूं लागली त्याप्रमाणें अंतरंग अझून दिसूं लागलें नाहीं. 'वचने किं दरिद्रता' याप्रमाणें एकंदर राज्यव्यवस्था आहे. प्रत्येक बाब व प्रत्येक कृति दोन तऱ्हांनीं दृष्टीस पडते. सडका सुरेख झाल्यामुळें मार्ग सुगम झाले; आगगाड्या झाल्यानें दळणवळण वाढलें व व्यापार वाढला; पण त्याच आगगाड्या व तेच रस्ते बंड झाल्यास एका क्षणांत लष्कर आणण्यास उपयोगी आहेत; प्रदर्शनें केल्यानें चांगलें जिन्नस उत्पन्न होण्यास उत्तेजन मिळतें हा दिखाऊ फायदा; परंतु वास्तविक हिंदुस्थानांतील लोकांत कोणत्या गोष्टींचा खप आहे याची माहिती विलायतच्या व्यापाऱ्यास होते. याप्रमाणें प्रत्येक गोष्ट बारीक विचारानें पाहिली असतां असें कळून येईल कीं दिखाऊ फायदा एक व वास्तविक फायदा तो वेगळाच. याच नियमास अनुसरून कमिशनची स्थिति आहे. कागदीं घोडे कसे नाचवावेत व कागदावर बतबात व चोख हिशेब कसा दाखवावा यांत इंग्रज लोक खरे निष्णात, पुढें दिवाळें निघण्याचा प्रसंग आल्यास लोक दोष देतील कीं खजिन्याची वाईट स्थिति होती तर याचा विचार पूर्वींच सरकारनें करावयाचा होता. हा दोष येऊं नये ह्मणून एक कमिटी नेमून त्यांचे सूचनेप्रमाणें खर्च कमी जास्ती केला ह्मणजे जबाबदारी बिलकुल नाहीं. आह्मी कामिटी नेमली, त्यांच्या सूचना मान्य केल्या. त्याप्रमाणें व्यवस्था केली असें ह्मणण्यास तयारी झाली. पण हें आंतलें इंगित पहा; कमिटी नेमली ती कशी; आपलेच नोकर चाकर याप्रमाणें बाह्य स्वरूप एखाद्या गोष्टीस कसें द्यावें हें इंग्रज लोकांस फार चांगलें माहित आहे. ज्याप्रमाणें रोमच्या बादशहाचें राज्य डबघाईला आलें त्याच्या पूर्वीं बरेच दिवस अशी स्थिति झाली होती; ह्मणजे स्वतंत्रतेची दिखाऊ अंगें सर्व कायम; पण वास्तविक लोकांची स्थिति गुलामगिरीची. याप्रमाणेंच आजचा आपल्या देशांत मासला आहे. लोकांनीं ह्याचा चांगला विचार करावा; केवळ कल्हईला भुलून जाऊं नये.

सरकारचीं जीं अनेक खातीं आहेत तीं पाहिलीं असतां उत्पन्न थोडें आहे असें कोणत्या ही खात्यांत नाहीं. मात्र डाकखात्यापासून सरकारला नफा नाहीं. नुकतें जंगल खातें काढलें त्याचें ही उत्पन्न दिवसेंदिवस वाढतच चाललें आहे. असें असतांना सरकारला नुपूर कां यावी याचा विचार केला असतां असें दिसून येईल कीं सिविल सार्विस वाल्याचे पगार कोणच्याही खात्यांत पाहूं गेलें असतां भक्कम दिसून येतात. कस्टम खात्यांत, मिठाच्या खात्यांत, अफूच्या अगर जंगलच्या खात्यांत एकंदर चोहोंकडे साहेब लोकांनां सर्व मोठमोठाल्या जागा व जाडे जाडे पगार हिंदुस्थानांतल्यासारखे विलक्षण साऱ्या दुनियेंत कोणत्याही देशांत नाहींत. लष्करी खात्यांत व सिव्हिल खात्यांत दोहोंकडे पगार विलक्षण. या पगाराचे रगाड्यानें देशांतील किती संपत्ति प्रत्येक वर्षी परदेशांत जात आहे व देशांतील उत्पन्न किती भरतीस घालावें लागत आहे! बहुतेक खर्चाची बाब ह्मटली ह्मणजे साहेब लोकांचे मोठमोठे पगार. या खऱ्या कारणाचा विचार करतो कोण?

( पुढें चालूं. )

## The Berar Samachar

MONDAY MAY 31
1886

Mr. Gladstone's Home Rule Bills are being discussed in England from all stand points and if we may judge from the information gathered from the dailies, the opposition is very strong and effective. It does not seem probable that the Bills will be passed by the House. There is one feature connected with the opposition which deserves notice. While the Bills are vehemently attacked, while hostility is expressed to every idea or opinion expressed in the Bill, none of the political opponents suggest a better solution of the Irish question. It is easier to throw discredit on every scheme for the termination of the ill-feeling existing between the two countries than to construct a theory which will serve to solve the Irish difficulty. The eminent men that have sided against the Bill will do well to discuss the solution of the Irish question. Let proposals come from every quarter and it will not be dif-

ficult to decide what solution the public likes. It is very astonishing to see how Mr. Gladstone has gradually changed his opinions in regard to Ireland. We give below a specimen of his views in 1871 and request the public to compare them with his opinions as embodied in the provisions of the Bill.

"If the doctrines of Home Rule are to be [illegible] in Ireland, I protest on [illegible] that you will be just as [illegible]ded to it in Scotland; and [illegible], I protest on behalf of Wales [illegible]h I have lived a good deal, and [illegible]e there are 800,000 people who [illegible] this day---such is their sentiment of nationality---speak hardly anything but their own Celtic tongue a larger number than speak the Celtic tongue, I apprehend, in Scotland, and a larger number than speak it I apprehend, in Ireland. I protest on behalf of Wales, that they are entitled to Home Rule there. Can any sensible man-can any rational man suppose that at this time of day, in this condition of the world, we are going to disintegrate the great capital institutions of this country for the purpose of making ourselves ridiculous in the sight of mankind, and crippling any power we possess for bestowing benefits, through legislation on the country to which we belong."

In spite of so clear materials as these before the public he writes to a high journal to correct the errors embodied in its leading columns which he considers do not represent him in his true colours. He says he had not yet formed his opinion on Home Rule. He was not sure what solution was the best until knowing the temper of the people he could understand that the scheme proposed by him was the best under the circumstances of the case as being represented by the return of 86 members who are for Home Rule to be the leading opinion among the masses of Ireland.

---

Mr. Vishnu Moreshwar Mahajani Head Master Akola High School, in the remarks he made upon a lecture on the subject of "England and Russia" by Babu Dinanath Gangoli in the Hirabag at Poona, adverted to the refusal of Government in granting to the natives the right of forming Volunteer corps like Europeans. He said that England was in a peculiar position. It called the Indians loyal because it is necessary to please them in the face of the Russian advance. It was openly said by Governors and Viceroys that the Indians were loyal and their loyalty has formed the subject of minutes and public speeches. If the Indians are loyal why refuse to make them volunteers. The Indian Government as soon as a request for the privilege is made again falls into doubt on the question of Indian loyalty and not being satisfied on the point only postpones the demand to a future time. Every Viceroy is afraid to take upon himself the responsibility of conceding this privilege and he solves the riddle by saying that the time has not yet come again reiterating the acknowledgments of loyalty. It was clear to Mr. Mahajani that the Indian Government has not perfect confidence in the loyalty of the people. It was necessary for the safety of the country and the stability of British Government in view of the approaching Russian invasion to coax the natives by every means that could be found. But when the natives make a new departure in the political position, when they intend to turn a new leaf in their material and physical advancement, a flat denial couched in honeyed and flattering language meets them in the face. Mr. Mahajani made a distinction between the loyalty of the educated classes and the loyalty of the agriculturists. The latter knew perfectly well whoever was their master was sure to load them like asses. They have, therefore, been uniformly loyal to the Mussulmen, the Hindus, and the English, and would exhibit the same loyalty if they came to be ruled by the Russians. As long as no hope is held out to them of an improvement in their condition they don't care a fig who is their master. With the educated classes the case is quite different; they understand and appreciate the blessings of British Rule and would not like to exchange it for the rule of the Russians. They would fight hand to hand and would do whatever lies in their power to avert the barbarous dominion of Russia. It is a great gain to England to secure the loyalty of these classes and to disbelieve it and negative a demand for volunteering does not bespeak a very just and generous spirit on the part of the Ruling race. Mr. Mahajani said that though Russian Government may be a curse to India it is not a curse to the Turkomans and kaffers. They would hail the dominion of Russia with great eclat and satisfaction. It is much better than the primitive barbarous and unsettled system now reigning amongst them and they would consider the Russians as messengers of peace, prosperity, and security of life and property. In India the civilization would be thrown a hundred years backwards with the approach of the Russians. Every educated native ought to view the situation with great concern and consideration as the problem is important and pregnant with momentous consequences to the natives of the country.

---

The subject of writing to newspapers by military men is being discussed in the Bombay papers. They are not to attempt to prejudice questions under investigation by the publication, anonymously or otherwise, of their opinions. Information relative to the numbers, movements or operations of the troops, or details regarding fortifications, armaments, or experiments made in connection with military matters is also prohibited. We think that opinions are necessary if questions are to be fully discussed. Indeed the rule has been observed more in the breach than in the obedience. Did not Lord Wolsely and the present Commander in chief themselves transgress the orders? Sir. E. Harbey, Mr. Howard Vincent and Colonel Duncan, members of Parliament must be tried for their remarks in the House of Commons, if the rules and regulations apply to the military officers who are also members of the House. Much valuable light is thrown on a question when it is discussed by men of experience whose voice carries weight with it. Why should these rules exist at all or if they exist why should their provisions be enforced except in war-like times? Every officer worthy of the name would hesitate to publish prohibited information in troublous times. It would be impossible to stop the mouths of gentlemen who feel a keen and lively interest in the well-being of the service to which they have the honor to belong. And it would be like chastising a man for his good acts to try him by Court Martial for what he honestly and conscientiously does? Have not the Government of India yet seen the absurdity of these regulations. The sooner they are blotted out of existence the better.

---

The unhappy father of four young Hindu widows is ventilating his grievances in the Calcutta papers But we fail to see why he should be so nervous when the widow marriage movement is going up day after day. Such men should make heroes of themselves and their daughters by embracing the reform. The women deserve sympathy. We don't know whether they are child widows or matron widows. With English education the best thing is the liberty of thought and action. The binding force of custom is breaking up. The minds of Hindus are taking a serious turn. Religion is dissolving itself. There is no restriction on your thought and action except that of the legislation. Laws of public opinion and honor are undergoing amendments every hour. Why does then our Calcutta friend find any difficulty? Why does he want any consolation from the opinions of others? We are not prepared to believe that three-fourths of the native parents were anxious to be relieved from the constant anxieties which the custody of the widows of their respective families entailed upon them and from the disgrace to which they were too often exposed by their transgressions, which could be concealed only by the perpetration of crime. The majority of Educated men may perhaps agree with our friend; but we cannot for a moment believe that orthodox Hindus are so sternly in favour of the movement. If that were so the institution of widowhood would have become an anachronism long ago.

---

Mr. Gopal Babaji Hirphatak Head Master Nasik High School made an exhibition of taste the other day which was as indecent as it was unhappy. We learn from a marathi correspondence in Indu Prakash that a number of *malis* were dinning on a public road at Nasik. As he approached the party while passing by that road he was requested not to pass through, between the rows with boots on as it would injure their religious sensibilities of the party and would appear very awkward and distasteful. Mr. Hirphatak would not hear; he insisted upon going through the rows with boots on. As he began to pass, a boy confronted him with outstretched hands to make resistance. The Head Master took it a serious offence and squeezed the ear of the boy so severely that the ear-ornament fell away and the skin was cut a little from below. The boy screamed loudly and brought a crowd of malis to the spot who belaboured the unfortunate head master so seriously that his head was injured from above and every part of his body was smashed. Doctors were called and he is now improving. Information has been given to the Police to seize the offenders. We are extremely sorry that such old and experienced graduates in their zeal for independence of thought and action should show such a grievous want of discretion and common sense.

---

## वऱ्हाड

हवामान—पर्जन्य पडण्याचीं चिन्हें होऊं लागलीं आहेत.

" ग्रेन मार्केट बिल्डिंग पाहिजे " यामदराला ीं पत्रव्यवहार दुसरीकडे छापला आहे. तिकडे आमचे येथील व्हाइस प्रेसिडेंट व कमेटींतील मेंबर लक्ष देतील अशी उमेद आहे.

नदींचे पाणी—नदीचें तुंबविलेलें पाणी सोडून दिल्यामुळें प्रथम पाण्यास नितका वाईठ वास येत होता तितका आतां येत नाहीं, व पूर्वींचे पाण्यांत बारीक बारीक कृमि येत होते ते ही कमी झाल्याचें दिसतें.

रा. नारायणसिंग बभुतसिंग अकोटचे नायब तहसिलदार बिन पगारी २० दिवसाच्या रजेवर गेले असून त्याचे जागीं रा. नरसो यशवंत डेपुटी कमिशनरचे कचेरीतील कारकून यांस नेमलें व त्यांचे जागीं रा. लक्ष्मण महादेव यांस नेमणार म्हणून समजतें.

रा. यशवंत महादेव तहसिलदार यवतमाळ यांची बदली वणीस होऊन त्यांचे जागीं वणीचे तहसिलदार रा. शेषाचिलम यांस नेमिल्याचें समजतें.

---

चुकीची मागाहून दुरुस्ती:—रा. निंबाजी अनंत बागाईतकर यांस दिलेली नोटिस आमच्या गेल्या अंकांत छापली आहे तींत सहीचे ठिकाणीं काशिनाथ वामन आहे तेथें काशिनाथ कृष्ण फडके असें समजावें.

---

( मागाहून आलेली नोटीस. )

नोटीस.

भगवान वलद लक्ष्मण लोहार रहाणार पिंपळगांवराजा यांस:—

खालीं सही करणारीण नोटीस देतें कीं, तूं माझे लग्नाचा नवरा असून तुझ्या पासून मजला एक मुलगा जाहला. त्याचें वय आठ वर्षांचें आहे. त्याच वेळेपासून आमची खाण्यापिण्याची तजवीज केली नाहीं. आम्हाला आपले जवळ नेण्याविषयीं स्वतः व पंच मार्फत सांगितलें तेंही केलें नाहींत. मग निरुपाय होऊन सरासरी आठ वर्षांत ४०० रुपये कर्ज केलेलें आहे तें तुम्ही द्यावें व मजला आठ दिवसांत आपले जवळ न्यावी अगर माझें खाण्यापिण्याचा बंदोबस्त करावा. तसें न केल्यास तुमचा माझेवर हक्क बुडाला. व हीच मजला फारकती दिली असें समजून मी वागेन कळावें. तारीख १७।९।८६ इसवी.

( सही ) चिनकाई मर्द भगवान लोहार रहाणार
चतारी निशाणी
खुद हातची.

---

## वर्तमानसार.

बहार येथील कायस्थ लोकांनीं लग्नकार्यांत प्रत्येकानें १०२ रुपयांपेक्षां जास्त खर्च करूं नये. जो ज्यास्त खर्च करील तो बहिष्कारास पात्र होईल असा आपसांत एक नियम केला आहे. वरील प्रमाणें आपल्या ब्राम्हण लोकांनीं जर हाल्ली मेळ घेऊन ठरविलें तर कितीएक लोकांचे पैसे बिनाकारण खर्च होऊन मोठ्या पंचाइतीमध्यें पडतात तर वरील प्रमाणें नियम केला म्हणजे तसें न होतां सर्वांस मोठें सोईचें होईल असें आम्हांस वाटतें. परंतु होईल तेव्हांखरें. वल्पा०

आकतर नदीपासून २० मैलांपर्यंत अफगाण सरहद्द कायम करण्याचें काम बहुतेक आटोपलें असें सांगतात.

सकाळचे आठ वाजल्या पासून संध्याकाळचे ६ वाजतापर्यंत जर कोणी मनुष्य एकसारखा सूर्याकडे पाहत बसेल तर त्यास आपण १०० रु. इनाम देऊं असें हैदराबादच्या मुसलमान लोकांनीं ठरविल्यावरून एक मनुष्य तें इनाम मिळविण्याकरितां तितका वेळपर्यंत सूर्याकडे पाहत बसण्यास तयार झाला. सुमारें ३ वाजेपर्यंत त्याणें टिकाव धरला पण रेताडतां तो अगदीं बेशुद्ध होऊन पडला त्यास उपचार करण्याकरितां डाक्टर वगैरे आणण्याची तजवीज झाली पण डाक्टर येण्याचे पूर्वींच तो मरण पावला. कोण पैशाचा लोभ हा!

औरंगाबाद शहरांत तारायंत्र सुरू झालें.

कलकत्त्याचा नेटीव पत्रकर्ता सांगतो कीं, फरिदपूर जिल्ह्यांत पटकीचा वाखा इतक्या जारीनें सुरू आहे कीं, फक्त एका खेड्यांत डाक्टराच्या औषधोपचार वांचून ३०० मनुष्यें पटकीनें मेलीं. पाण्याच्या दुष्काळामुळें हा वाखा पसरला आहे असें सांगतात.

कलकत्त्याच्या गेल्या बी. ए. च्या परिक्षेंत २३ मुसलमान बी. ए. झाले, व गेल्या ५ वर्षांत तिकडे ३ मुसलमान एम. ए. झाले असून ३६ बी. ए. झाले होते. यावरून मुसलमानांचें शिकण्याकडे लक्ष जास्त लागलें आहे असें स्पष्ट होतें.

यंदा बनारसच्या बाजूस अफूचें पीक कमती असून माळवा व इंदूर या भागांत चांगलें आहे. विनंत जागाच्या अफूवरील सरकारची पास ड्युटी कमी करावी. अशा विषयीं मुंबईच्या व इंदूरच्या व्यापाऱ्यांनी सरकारास अर्ज केला आहे.

एडन येथें असलेल्या धुलिपसिंगास परत विलायतेस जाण्यापेक्षां एडन येथेंच राहणें बरें वाटत आहे पण त्यांच्या प्रकरणाचा हिंदुस्थान सरकार व विलायत सरकार यांच्या दरम्यान निकाल झाल्यावर त्यास कोठें राहावयाचें हें ठरावयाचें आहे

ग्रीक व टर्की यांच्या दरम्यानची भांडाभांडी हत्यारांवर येऊन पोहचली. ता. २१ ची विलायतची तार सांगते कीं, कारपासून ग्रीसच्या सरहद्दीवर ग्रीक व टर्की यांच्या फौजांच्या दरम्यान लढाई सुरू आहे. आथेन्सची बातमी सांगते कीं, आनालिवसी हें ठिकाण आपल्या ताब्यांत घेण्याचा टर्कीच्या फौजेनें यत्न केला यावरून ही लढाई सुरू झाली व यांत ग्रीक फौजेनें टर्कींच्या फौजेस या ठिकाणाहून हांकून लावलें.

मुंबईचे ग्राजुएट मि. कृष्णराव यांचें नाव युनिवर्सिटी येथील ग्राजुएटांच्या यादींत दाखल झालें आहे.

पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषावर औषध देणारा फ्रेंच डाक्टर मि. पास्टर याच्या औषधाचा कसा काय उपयोग होतो हें पाहण्याकरितां इंग्रजसरकारानें आपला ४ वानदारांस मुद्दाम पाठविलें आहे.

लंडन येथील बारिस्टर मि एज यांस अलाहाबादेस हायकोर्टाचे चीफ जस्टिस केलें.

प्राविन्शियल बांक आफ इंडिया या इंग्रज बांकेचा म्यानेजर मि. फिलिप्स या नांवाचा एक गोरा असून त्याच्यावर पैसे खाल्याचा किंवा बांकेचे पैसे खासगीकामांत लावल्याचा असे वेगळाले तीन आरोप असून त्यास दिल्लीच्या जज्जानें हल्ली सेशन कमीट केलें आहे.

मध्यप्रदेशांतील अलाहाबादेस झालेल्या बि. ए. च्या परीक्षेस एकंदर ९४ उमेदवार बसले होते पैकीं ५९ पास झाले. टा.

आफूचें उत्पन्न— बहार आणि बनारस प्रांत मिळून गेल्या सालीं अफूची पूर्वीच्या सालापेक्षां ८६,६३६ बिघे लागवड जास्ती झाली. आणि १४,७२२ मण अफूचे पीक अधिक झालें. तेथील सर्व शेतकरी लोकांचा उसापेक्षां याची लागवड करण्याकडे फार ओढा लागला आहे. या प्रमाणें आमच्या इकडे वऱ्हाडांत आफूची लागवड करण्याचे जाहलें तर अति उपयोग होऊन सर्व लोकांचें कल्याण होईल असें आम्हास वाटतें. जेव्हां होईल तेव्हां खरें.

ब्रिटिश सरकारांतील नोकर लोक संस्थानांत असतात यांच्यावर (इन्कमट्याक्स) प्राप्तीवरील कर घेऊं नये, असा ठराव झाल्याचें समजतें.

एका कुटुंबांतील ३१४ पुरुष सरकारी नौकरींत असून त्यांच्या पगाराची सालीना बेरीज ५०० च्या वर अधिक होईल तर त्यांस उत्पन्न प्राप्तीवरील करात लागूं करावें, असा ठराव होऊन आल्याचें समजतें.

बडोदा येथें राजवाड्याचा कारखाना सुरू आहे त्यास सवीस लक्ष रुपये खर्च येईल असा अदमास आहे.

युनिवर्सिट्या व दुसऱ्या विद्याप्रसारक मंडळ्या यांना इनकमटाक्स माफ आहे.

कलकत्ता येथील स्मालकाज कोटांत होणाऱ्या फिर्यादीची सरासरी काढली असतां रोजी शंभर फिर्यादी पडतात.

लष्करी खात्यास जोडलेलें इंजिनियर खातें कमी करण्याविषयीं फायनान्स कमेटीकडून शिफारस होईल असें बहुतेक निश्चयात्मक ठरलें आहे. शिवाय इंग्लिशमन पत्रकार असें सुचवितात कीं साहूकमेटीनें हल्लींच्या काळीं व शेतकी खात्याचा चांगला विचार करावा. हीं दोन्हीं खातीं बहुतेक निरर्थक वाढलीं आहेत. स्वतंत्र शेतकी खातें कायम ठेविल्यास वेगळ्या जंगल खात्याची मुळींच अवश्यकता नाहीं.

इंग्लंडांत बालकांनां टाईपची लिपी लिहिणारे कारकून तयार करण्याची खटपट चालूं आहे.

स्पेनच्या राणीनें सार्विलीच्या ड्यूकास हद्दपार करून कालिफोर्निक बेटावर पाठविलें. ने०

युनायटेड स्टेटसच्या कालेजांमध्यें अकरा हजार स्त्रिया शिकत आहेत असें सांगतात.

नुकसान — हुंडीच्या भावामुळें हिंदुस्थानचें अतोनात नुकसान होत आहे. सन १८७१।७२ सालीं २,२८००० पौंड सन १८८४।८५ मध्यें ३४,२६,०००; व सन १८८५।८६ सालीं ४८,३७,००० पौंड नुकसान झालें असें समजतें. प्रत्येक वर्षीं हिंदुस्थानचें नुस्या हुंडीच्या भावामुळें सुमारें पांच कोटी रुपयांचे नुकसान व्हावें व आमच्या सरकारानें स्वस्थ असावें हा मोठा चमत्कार आहे आमच्या लोकांनीं उचल व गवगवा केल्यावांचून विचार व्हावयाचा नाहीं.

ब्रम्हदेशांतील इंग्रज सरकारचे कांहीं लष्करी लोक सरहद्दीवरील शिपायांस पोषाक, हत्यारें, दारूगोळा व त्यांचा पगार घेऊन जात असतां थायेडीच्या माजिस्त्रेटानें आसपासच्या खेड्यांतील हजारबंद लोक गोळा करून त्या लष्करी लोकांवर छापा घालून त्यांपासून पोषाक व हत्यारें वगैरे घेऊन आपल्या लोकांस वाटून दिली. हल्लीं या माजिस्त्रेटाच्या हाताखालीं इंग्रज सरकारच्या शिपायांचा पोषाख व हत्यारें असलेले दोनशें उत्तम डाकू लोक आहेत. या माजिस्त्रेटास धरून देणारास सरकारानें १०० रुपये इनाम देण्याचा ठराव केला आहे. सु०प०

J. VIOURSA AND CO: ESTABLISHED 1882.

We Warn the General Public of unscruplous advertisers putting up for sale worthless medicines after other names and at a less price claiming cure for Leprosy. PURCHASE GOODS ONLY FROM LONG STANDING FIRMS WHO ARE RELIABLE AND TRUSTWORTHY. Eye Disease, and &c.

SKILLFUL PERFORMANCE

*Prof: Bartholomew's "Strabo-Calix" for*

SQUIN  CURE

This manufactur and contrivance has been a great boon to many; rendering the EYE BALL Eye sight of its natural position and conciding to the axe of eye.

The "Strabo-calix," is nearly the weight of a spectacle perhaps lighter and the performance is most simple and harmless, even a child can use it. To be used for two hours, morning and evening. It has quick resulc on a person who uses it regularly. Please state the size of your eye.

PER PAIR. Large Medium Small

TTENTION! ATTENTION!!!

To Maharajas, Nabobs, Zemindars, Talookdars, Gardeners and Lovers of Flowers.

"Florescence" or the Life of Flowers.

Secures development of blossom, perfection of foliage, forces most luscious and luxuriant fruits, vegetables and salads, greatly stimulats and quickens all vegetable growth. It' contains nothing that is poisonous, his famous powder is gifted with afertilising strength equal to Guano and possesses the virtue of destroying insects from plants and trees.

To ladies who take an interest in their flowers both in-doors and out, "Florescence" particularly recommends itself as it is chemically prepared and has not the appearance or character of what is known under the head of "Flower Manures.

Fo a small garden one large Tin will be sufficient for some months To be used once a week-

Large Tin...Rs. 5
Small ,, ... ,, 3

A Favor of Trial Solicited.

NO MORE SPECTACLES & PAINFUL OPERATIONS.

For the cure of all eye Diseases The famous Dr. Chase's Jordon Drops and his Cathartic Alterative has cured thousands, in India since the year 1882, even such cases that have been pronounced incurable by Eminent Oculists or Eye-Doctors.

Per Bottle Large... Rs. 4.
" " small... " 2-8
Cathartic Alterative " 4.

(True Copy)

BORN SHORTSIGHTED.

*Simla 10th August 1883*

I am suffering with short-sightedness since my infancy and if the drops really prove useful I shall get you a good sale by freely recommending it to the Native Community.

*(Writes again After using the medicine for 3 days.)* 15th, Augst 1883

Your favor of the 13th inst. together with the parcel to hand, please send one soual bottle of Jordon to the address of Baboo Baisakhi Ram Hardyal, Cloth Merchant, Amritsar and one Large of the same to Sodhi Hukumsingh, Esq. Extra Asst. Commr. an Mir Munshi to Punjab Govt. Simla.

(Sd.) BHAGAT RAM.
Translator Punjab Govt. SECT.

BLIND.

*Nellore, Kavali 9th June 18 4.*

This is to testify that a small bottle of Jordan Drops used last year in a case (blind on account of opacity of the cornea) which was cured and the patient was all right.

J. BENJAMIN Hospital Asst.

EYE-DISEASES.

*27th October 1884.*

The Jordan Drops seems to be very effectual to those whom I have applied up to this time.

(sd) HARI MHUN KABIRAJ

*Thousand marvellous cures!!*

Dr. Chases siloum wash or the Origenal Lepra-cura.

This prepration is made of pure vegetable and other valuable ingredients. It has been experienced from a long time and now guranteed to be the only medicine ever discovered for the benefit of sufferers. It cures all skin and veneral diseases, Leprooy. Impotency, and removes Mercury from system of the blood. To be taken internally thrice a day.

Per Bottle Large--Rs. 20.
,, ,, small--Rs. 15.

Ointment Rs. 4.

The magical power of siloam wash is that it forces out the unnatural heat from the Body by means of sores and Golden marks, and renders the pard benumbed to its original power of feeling sensation. The sores and marks are removed off by the mere external application of Sarza Ointment. On supply is sufficient for such plague of obstinate diseases.

J. Saviour and Co,
31, 32, Amherst, Calcutta.

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.